१९६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १४८३
REFBK-0013067

# अनवाणी चाल

93080

प्रभाकर श्रीधर नेरुरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३.५.३.२६ वि: निबंध
क्रमांक ........ नों. दि. १५.८.६३

अभिनव प्रकाशन, मुंबई १२

दोन रुपये

प्रकाशक : वामन विष्णु भट,
अभिनव प्रकाशन,
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड,
परळ मुंबई १२.

प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९६३

सर्व हक्क सौ. उमा नेरुरकर यांचेकडे

मुद्रक : वि. सी. बोले
नवयुग प्रिंटिंग प्रेस,
रा. ब. सी. के. बोले रोड,
मुंबई २८.

REFBK-0013067

# पाऊल उचलण्यापूर्वीं

माझें पहिलें पुस्तक प्रसिद्ध होण्याचा योग मला माझे परम मित्र श्री. वामनराव भट यांनीं आज प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या 'अभिनव प्रकाशन'तर्फे माझा हा लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध व्हावा ही माझी एक तपाची इच्छा त्यांनीं आज पूर्ण केली आहे याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

गेल्या सोळा वर्षांत लिहिलेल्या सोळा लघुनिबंधांचा समावेश 'अनवाणी चाल' मध्यें झाला आहे.

'मौजे'त सतत कांहीं काळ मी लघुनिबंध लिहिले, श्री. पु. भागवतांच्या माझ्यावरच्या लोभामुळें. अनंत अंतरकरांच्या 'हंस' मध्यें कांहीं लेखन त्यांच्या माझ्यावरील वडीलकीच्या आपुलकीमुळें घडलं. 'सह्याद्री' व 'केसरी'त मला स्थान देणारे व माझ्यावर अकृत्रिम जिव्हाळ्याने आपल्या स्नेहाचा वर्षाव करणारे माझे थोर स्नेही श्री. ल. ना. गोखले यांनी मला माझ्या निष्क्रियतेंतून लिहिता केला.

प्रा. म. ना. अदवंतांनी माझ्या 'अनवाणी चाल' चं 'स्वागत' केलं आहे. त्यांची माझ्यावरील स्नेहभावना मला मोलाची वाटते.

मुखपृष्ठावरील चित्राची कल्पना गोवा मुक्तिसंग्रामांतील त्यागी नेते, चित्रकार व माझे एक जिवलग मित्र श्री. गिल्बर्ट रिबेलो यांची आहे.

गोमंतक मुक्ति संग्रामांत नेहमीच आघाडीवर राहून तलवारीप्रमाणे आपली लेखणी झिजविणारे 'प्रदीप' या दैनिकाचे संपादक जनार्दन शिंक्रे माझ्या 'अनवाणी चाली'त मला भेटले याचा मला अभिमान वाटतो.

मला आपलें स्नेहजीवन देणारे व नेहमीच धीर देऊन उपकृत करणारे माझे सुहृद् कथाकार श्रीराम कामत, नाटककार विजय तेंडुलकर, 'वीणा' कार उमाकांत ठोमरे व 'युसिस'चे प्रभाकर लाड व जयवंतराव दळवी यांची सोबत मला 'अनवाणी चालीं'त मिळाली हें केवढें भाग्य!

लघुनिबंधाच्या क्षेत्रांत इथवर ही चाल तर मी चाललों आहें...

अजूनही कांहीं टप्पे मी गांठीन अशी उमेद पण मी बाळगून आहें.

प्र. श्री. नेरुरकर

अनुक्रम :

१ अकाली मृत्यु
२ दोन फुलें
३ जादूचीं नांवें
४ मूर्खांची बाजारपेठ
५ क्षणभंगुरत्व
६ मांजर आणि आधुनिक स्त्री
७ अनवाणी चाल व जुनेंच जुनें
८ नव्या इमारतींतील नवे भाडोत्री
९ मुंगी, माकड आणि मनुष्य
१० सनई
११ काल आणि क्षण
१२ न लिहिलेलीं पत्रें
१३ माझी पुस्तकें व फुकटे
१४ बिन कर्जवाले लोक
१५ सुटले माघामधले वारे
१६ ये पहांटेचा तारा गगनी

ज्यांचें स्वतःचें जीवन ही एक अखंड अनवाणी चाल होती.

ज्यांची साधना सांदीपनी तुल्य होती—

ते माझे आजोबा—

ती. स्व. कै. निळकंठ बाळाजी नेरुरकर—

आमचे बाबा

यांच्या पुण्य स्मृतीस—

मराठी ... ग्रंथ
दा. क्र. 930६७

# स्वागत

लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार मराठी वाङ्मयांतून आज जवळजवळ नाहींसा झाल्यासारखा वाटतो. कांहीं मूठभर लेखक सोडून दिले तर हा प्रकार फारसा कुणीं यशस्वी रीतीनें हाताळला नाहीं किंवा सातत्यानें कुणी त्या साहित्यप्रकाराची उपासनाहि केली नाहीं. फडके, खांडेकर, काणेकर, दांडेकर आदि लेखकांनीं हा प्रकार कांहीं काळ नांवारूपाला आणला-पण त्यांनीहि पुढेंपुढें या प्रकाराची उपेक्षा केली. लघुनिबंधाचें स्वरूप अतिशय तरल व अतिशय फसवें असतें व प्रत्येक लेखकाची चटकन् एकादी विशिष्ट चाकोरी निर्माण होते हे त्या उपेक्षेचें एक कारण असावें. कदाचित् या माध्यमांतून व्यक्तिमत्वाचा आविष्कार केल्यानंतर त्या आविष्कारालाहि हळुहळू मर्यादा पडूं लागलेल्या असाव्यात. त्यामुळें यशस्वी लेखकाला कलेचें माध्यम म्हणून हा प्रकार फारसा मानवत नसावा. पुष्कळदां ललित साहित्याच्या इतर क्षेत्रांत विहार करणारे साहित्यिकच चाळा म्हणून या प्रान्तात प्रवेश करतात—आपली कांही तरी छाप उठवून जातात व पुन्हा आपल्या माध्यमाकडे वळतात. म्हणून आज जर लघुनिबंधाचा इतिहास पाहिला तर कादंबरीकार, कथालेखक, कवि आणि निबंधकारही या क्षेत्राकडे मधून मधून आकृष्ट झालेले आढळतात. पण त्यांपैकीं फार थोडे या क्षेत्रांत स्थिर झाले.

प्रत्येकाला लघुनिबंधाविषयीं वाटणारें आकर्षण व त्यानंतर त्याची होणारी उपेक्षा याचें कारण लघुनिबंधाच्या स्वरूपांतच असावें—Loose sally of the mind अशी या प्रकाराची केलेली व्याख्या तशी अतिशय सोयीची आहे. त्यामुळें या प्रकाराला तंत्राच्या मर्यादा पडत नाहींत. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा खेळकर व प्रसन्न आविष्कार लघुनिबंधांत असणें आवश्यक आहे. भावगीताखेरीज किंवा आत्मचरित्राखेरीज साहित्याच्या इतर प्रकारांत व्यक्तिमत्वाच्या आविष्काराला इतका वाव क्वचितच मिळतो. आत्मचरित्र लिहिण्याइतकी प्रत्येक कलावंताला परिपक्वता आलेली असतेच असें नाहीं व आत्मचरित्रांत आत्माविष्काराला सत्याच्या मर्यादाहि पडतात. त्यामुळें लघुनिबंधाचे आकर्षण

साहित्याच्या विविध क्षेत्रांत वावरणाऱ्या प्रत्येक कलावंताला वाटत असते. आपल्या आवडीनिवडी, आपले विचार, अनुभवांतून स्फुरलेलें चिन्तन, इत्यादि अनेक गोष्टींच्या खेळकर आविष्काराला लघुनिबधांत जितका वांव मिळतो तितका इतरत्र मिळत नाहीं. सत्याबरोबर काल्पिताशीहि लेखकाला चाळा करतां येतो व जीवनांतील अनेक सौंदर्यस्थळें त्याला टिपून घेता येतात. भावगीतांत आत्माविष्काराला वाव असला तरी त्यांत येणारें गांभीर्य लघुनिबंधांत अपेक्षित नसते. भावगीतांत उत्कट भावनांचे क्षण टिपले जातात तर लघुनिबंधांत विविध पातळीवरून घेतलेल्या अनुभवांना वाव असतो व भावनांबरोबर चिन्तनशील मनोवृत्तीचें चित्रणहि लघुनिबंधांत होते.

या आविष्काराचे स्वरूप व्यक्तिप्रमाणें बदलते म्हणून लघुनिबंधाचें तंत्र बनूं शकत नाहीं. मित्राशी हंसत खेळत गप्पा मारतांना प्रत्येक व्यक्तीची बोलण्याची पद्धति व ढंग निरनिराळा नसतो का? लघुनिबंधाचें तसेंच आहे. व्यक्ति तितक्या शैली हे जितकें खरें तितकेंच व्यक्ति तितके लघुनिबंध हेंहि खरें ठरावयास हवे. आपण प्रा. फडके, खांडेकर, काणेकर, ना. मा. संत यांचे लघुनिबंध वाचूं लागलो म्हणजे आत्माविष्काराची प्रत्येकाची पद्धति किती भिन्न आहे याची कल्पना येऊं लागते. केवळ आविष्कारच भिन्न आहे असें नव्हे तर त्याचे अन्तरंगहि प्रत्येकाचे स्वतंत्र असें आहे. प्रा. फडके यांच्या लघुनिबंधांत आपणाला प्रा. फडके दिसतात, काणेकरांच्या लघुनिबंधांत काणेकर दिसतात— एकाचा लघुनिबंध दुसऱ्याच्या नांवावर खपविता येण्यासारखा नाही, इतका निराळेपणा प्रत्येकाच्या लघुनिबंधांतून आहे. लघुनिबंध लिहावयास अतिशय कठिण आहे याचें कारण हेंच. स्वतःचे असे विश्व लेखकाला त्यांत निर्माण करता यावयास हवे— त्यासाठी त्याचें व्यक्तिमत्व संपन्न हवें— जीवनांतील विविध अंगांचे वेगवेगळया पातळीवरून अनुभव घेण्याचे सामर्थ्य हवे व चिन्तनशील मनोवृत्तीतून निर्माण झालेला जीवनविषयक स्वतंत्र दृष्टिकोनहि हवा. हें अतिशय कठिण आहे. ज्याला तें जमलें त्याचेच लघुनिबंध यशस्वी झाले— ज्याला ते जमले नाही त्याचे लघुनिबंध म्हणजे शब्दांचा व कल्पनांचा केवळ कृत्रिम फुलोरा झाला.

लघुनिबंधाचें परिवर्तन आज ललित निबंधामध्ये व्हावयास लागले याचे कारण तेंच असावे. वास्तविक लघुनिबंध ललित निबंधापेक्षां अनेक दृष्टींनी भिन्न आहे. लघुनिबंधांत लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा आत्मनिष्ठ आविष्कार असतो तर ललित निबंधांत त्याच्या व्यक्तिमत्वाचा वस्तुनिष्ठ आविष्कार असतो. 'गोपुराच्या प्रदेशांत' या सारखे आजचे प्रवास-वर्णनात्मक निबंध, किंवा 'व्यासपर्व' 'ऋतुचक्र' यामधील निबंध हे ललित निबंधाचे उत्कृष्ट नमुने आहेत. लघुनिबंधाची जागा ते घेऊ शकत नाहींत. त्यामुळें साहित्यांत लघुनिबंधाचे स्वतंत्र असें स्थान निश्चित मान्य करावयास हवे. त्याची निर्मिति मंदावली आहे याचें कारण ललित निबंधांत तो रूपान्तर पावत आहे हें नव्हे, किंवा आज लघुकथेच्या कक्षा रुंदावत जाऊन त्या लघुनिबंधाच्या कक्षेशीं भिडत आहेत हेंहि नव्हे, तर लघुनिबंधाला आवश्यक असणाऱ्या वृत्तीचा व व्यक्तिमत्वाचा लेखकाच्या ठिकाणी दिसणारा अभाव हे तरी असावे किंवा आज प्रत्येक कलावंत आपल्या निवडलेल्या कलेच्या माध्यमाला इतका चिकटून बसला आहे कीं त्याला दुसऱ्या माध्यमांतून आत्माविष्कार करणें बरोबर वाटत नसावे व म्हणून तो तिकडे वहात नसावा हे तरी असावें. आणि तरीहि मधून मधून लघुनिबंध लिहिले जातात, त्याचे संग्रह प्रकाशित होतात व अद्यापि हा वाङ्मयप्रकार थोडाफार जीव धरून आहे याची साक्ष ते देतात. 'अनवाणी चाल' हा लघुनिबंध संग्रह त्याची साक्ष निश्चितच देईल.

वास्तविक श्री. नेरूरकरांच्या लघुनिबंधांच्या लेखनकालाकडे पाहिले म्हणजे या प्रकाराची किती उपेक्षा होत आहे याचीच पुन्हा एकवार जाणीव होते. कारण यांतील पुष्कळच लघुनिबंध १९५० च्या पूर्वी लिहिलेले आहे. 'लघुनिबंध' या वाङ्मय प्रकाराला ज्या काळांत मागणी होती त्या काळांत हे लघुनिबंध लिहिले गेले आहेत—त्यानंतर त्यांनीहि या प्रकाराची उपेक्षा केली असावी अशी शंका येते. पण लघुनिबंधकाराला लागणारे गुण त्यांच्या ठिकाणीं आहेत याची साक्ष हा लघुनिबंधसंग्रह निश्चित देतो आणि म्हणूनच आशावादीपणानें पुन्हां त्यांच्याकडे पहावेसें वाटतें.

'अनवाणी चाल' यामधील मला आवडलेलें वैशिष्ट्य म्हणजे त्यांत लेखकाचें पडलेलें स्वच्छ व नितळ प्रतिबिंब. लेखकाच्या व्यक्तित्वाच्या विविध पैलूंची ओळख लघुनिबंध वाचतांना होत जाते व लेखकाचें चित्र वाचकांच्या मनापुढें हळूहळू स्पष्ट होऊं लागते. या गृहस्थानें खूप अनुभवलेलं आहे, खूप दुःख भोगलं आहे, खूप हालांत व अपेष्टेंत दिवस काढले आहेत आणि प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर देण्यांत याची पुष्कळ शक्ति खर्च झाली आहे हें या संग्रहांतील लघुनिबंध वाचत असतांना सतत जाणवतें. पण अशा प्रतिकूल परिस्थितींत व हालअपेष्टांत त्याच्या चेहऱ्यावरचें हास्य कधीं ढळले नसावे आणि अन्तःकरणांतील आशावादाची ज्योतहि सतत जागत असावी हेहि त्याबरोबरच जाणवते. दारिद्र्याचे व निराशेचे चटके बसत असतांनाहि त्यांची मिष्किल वृत्ती जागृत असते व त्यांतूनहि विनोदस्थळें शोधत असते. त्यांच्या या आशावादी व खिलाडू वृत्तीचें या लघुनिबंधांतून होणारें दर्शन मोठें विलोभनीय वाटतें.

'अनवाणी चाल व जुनेच जुतें' या व 'नव्या इमारतींतील नवे भाडोत्री' या लघुनिबंधांतून त्यांच्या या वृत्तीचा प्रत्यय येतो. जुने जुतें तुटून निरुपयोगी झाले आहे, एकुलता एक हातधुणीचा अंगरखा व अर्धी चड्डी या पलीकडे दुसरे कपडे परिधान करावयास नाहीत अशा स्थितींत अद्यावत् पोशाख केलेले लेखकाचे मित्र त्याच्याकडे आले असतांनाहि त्याची मनोवृत्ति विचलित होत नाही — त्यांच्या गप्पांच्या मैफली रंगतात, जीवनांतील आनंदाचा त्यांतूनहि प्रत्यय येत जातो. प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देणाऱ्या अनेकांची स्मृति लेखकाचे समाधान करते. नव्याच्या आशेवर व जुन्याच्या स्मृतीवर ( आणि स्निग्धजनांच्या सहानुभूतीवर ) अनंत योजनें अनवाणी वाटचाल करण्याची लेखकाची उमेद त्याच्या स्वभावांतील उमद्या व आशावादी वृत्तीचें दर्शन घडविते. 'नव्या इमारती व नवे भाडोत्री' मधील अनुभवहि याच प्रकारचे आहेत. मुंबईला नोकरीनिमित्त आल्यानंतर जागा न मिळाल्यानें स्वतःचे झालेले हाल लेखकानें हंसत खेळत वर्णन केले आहेत. मानवी मनाचे कितीतरी नमुने यांत सहज जातां जातां रंगविलेले आढळतील ! सुरवातीला

झोपण्यासाठीं पलंग देणारे मित्र पुढें पुढें लेखकाची पलंगाखालीं झोपण्याची तयारी असूनहि त्या गोष्टीला विरोध करूं लागतात. जविश्वकंठश्च मित्रांना मुंबईत जागा नसलेला मनुष्य अडगळ भासूं लागतो. नवीन इमारतीचें बांधकाम सुरू झालें कीं त्यांत जागा मिळविण्यासाठीं अनेकांच्या कारवाया सुरू होतात. त्यावेळीं ज्याला त्यांत जागा मिळते तो इतरांकडे तुच्छतेच्या दृष्टीनें बघूं शकतो —मानवी स्वभावाचे हे नमुने दिसत असतांनाहि व जागा मिळविण्याच्या कामी निराशा पदरीं आल्यावरहि लेखकाचा आशावाद नष्ट होत नाहीं किंवा कुणाबद्दल त्याच्या मनांत कटु भावनाहि येत नाहींत. उलट जीवनाच्या अव्यक्त सीमा ओलांडण्यासाठीं चाललेली त्याची धडपड चार भिंतींच्या मर्यादांनीं कधी काळीं स्थगित होण्याची भीति बाळगायचं आतां कारण उरलं नाहीं असं त्याला वाटतं. 'अनंत अमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा। किनारा तुला पामराला ॥' या कुसुमाग्रजांच्या वचनाची त्याला आठवण होते व नव्या उभारल्या जाणाऱ्या इमारती ( त्यांत जागा मिळण्याचा सुतराम संबंध नसतांना सुद्धां ) त्याला अधिकच प्रिय वाटूं लागतात.

जुन्या स्मृति लेखकाला अनेकदां अस्वस्थ करतात व त्याला भूतकाळांत नेतात. त्या विलोभनीय काळांत वावरतांना त्याच्यांतील कवि जागा होतो. जुन्या घटना अतिशय काव्यात्म रीतीनें तो रंगवूं लागतो. सनईचं संगीत त्यांना असंच अनेकदां अस्वस्थ करतं. सनईचा सूर ऐकला कीं बालपणांतील साऱ्या स्मृति उफाळून वर येतात. शंकराच्या देवालयाच्या आवारांतील त्यांचं मातीचं घर-त्यांत पहाटे कर्णरंध्रांत निनादणारे आजीच्या भूपाळीचे सूर-त्या पाठोपाठच शंकर वाजंत्र्याचे कानावर येणारे सनईचे संगीत, शंकरच्या सनईची जादू नकळतच त्यांना अस्वस्थ करते व हळुहळू त्यांच्या भोंवतीं त्यांच्या भावनांचे वलय फेर धरू लागते. वाचकहि त्याच धुंदींत हळुहळू एकरूप होऊं लागतो. शंकरच्या सनईच्या संगीताची बेहोषी त्यालाहि जाणवूं लागते-आणि लेखकाप्रमाणें तोहि अस्वस्थ होऊं लागतो-आणि मग लेखकाप्रमाणें त्यालाहि सनईच्या सुरांत भारतीय संस्कृतींतील चिरंतन कारुण्य, अनंत दिव्यत्व व विशाल व्यापकत्व जाणवूं लागते. मानवसमाजाच्या चिरंतन

दुःख संवेदनाचें अलौकिक असें संवेदन त्यालाहि सावध करते–आणि लेखका-प्रमाणें तोहि क्षणभर व्याकूळ होतो. सनईच्या सुरांत मानवाच्या असीम वेदना पहाणाऱ्या लेखकाला 'कानन,' 'सैगल,' 'जमुना,' 'पंकज' हीं जादूचीं नांवें मात्र आकृष्ट करतात. मायावी कंठाचे जादुगार मादक गीतांनी झुकानेवाली दुनिया भुलवून टाकतात आणि त्याबद्दल लेखकहि बेहोष होऊन जातो. या ठिकाणीं सनईच्या सुरांनी येणारी व्याकुळता नाहीं तर हरित तृणाच्या मखमालीवर बकुल वृक्षाच्या मादक सुगंधाचा आस्वाद घेत वसंतागमनाचं स्वागत करणाऱ्या कोयल कंठांतून 'कुहूकुहूऽ' हें गीत ऐकत असतां अनुभवाला येणारी बेहोषी आहे. काननच्या, सैगलच्या स्वरास्वराबरोबर लेखकाच्या मनांत भावनांची व आठवणींचीं जीं वलयें उठतात त्यांतूनच एक नवी स्वप्नसृष्टि निर्माण होते व त्या सृष्टींत तो आपणाला घेऊन जातो.

जुन्या स्मृतींना निगडित असलेला आणखी एक पैलू म्हणजे प्रिय व्यक्तींबद्दल वाटणारा जिव्हाळा. या जिव्हाळ्याने रंगलेले लघुनिबंध त्यांच्या भावोत्कट वृत्तीची साक्ष देतात–त्या व्यक्तींच्या आठवणीभोंवती अनेक सुख दुःखांचे धागेदोरे गुंफले गेले आहेत. 'दोन फुलें' मध्ये दिसून येणारी घराची विलक्षण ओढ याच वृत्तींतून निर्माण झाली आहे. दोन गुलाबाच्या टपोऱ्या फुलाशी निगडित झालेल्या मधुर स्मृति किती कोमल रीतीनें ते उलग-डून दाखवितात. लेखकाच्या फुलाच्या वेडांत निःसंशय एक मोहक भावविश्व सांठलेलं आढळतं. तीच गोष्ट 'न लिहिलेलीं पत्रें' या लघुनिबंधाविषयीं. आपल्या आवडत्या व्यक्तींना पत्रें लिहिण्याचा गोड संकल्प आपण अनेकदा करतों–पण तो पुरा मात्र होत नाहीं. पण या अपुऱ्या राहिलेल्या संकल्पांतहि कांहीं विलक्षण गोडी साठविली आहे असं तुम्हाला दिसेल. आपलीं पत्रें न गेल्यामुळें रागावून आपल्या प्रिय व्यक्तींनी आपणाला (रागाची का होईना) पण गोड व सुंदर पत्रं लिहावींत व आपणाला तीं वाचायला मिळावींत अशी इच्छा कुणाला होणार नाहीं ! पत्रें न लिहिण्याची सुद्धां कला आहे व त्यांतहि विलक्षण आनंद आहे याची हा

लघुनिबंध वाचतांना वाचकालाही जाणीव होणार नाहीं काय? जुन्या स्मृतींत कांहीं कटु स्मृतीहि आहेत—त्याच्या वेदनाहि अनेक निबंधांतून जाणवतात. अकाली सोडून गेलेल्या प्रिय व्यक्ति-ही एक मोठी व्यथाच नाहीं काय? त्या विद्रूप स्मृतींनीं लेखक अनेकदां अस्वस्थ होतो—

—आणि याच स्मृतींतून त्याच्या चिन्तनशील-कांहींशा निराशमग्न—अशा भावनांची आवर्तं सुरू होतात. त्यापैकी पुष्कळच भाव 'मृत्यू' भोंवती घोटाळत आहेत. मृत्यूच्या भीषणतेनें त्यांना पुष्कळच वेळां खूप अस्वस्थ केलं आहे-खूप निराशहि. निराशवादाच्या आहारीं ते गेले नसले तरी औदासीन्याचे दाट वलय मात्र अशा निबंधांतून निर्माण झालं आहे. 'अकाली मृत्यू' व 'क्षणभंगुरता' हे दोन निबंध या वृत्तीची साक्ष देतील. या दोन्हीं लघुनिबंधांतून लेखक अन्तर्मुख झालेला आहे-मानवी जीवनावर सतत टांगती असलेली मृत्यूची तरवार त्यांना विषण्ण करते आहे—क्षणभंगुरत्वाची त्यांना प्रचीति येत आहे आणि खोलींतल्या दाट अंधःकारांत कवि स्वतःला कोंडून घेत आहे. 'क्षणभंगुरत्वा'चा प्रत्यय घेण्याची कवीची इच्छाच त्याचा हा विलक्षण mood स्पष्ट करते. एकाद्या छायाचित्रानेंहि कवि अस्वस्थ होतो व आपल्या अकाली मृत्यु पावलेल्या प्रिय मित्राच्या मृत्यूच्या आठवणींत गुंगून जातो. लेखकाच्या स्मृतिमंजुषेंत दुःखद क्षणाच्या ओल्या फडक्यांत बांधून ठेवलेल्या स्मृतीची गाठोडीच फार आहेत. ती चाळवूं नयेत म्हणून लेखक विलक्षण प्रयत्न करतो-पण कोणत्या ना कोणत्या निमित्ताचें रूप घेऊन नियति त्या स्मृती जागृत करते आणि कृष्ण-कालांतून पुन्हा कृष्णकालाच्या काळ्याकुट्ट आवरणांत लेखक गुरफटला जातो. तीं जळमटं झाडून, झटकून टाकण्याचा प्रयत्न लेखक करतो-निश्चयहि करतो पण त्यांत त्याला यश येते असें वाटत नाहीं.

अशा या औदासीन्यांतून व कटु अनुभवांतून साकार होत असलेले त्यांचें व्यक्तिमत्व कधीं उपहास व उपरोध यांचा आश्रय घेते व मानवी जीवनांतील विसंगतीचा चित्रें उचलूं लागतें. आधुनिक स्त्री त्यांना भोजराजासारखी वाटूं लागते-अनेक अनुभवांमुळें आधुनिक स्त्रींविषयीं झालेले

विलक्षण ग्रह आपणापुढें उलगडूं लागतात. मानव जातीबद्दल तसा त्यांना आशावाद आहे–मानवी जीवनांतील अन्तीम मूल्यांसाठीं झगडणाऱ्या व बलिदान करणाऱ्या महात्म्यांच्या मूर्ति त्यांच्या डोळ्यासमोर उभ्या राहतात पण त्याबरोबर त्या मूल्यांना पायदळी तुडविणारा मानवहि त्यांच्यासमोर उभा राहतो आणि शेवटीं मानव जात म्हणजे मूर्खांची बाजारपेठ असा निष्कर्ष काढूनहि ते मोकळे होतात पण त्या साऱ्या उपहासांत कटुता मात्र नाहीं. स्त्रीबद्दल–आधुनिक स्त्रीबद्दल–त्यांना वाटणारा रोष सोडला (आतां तो दूर झाला असेल अशी आशा आहे.) तर एकंदर मानव जातीच्या भवितव्याबद्दल ते सश्रद्ध आहेत.

त्यांच्या लघुनिबंधांकडे सामग्र्यानें पाहूं लागलो म्हणजे त्यावर औदासीन्याचे एक विलक्षण पटल पसरल्यासारखे वाटते. त्यांतून लेखक अनेकदां बाहेर येण्याचा प्रयत्न करतो. पूर्वस्मृति त्याला कचित् साद देतात–कचित् औदासीन्याचे पटल अधिकच दाट करतात. पण तरीहि लेखक कटुतेच्या आहारीं जात नाहीं—त्याच्या चेहेऱ्यावरचे मिष्किल हास्य पुसले जात नाहीं—जीवनाविषयीची त्याची श्रद्धा नष्ट होंत नाहीं. त्यांच्या या उदासरम्य व्यक्तिमत्वाचा मोहक, काव्यमय व खेळकर आविष्कार हेंच त्यांच्या लघुनिबंधाचे प्रमुख आकर्षण असें मला वाटते आणि म्हणूनच 'अनवाणी चाल' मला आवडते. मग त्यांच्या लघुनिबंधांत तंत्र असो वा नसो, (लघुनिबंधाला तंत्र असते काय ?) त्याच्यात पाल्हाळ असो, त्याच्यांत कचित् विषयान्तर असो, कदाचित् कलात्मक एकता नसो, मला त्याची पर्वा नाहीं.

'अनवाणी चाल' करतांना स्पर्शानें पायाला होणाऱ्या स्पर्शसंवेदना सुखमयहि असतात, कचित् तापदायकहि असतात, पण जमिनीच्या प्रत्यक्ष सहवासाचा एक विलक्षण आनंद त्यांत असतो. श्री. नेरुरकरांच्या 'अनवाणी चालीं'त तो आनंद आहे. स्वतःच्या जीवनांतील सुखदुःखाभोंवतीं त्यानीं हें सर्व भावविश्व गुंफलं आहे—खूप अनुभवलेल्या, खूप सोसलेल्या अशा संपन्न माणसाचे हे भावनिःश्वास आहेत. आणि म्हणूनच या 'अनवाणी चाली'चं मी मोठ्या प्रेमानें स्वागत करतों.

जळगांव. म. ना. अदवंत

१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ................ वि: ..........
क्रमांक ........................ के दि: ..............

# अकाली मृत्यु

गिरगांव पोर्तुगीज चर्च नाक्यावर धोबी तलावाकडे जाणारी बस पकडण्याच्या उद्देशानें मी ताटकळत होतों. कदाचित मी नाक्यावर जायला आणि बस यायला एकच गांठ पडायची म्हणून नुकताच विकत घेतलेला मासिक भविष्य देणारा 'धनुर्धारी' मी हातांतल्या पुस्तकांच्या पिशवींत तळाला सारून ठेवला होता. माझ्या एका विसराळू मित्राचा चार दिवस माझ्याचकडे पडून असणारा काळा चष्मा डोळ्यांवर चढविला होता. मी नाक्यावर येऊन पोहोंचलों होतों तों एक प्रौढ कुमारी सचिंत मुद्रेनें आधीच उभी होती. कुणीतरी एक मध्यम वयाचा काळा साहेब लगबगीनें रस्ता ओलांडून चर्नीरोडच्या दिशेकडून आमच्याकडे येत होता आणि रॉयल ऑपेराकडे जाणारी बस आमच्या समोरून सरपटत होती. आमच्या बसचा मात्र अजूनपर्यंत कुठेंच पत्ता नव्हता....

पण छे! त्या प्रौढ कुमारिकेकडे मी आशेनं पाहिलं. तिच्या मनगटावरील नाजुक घटियंत्र, तो हात तिनं वक्षस्थळाकडे काटकोनांत धरल्यामुळें सुस्पष्टपणें डोळ्यांत भरत होतं. अकरा वाजायला पंधरा मिनिटें बाकी होतीं. मला कांहीं पैसे उसने मागण्यासाठीं माझ्या एका पोलिस सब इन्स्पेक्टर सुहृदाकडे अकरा वाजतांच जायचं होतं. साडे अकराला तो भेटणार नव्हता. कर्तव्यमूढ होऊन मी ट्रॅम स्टेशनकडे दृष्टिफेक केली. आठ नंबरची एकही ट्रॅम जाग्यावर हयात नव्हती. एव्हांना माझ्या मागें पांचसहा स्त्रिया, सात-आठ टोळभैरव, तीनचार सद्गृहस्थ आणि एक मिलिटरीवाला, एव्हढी गर्दी

झाली होती. मी हताशपणें पिशवीत हात घातला आणि खस्कन धनुर्धारी खोढून हातांत घेतला. तो उघडून भविष्याचं पान वाचण्याच्या बेतांत मी होतों, इतक्यांत पुढून, मागून व भोंवतालून तीन शिका, चारपांच अस्फुट किंकाळ्या आणि ब्रेक लावून बस थांबविण्याचा कर्कश घोगरा आवाज किणकिणून ऐकूं आला. काय झालं म्हणून मी सभोवार पाहिलं. आढळून आलं की बस आमच्यापासून पंधरा पावलं महत्प्रयासानं उभी करण्यांत आली आहे. माझ्याच वयाचा एक कोवळा तरुण बसखालीं सापडून ठार होणार होता.. 'साला'.... आणि पुढेंही कांहीं शिवी दिली गेली असेल कुणाला ठाऊक. आणि दुर्दैवानें ज्यांना हिनं अकाली मृत्युस्नान घातलं असेल त्यांचीं काल्पनिक चित्र माझ्या मनश्चक्षूंसमोरून द्रुतगतीनें विहरूं लागलीं!

अपघातानं आलेला अकाली मृत्यु! किती अभद्र विघटना ही! अनंत आकाशाला गवसणी घालूं शकणारं चैतन्य काळाच्या क्षणिक लहरीनं खुशाल नष्ट करून टाकावं, म्हणजेच अकाली मृत्यु नाहीं का? अवघ्या कांहीं क्षणापूर्वी जीवनाच्या भव्य स्वप्नांनीं ज्याचा उमदा देह उचंबळून निघाला आहे; आकंठ प्रीतिपानानं ज्याचं हृदय बेभान झालं आहे; आशावादाचा दिव्य झोत चक्षुताक्ष चमकून ज्यानं दैनंदिन दुःखाचा विनाश करून पुढें पाऊल सरसावलं आहे; ध्येय, प्रेम, आशा यांची पूर्ति होते हें एकाद्या कवीला आवर्जून विनविण्यासाठीं ज्याच्या ओंठाची पाकळी उन्मीलित झाली आहे; अंधार आणि आपत्तीशीं टक्कर देण्याची पोलादी हिम्मत ज्यानें पैदा केली आहे; मातेचा सुपुत्र म्हणून अभिमानानं ऊर फुगवून ज्याची दृष्टि वधस्तंभाकडे वळली आहे– यमदूतांनीं ज्याला वचकावं; अपशकुनांनीं ज्याला पाहून काळं तोंड करावं; अपयशांनी आपली ओंगळ काया ज्याच्यापुढें भस्मसात् करून द्यावी, त्याला बसचीं रबरीं चाकं विनावकाशांत धुळीला मिळवूं शकतात; आगगाडीची धाव चिरडून टाकूं शकते; ट्रॅमचा फटकारा नेस्तनाबूत करून टाकतो. उमललेलं हास्य मावळून जातं. उन्मादाचा अन्त होतो. आशावादाची ऐट उद्ध्वस्त होते!

मृत्यूच्या या घटनेकडे मी जितक्या उद्विग्नतेनें नजर लावतों, तितक्याच आवेशानं मी मृत्यूच्या कल्पनांनीं आणि मृत्यूवरील काव्यांनीं मोहित होऊन

जातों. Dust thou art and to dust returnest ही ओळ अशा वेळीं माझ्या स्मृतिमंदिरांत निनादून घुमते. हंसरी, चंचल, सुंदर सृष्टी दृष्टी-समोरून अदृश्य होते. घनदाट अंधःकाराचं भयाण कृष्णवलय द्रुतगतीनें सभोवार उत्पन्न होतं आणि वाटतं, 'मृत्यु मृत्यु' म्हणतात तो या दुष्ट तमांत आसुरी आनंदानं बेहोष होऊन हैदोसदुल्ला घालीत आहे. मिल्टनला असंच नाहीं का वाटलं होतं.... त्याचे ते उद्‌गार! सुख किंवा दुःख यांची तमा न बाळगणारा हा अदृश्य पुरुष आमच्या पुराणकर्त्यांनीं अगदींच सौम्य व किंचित सुस्वभावी दाखवावा याचं मला आश्चर्य वाटतं. कदाचित् मृत्यूला दचकूनच त्यांनीं त्याची निंदा केली नसावी!

मृत्यूबद्दल माझा तसा दुराग्रह मुळींच नाहीं. त्याचं स्वागत आम्हीं अवश्य करूं. पण केव्हां? कृतांतकटकामलध्वजा दिसूं लागली आहे, मनींच्या आशा पुऱ्या झाल्या आहेत, तारुण्यांत मुसमुसलेली नवीन पिढी उदयाला येत आहे, "देशाविषयी गोष्टी बोलत जेथें" बसलों होतों तें स्थान स्वतंत्र मायभूमींतील एक झालं आहे, दुःख, दैन्य, दारिद्र्य दूर करतांना आमचा देह झिजून गेला आहे. परवशतेचे दुष्ट पाश तोडून टाकतांना जखमी शरीरानं आम्हीं विजयी झालों आहोंत, आनंद आणि ऐश्वर्य पुनः हस्तगत झालं आहे; अशा रीतीनं दहा गेलीं, पांच उरली असतांना मृत्यूनं येऊन हांक मारली तर कोण अभिमानानं 'ओ' देणार नाहीं? परन्तु करंट्या मृत्यूला विघ्न आणि विनाश यांचा हव्यास इतका जबरदस्त, कीं तो आज बसचीं चाकं होऊन कुणाला चुरडून टाकील, तर उद्यां बंदुकीची गोळी होऊन छाती पुढारून पाऊल टाकणाऱ्या कोवळ्या देशभक्ताचा बळी घेईल! ही मृत्यूची करणी चित्ताचा दाह करते, अव्यक्ताची लालसा भूईला मिळविते, अज्ञेयाची किमया विषारी भासवते. शिवाय मौज ही, कीं या मृत्युसत्रांत निरपराधी आणि निरागस जीवच अधिक बळी पडतात. माझी ताई अशीच वयाच्या अवघ्या विशींत मृत्यूनें आम्हापासून हिरावून नेली. माझ्या दादांना उत्कर्षाच्या ऐन जवानींत कृतिकठोर काळानें बघतां बघतां अनंत अंधारांत केव्हां लोटून दिलं आम्हाला उमजलंसुद्धां नाहीं! सुहासिनी मावशीचं रम्य आयुष्य वैधव्याच्या वणव्यांत उद्ध्वस्त करतांना कोणतं पुण्यकर्म काळानें

उरकलं हें कुणीतरी मला सांगेल काय? हाच अकाली मृत्यु ज्या बसमधून गुप्तपणें विहरत होता त्याच बसमध्यें माझी विचारचक्रं त्याच्याच दिशेनें वेगानें दौडत होतीं.

मृत्यूचा वचक केवढा दांडगा असतो! काळपुरुषाच्या कराल दाढेंत केव्हां भरडले जाऊं याची निश्चिती नसल्यामुळें शिरा तणाणून ओरडत बस ड्रायव्हरनें पुन्हा बसला चालना दिली.

"बिचारीं कुणीतरी मातापितरं कदाचित् एकुलत्या एक पुत्राला आज मुकलीं असतीं. कुणी सांगावं, महाराष्ट्राचा एकादा उदयोन्मुख कलावंत आज कामाला आला असता; किंवा एकाद्या जनताजनार्दन खानावळीचा एक ग्राहक दगावला असता..." त्या बसमध्यें नित्याच्या सफाईनें प्रवेश करूनहि मला त्या बसचा मनस्वी राग आल्यावाचून राहिला नाहीं. वरील विचारांचं मंथन क्षणिक खवळलं असतांहि त्या बसच्या दुष्ट चारित्र्याचा मला वीट आला. या बसच्या कराल चक्राखालीं किती मुंबईकरांची दैवगति चुरडली जात असेल! 'Black it stood as night fierce as ten furies, terible as hell' हे शब्द अशा वेळीं मला खरे वाटूं लागतात. मृत्यूचं मूर्तस्वरूप याहून वेगळं असावं ही कल्पनाच मला बेढब वाटते. कोंवळ्या मार्कंडेयाला वयाच्या सोळाव्या वर्षी मरणाच्या खाईंत लोटूं पाहणारा; तारुण्याच्या उन्मेषी भरांत पत्नीसौख्याचं भाग्य लाभलेल्या सत्यवानाचा सत्यानाश करूं इच्छिणारा, अभिमन्यूच्या अभिमानी पराक्रमाला दुर्जन प्रेमानें नेस्तनाबूत करून टाकणारा मृत्यु काय अजागळासारखा रेड्यावर बसून आणि संतापलेल्या आजोबासारखा मुखवटा पेहरून इतस्ततः वावरत असेल? तत्परतेनें आणि सावधानतेनें जीवितकार्य पार पाडण्याची मानवाला उत्कंठा लागलेली असते. जन्माला आल्यापासून ते जाणं होईपर्यन्त कोण धडपड, कोण धावपळ, कोण आराधना त्याची चाललेली असते.

मी बसमध्यें होतों म्हणून! नाहींतर मृत्यूच्या या विचारांनीं मी भांबावून गेलों असतों. आसपास कुणी नाहीं, एकांड्या खोलींत खुशाल अंग फेकून कुठं तरी अज्ञातांत डोळे लागलेले असावेत, दिवसभराच्या श्रमांनीं श्रांत झालेलं शरीर व मन अंतर्मुख व्हायची वेळ पातली असावी, आणि

मृत्यूभोंवतींच विचारांची गुंफण गोवली जावी. मी बेचैन झालों असतों, किंचित् भीतीसुद्धां वाटली असती मला. तशांत अकाली मृत्यु !

अकाली मृत्यूचा वचक मानवी अंतःकरणाला किती भीषण तीव्रतेनें बोंचत असेल त्याची कल्पना येऊन आतां मात्र मी मनसोक्त हंसतों. माझ्या निस्सीम जिव्हाळ्याच्या एका कविसुहृदाची अशा वेळीं हटकून स्मृति होते. बाविशी देखील पुरी झालेली नाहीं त्याची. त्याच्या ललाटी म्हणे अकाली मृत्यूचा दारुण संभव वयाच्या सव्विसाव्या वर्षी आहे! लहानपणींच या विधिलिखिताची जाणीव कुणी तरी करून दिल्यामुळें मृत्यूच्या विचारांनीं त्याच्या अंतःप्रवृत्ति विशिष्ट स्वरूपानं त्याच्या संभाषणांतून प्रतीत होतात. त्या विचारांनीं आतां म्हणे त्याला अतीव हर्ष होतो, समाधान वाटतं; शिवाय कीट्स, शेलीची परंपरा बालकवीनंतर आपण महाराष्ट्रांत सुरू करूं या कल्पनेनं तो धुंद आहे! तुम्ही त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करूं नका. विधिघटना कदाचित् असेलहि तशी. कुणी सांगावं? पंचविशीची मिजास कायमचीच उतरणार विचाऱ्याची, तसं झालं तर! त्याच्या सांत्वनासाठीं मी जितकी लेखणी झिजविली, तितकी जर दुसऱ्या कामीं खर्च केली असती तर 'मृत्यू' वरील खंडकाव्य एव्हाना लिहून झालं असतं. मात्र आजच मी त्याला पत्र लिहायला बसणार आहे, आणि त्याला कळवळून अशी विनंती करणार आहे कीं-- "मित्रा, विधिघटनेवर तुझा विश्वास असेल तर होणारं कधीं चुकणार नाहीं हें खरंच. कीटस्, शेली किंवा बालकवी यांच्या पंक्तीला तुला तांतडी करून बसवायचं असं विधात्याला वाटत असेल तर तुला गेलंच पाहिजे. परंतु जातांना एकच मित्रकर्तव्य पार पाड. मी तुला जे निरोप तोंडीं सांगेन ते बरीक काळजीपूर्वक लक्षांत ठेऊन अकाली मृत्यूच्या विकल पाशांना बळी पडलेल्या माझ्या जीवाभावांच्या माणसांकडे पोंचते कर--"

अकाली मृत्यूच्या घटनेकडे पाहण्याची दुसरी दृष्टी मला लाभेपर्यंत मी हेंच पत्र पुनः पुनः लिहीत बसेन आणि मग म्हणेन-- "ये मृत्यो ये, तूं यावयाप्रती --!"

(१९४४)

--०--

मराठी ग्रंथ सं . . . . . . . . . . . . . . . यत.
२ अनुक्रम
क्रमांक 98203 तां. दि.

# दोन फुलें

कधीं कधीं मला वाटतें, माझ्या विधवा मावशीसाठीं सुन्दर सुन्दर विविध रंगीं फुलें विकत घ्यावीं. विशेषतः तिच्या अत्यंत आवडीचीं अशी केवडा, शेवंती नी मोगरा प्रथम पसंत करावींत, आणि पसा भरभरून तीं एका कर्दलीपात्राच्या पुडयांतून भरून घ्यावींत. हिरव्या नी तांबडया रंगाचीं मुखपृष्ठं असणारीं जाडीजुडी पुस्तकें सदान्कदा माझ्या हातांत मावशीनं नेहमींच पाहिलीं असल्यामुळें एखाद्या दिवशीं हा भला मोठा पुडा पाहून ती कुतुहलानं विचारील, "प्रभाकर, अरे हें काय ? पुस्तकं कुठं विसरून आलास कीं काय ? आणि हें काय नवीनच हातांतून आणलं आहेस ? ..." मी मिस्कील हसेन नी नाटयपूर्ण अभिनिवेशांत मावशीला हळूच प्रश्न करीन-- "मावशी, ओळख पाहूं हें काय आहे ?" आणि तीन अंक मोजण्याची सवलत देऊन ... "एक ... दोन ... तीन ... मोठयानं म्हणत तो संपूर्ण पुडा हळुवार अंगुलींनीं तिच्या पुढयात उलगडून ठेवीन. फुलेंच फुलें ! शेवंती .. मोगरा .. केवडा ! ! हर्षरोमांचांनीं मावशीचं अंतःकरण थरथरून जाईल. माझ्यावर मातेच्या ममतेची पाखर ठेवणारी मावशी ज्या प्रीतिमय जिव्हाळयानं त्या पुष्पांचा स्वीकार करील तो दिवस

महाभाग्याचाच नाहीं का ? पण ?— तें एक दुःस्वप्न आहे. स्त्री ही क्षणाची पत्नी व जन्माची माता, असे कुणाचे तरी उद्‌गार प्रसिद्ध आहेत. कांहीं हिंदु स्त्रियांच्या जीवनांत या सिद्धांताचा कठोर विपर्यास कित्येकदां आढळून येतो. ती क्षणाची पत्नी आणि जन्माची विधवा असं समीकरण कुणी मांडलं तर अजूनसुद्धां कटुस्मितानं तें कुणीहि मान्य करील.

फुलें आणि मुलें! समसमा संयोग—!! कोकणच्या भाग्यभूमींत जिनं जन्म घेतला आणि वयांत येईपर्यंतचे पावसाळे जिचे तिथं गुजरले त्या व्यक्तीला फुलं आणि मुलं कायमचीं अंतरावीं ही जाणीव अंतरांत उफाळली कीं माझी इच्छा कोलमडून पडते, अशुभ वेदनांनीं नयनांत अश्रुपुष्प उमलतात आणि कोपऱ्यावरील फूल-दुकानांकडे वळलेली पावलं लटलटूं लागतात. कोंकणच्या बाह्यस्मृतीचा चाळा अंतराशों खेळवत मी कुठंतरी एकांतासाठीं पळतों... कोंकण! फुलामुलांचे दिवस!! मृगाचा पाऊस सुरू झाला कीं सहा महिने कोरडे ठणठणीत पडलेले ओढे व नद्या दुथडी भरून खदखदां हसूं लागतात. चैतन्याचा निसर्गसुन्दर आविष्कार भूमीच्या कणांकणांतून फेंसाळून निघतो. शेतकऱ्यांच्या आनंदाश्रूंनी आणि ग्रामवासीयांच्या शुभाकांक्षांनी देवालयाची घंटा गोड निनाद घुमवूं लागते. त्या दिवशीं नौबतीवर पडणारा वाजंत्र्याचा हातसुद्धां अपूर्व मायाजालानें भारलेला असतो. शाळा सुरू होते. फुलामुलांचं हंसरं सान्निध्य हवं तेव्हां हवं तिथें मनमुराद लुटावं या स्मृत्यंतीं माझ्या डोळ्यांसमोर दोन टपोरीं पूर्णविकसित गुलाब पुष्पें लहरूं लागतात आणि कुठून तरी केवड्याचा सोनेरी सुगंध नाकांत दरवळूं लागतो... मागील दारच्या परसांत स्वहस्तांनीं उभविलेली गुलाबांची रोपटीं कालांतरानें नष्ट झालीं ही गोष्ट खरी... स्मृतिशल्यें अशींच असतात नाहीं का? (परंतु त्यावर उमललेलीं तीं दोन गुलाबपुष्पें!) दूरदूरच्या पाउलवाटा अनवाणी पावलांनीं तुडवून आम्ही फुलझाडं पैदा करीत असूं. जेव्हां मला कुणाकडून तरी समजलं कीं रामा सुताराच्या दारांतील गुलाबाची जात कांहीं औरच आहे, तेव्हां आणि त्याच क्षणीं काळावेळेचा विचार न करतां मी धांवत त्याच्याकडे गेलों. कोण मनधरणी केली! हातींपायीं पडलों. दोन जाडजूड फांद्या शेवटीं त्यानें कापून दिल्या...

कुठें ती स्वकष्टार्जित फुलांची बाग अन् कुठं हीं चार पैशाला कर्दलीपात्रांतून दिली जाणारीं फुलं! किंचित् दीर्घावधीनंतर मी रुजविलेल्या त्या रोपट्या-वर हळूच डौलानं डुलणारीं तीं दोन गुलाबपुष्पें, सृष्टींतील सारं चैतन्य, हृदयांतील स्नेहाळ भावनांचा प्रीतिसंचय, अन् पवित्र आकांक्षांचं मूर्तस्वरूप जणूं त्या दोन गुलाबी स्मृतिपुष्पांत अजूनही सामावलंच आहे. असा भास मला वारंवार झाल्यावाचून राहात नाहीं.

कारण प्रीतिरंगानं रसरसलेली तीं दोन्हीं फुलें मी माझ्या हळुवार हातानीं मावशीला अर्पण केलीं होतीं. कुणाचं तरी प्रेम भावनामय हृदयाला सतत हवं असतं अन् कुणासाठीं तरी आपल्या विशुद्ध प्रीतीचो झूल हृदया-तील भावना परत फेडीनं पसरीत असतात. बालजीवनांत माझी माता अन् मावशी या दोघीजणींच्या जिव्हाळयानं मी धुंद होत असें, बेभान होत असें. कुणावर ना कुणावर तरी आत्यंतिक प्रेमानं जीव जखडतो तेव्हांच जगावंसं वाटतं. जीवनाचा साक्षात्कार होतो. "We never Live, we hope to Live–" असं म्हणणारा कवि माझ्या या कल्पनासाम्राज्यांत शुद्ध वेडा ठरल्यावाचून राहाणार नाहीं. बिचाऱ्याच्या जीवनांत अखंड नैराश्याचं भूत त्याला भेडसावीत असावं किंवा तो मुक्त तरी असावा. आणि कधींहि न जगणारा कवि उद्यां जगण्याची मात्र आशा धरतो. किती विचित्र! कधीं काळीं त्याची आणि माझी दृष्टभेट झाली असती तर मी त्याला विचारलें असतें, "महाराज, आपल्या जीवनांत कधीं फुलबाग फुलविली गेली होती काय?" आणि त्याच्या तत्वज्ञानाचं चिरंजीवत्व त्याच्या उत्तरावर मी अजमावलं असतं....!

पण हा माझा अट्टाहासच ठरेल नाहीं का? सारींच फुलं कांहीं माझ्या गुलाबपुष्पासारखी नसतात. कोपऱ्यावर दुकान थाटून बसणारा फुलारी माझ्याच अपेक्षेनें गिऱ्हाईकांची वाट पाहत बसेल हें या इथं –मुंबापुरींत– तितकंच असंभाव्य आहे. नाहींतर स्मृतिपुष्पें ताजींतवानी राहावींत म्हणून पुष्पखरेदीसाठीं समोर ठाकणाऱ्या माझ्यासारख्या गिऱ्हाईकाचा, प्रेतासाठीं वेंचक अन् विपुल फुलें खरेदी करणाऱ्या ब्राह्मणाइतकाच आदर-सत्कार त्यानें केला नसता. फुलें म्हणजे 'व्यापार'; आणि व्यापार म्हणजे

टिच्चून पदरांत पडणारा नफा ! हेंच बिचाऱ्याचं समीकरण असेल. त्या दिवशीं अशाच कोणत्या तरी विचारतंद्रींत मी त्या फूलदुकानासमोर उभा राहिलों. वास्तविक त्या दुकानांतील फुलांची व पुष्पहारांची मांडणी निःसंशय मोहक होती. आंबट, मधुर अन् किंचित दर्पयुक्त असा संमिश्र पुष्पगंध इवल्याशा आसमंतांत विहरत होता. दुकानदारानं मोठ्या आशेनं माझ्याकडे पाहिलं, मी खिसे चांचपले अन् हाताला मिळाली ती अधेली त्याच्याकडे फेंकीत त्याला म्हटलं, "हे आठ आणे घे, आणि त्यांच्या मोलांत अवघीं दोनच गुलाबाचीं फुलें निवडून दे ! मात्र त्यांचा सुगंध अन् टवटवी अस्सल असेल तरच तीं दे !" त्यानें अगदीं अदबीनं करंड्याची हालचाल केली. कांहीं विविध रंगी फुलं हातांत घेतलीं शेवटीं अगदीं निरखून पाहात दोन गुलाबी फुलोरे माझ्यासमोर केले. उसनं हास्य ओठावर फुलवून मी तीं पसंत केली खरीं पण केवढं तरी प्रश्नचिन्ह मला भेवडावूं लागलं– "कुणासाठीं बरं ?"

माझी माता, मावशी, मागची बहीण, मानलेली बहीण हीं सारीं जिव्हाळ्याचीं माणसं आठवलीं. ह्या प्रेमी जनांसाठीं तीं फुलं मला देतां आलीं असतीं तर अवीट आनंदाची माधुरी शतगुणित झाली असती, 'समर्पयामि' या वेदोच्चाराबरोबर आर्यांच्या पूजास्थानांचीं भव्य प्रतिकें गगनविहारी मंदिरांच्या रूपानं कुणाचे विलोल नेत्र दिपवून टाकीत नाहींत ? समर्पणाची ही कल्पना किती हृद्य ! किती मनोज्ञ ! संसाराच्या दगदगीनें विटलेला मानवसुद्धां शेवटीं कुणातरी अव्यक्त, अज्ञात, गूढ शक्तीच्या उपासनेनं आत्मशुद्धीचा मार्ग शोधून काढतो. किंबहुना ही परंपराच नाहीं का आर्यावर्ताची ? अति प्राचीन वैभवसंपन्न आर्यावर्ताचं महान् वैशिष्ट्यच "प्रज्वालितो ज्ञानदीप" हेंच होतं. आत्मन् आणि सत्य यांची प्रचीति समर्पणाच्या दिव्य साक्षात्कारानेंच आर्यांच्या प्रत्ययाला आली होती. विश्वाशीं तादात्म्य पावणं, ब्रह्माशीं एकरूप होऊन जाणं, जळीं, स्थळीं, अंतराळीं स्वतःचं स्वरूप पाहण्याची दिव्य दृष्टि प्राप्त करून घेणं आणि 'सत्-चित्-आनंद–' यानीं प्रगतीचा पल्ला गाठणं–ही 'मानव्याची दिशा' जगत्-जननीच्या धुंद अर्भकांना त्यांनीं विशद करून दिली. मी तीं दोन्ही फुलें

नेत्रद्वय बंद करून अन् दीर्घश्वास अंतरांत कोंडून सहस्त्ररश्मीच्या दिशेनें अंतराळांत उंच उडविलीं असतीं तर–? पृथ्वी, आप, तेज, वायु इ. पंचमहाभूतांना प्रदीर्घ प्रणाम करून मागतिच ध्यानस्थ झालों असतों तर–? तर काय? अल्पावधींत तीं फुलें मोटारीच्या चाकाखालीं वा बुटाच्या तळव्याखालीं चिरडून छिन्नविछिन्न मात्र झालीं असतीं. एकाद्या कवीनं, "रमणीच्या वेणींतून गळलेल्या फुलास पाहून–" नांवाची कविता केली असती. आणि माझं पदपथस्थ ध्यान पाहून कुणातरी कारकुनानं तात्पुरता कृपावंत होऊन एकादा-अर्धा आणा माझ्या पुढचांत भिरकावला असता.

गतस्मृतींतील तीं दोन गुलाबपुष्पें आणि सजीव स्मृतींतील हीं दोन तसलींच फुलें? पुनः नवीन प्रश्नचिन्ह मनश्चक्षूंसमोर स्थिर होऊं लागलं.

मी किंचित् हृदयांत डोकावून पाहिलं. गतवैभवाचा भूतकाळ आणि भावी पराक्रमाचा भविष्यकाळ यांच्या सीमारेषेवर आयुष्याचा जीवनरथ खडा झालेला, दूर दृष्टिक्षेप करावा तर अडचणीचे, आपत्तीचे, पाशवी सत्तेचे दुष्ट पाश करतलामलकवत सामर्थ्यानें स्वातंत्र्यसूर्याचा ग्रास घेण्यास टपून राहिलेले, मागें फिरून पहावें तर हाहाःकार, अनर्थ, अनावस्था यांनीं मायभूमीची विटंबना चालविलेली–माता, मावशी, बहीण यांवर जीवाभावानें केलेलं प्रेम आकुंचित अतएव अपुरें वाटण्याची पाळी येऊन ठेपलेली––

"तेव्हां आम्ही म्हटलें, ही ऱ्हासाची
रजनी केव्हां विरुनी जाइल साची
स्वतंत्रतेची पहाट ती होईल
स्वातंत्र्याचा दिन केव्हां सुचवील?–"

या पद्यपंक्तींनीं अंतरांत काहुर माजविलेलं–कुसुमकोमल भावनांचं स्थान गंभीर रणशिंगनिनादानें पदच्युत करून, त्यांची जागा करडचा शिस्तीनं नी संघटनेनें घेतलेली, अशावेळीं तीं दोन गुलाब पुष्पें प्राचीन आर्यावर्ताचं लुप्त अनुकरण करण्यांत खर्ची पडलीं असतीं तर तो त्य फुलांचा हकनाहक बळीच घेतला असता मी नाहीं कां?

मी निश्चय केला–तीं दोन्हीं फुलें स्वातंत्र्यस्फूर्ति आणि संग्रामदेवता झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या प्रतिमेला मनोभावानें अर्पण करून शुचिर्भूत आकांक्षांची तीव्रता वृद्धिंगत करायची. टिळकपूल ओलांडतांना असाहि एक विचार स्पर्शून गेला, "ज्या लोकमान्यांसाठीं प्रत्यक्ष ईश्वरानें अश्रू गाळले, त्या हिंदभूच्या थोर नेत्यापुढें हीं फुलें मला ओवाळतां आलीं असतीं तर–?" तितक्यांत माझ्या समोरच चालणाऱ्या एका पोक्त सधवेच्या अर्धवट सफेत अंबाड्यांतून दोन शुभ्रवर्णी फुलें गळून पडत होतीं. एक वेडाविद्रा धटिंगण धांवत, धक्के मारीत नि तोंडानें दोन तीन गुलाबशेवंतीचीं फुलें चरचरा चावत चावत विरुद्ध पदपथावर उनाडत होता. आणि माझा स्वतःचाच पाय 'हस्त-रेषा' पाटीवर मांडलेल्या दोन पीतवर्णी फुलांवर पडणार होता.

मी माझी चाल वाढविली. केव्हां एकदां घर गांठीन असं झालं होतं. आज मावशी माझ्या दृष्टिपथांत येणार नाहीं याची खबरदारी मी घेणार होतों. आईची नजर टाळतांना फसवणूक झालीच तर ती हातांतील फुलें शिताफीनें कोटाखालीं कशीं झांकतां येतील याचीहि मी तालीम घेऊन ठेवली. विमल, धाकटी बहीण, पाळतीवर असलीच तर तिला वाटाण्याच्या अक्षता कोणत्या भाषेंत लावायच्या याचाहि पाढा स्वतःशीं पाठ करून ठेवला. खोलींत स्वतःला गुपचूप झांकून घेऊन पुस्तकावरच टांगलेल्या लक्ष्मी-बाईच्या प्रतिमेची अत्यादरें पूजा करून मी तीं फुलें सार्थकीं लावणार होतों ना?

उजव्या तळहाताची सैल मूठ बसवून तीं फुलें मी अलगत झेलून धरलीं होतीं. पाकळी धक्का बसून खिळखिळी होऊं नये म्हणून दक्ष होतों मी. शिवाय माझ्या हातांत सुदैवानें दुसरा कोणताच जड पदार्थ नव्हता. एकादा मित्र भेटेल आणि कदाचित मागणी करील; ओळखीची कुणीतरी तरुणी कदाचित मार्गांत आड यायची; किंवा आकस्मात एकादा उपटसुंभ नातेवाईक सपत्निक रस्त्यांतून चाललेला असायचा. एक का दोन–? अनेक चिंतेच्या कल्पनांनीं आणि कांहींशा काल्पनिक चिंतानीं ग्रस्त होऊन एकमार्गी आणि सावध असा मी रस्ता कापीत होतों. शेवटीं जिन्यांत कसंबसं पहिलं पाऊल

ठरल मात्र–! स्वतःला सावरून घेतलं मी. माझं नेहमीचं कडवं जरा मृदुस्वरांतच आळविलं–" दुर्दम्य होतील आशा आकांक्षा, होतील संग्रामगीतें पुरीं –" एक एक पायरी पायाखालीं घालतांना नजर तीक्ष्ण होत होती आणि कर्णपाकळ्या जागरुक होत होत्या. अभिनयाचा आवेश चढत होता. शेवटची पायरी चढलों नी मावशीचेच शब्द कानावर पडले, "–आज हा आहे तरी कुठं इतका वेळ ? किती आनंद होणार आहे स्वारीला कोंकणांतून आलेलीं गुलाबाचीं फुलें पाहून विमल, प्रभाकरचीं फुलं जपून ठेव हं तो येईपर्यंत–" " अं ?–" मी चरकलोंच–" ही कोकणांतून यावेळींच कुणी फुलं पाठविलीं बरं ?–" नी क्षणांत माझ्या स्मृतिमंदिरांत चक्क उजेड पडला–मामासाहेबांची स्वारी आजच दहा वाजतां बोटीनें कोंकणांतून यावयाची होती. अरेच्या ! मला विसरच पडला होता कीं या साऱ्या गोष्टींचा ! गुलाबाचीं फुलें ? छान... दिवाणखान्यांत ऐटींनं प्रवेश करीत विमलला मोठ्या प्रेमानं मी हाक मारली, "–विमल, ओळख पाहूं मी तुझ्यासाठीं काय आणलं आहे ?" असं म्हणून मी तिला तीन अंक मोजण्याची सवलत दिली. परंतु तिच्याकडून उलगडा होण्याची वाट न पहातां माझी मूठ हळूवार उलगडून तिला नयन-गोचर झालीं– 'तीं दोन गलाबाचीं फुलें !'––

(१९४५)

# ३

# जादूचीं नांवें

काननन, नवाब, सैगल, जमुना पंकज व मोलिना यांच्या नांवांचा उल्लेख करतांना 'आदेश' कारांनीं एकदां 'जादूचीं नांवें' असा शब्दप्रयोग वापरला होता. आणि गडकरी आज हयात असते तर त्यांनीं कदाचित् 'नांवांची जादू' अशी कोटी करून तीच नांवांची गुंफण काव्यरूपांत गुंफिली असती. नांवांची जादू तर खरीच! काननच्या नामोच्चाराबरोबरच त्या स्वरसुंदरीच्या श्रुतिमधुर गीतांचा गंधर्वनिनाद कुणा रसिकाला ऐकूं येत नाहीं? अल्लड, निर्व्याज, अशी 'विद्यापति' मधील अनुराधा कुणाच्या मनश्चक्षूसमोर उभी राहात नाहीं? 'सपनोमें कोई आता है ...' हें गीत गाणारी 'सपेरा' मधील गारुडीण कुणाला आठवत नाहीं?

हिंदु कॉलनींतून रात्रीं दहानंतर माटुंग्याकडे जाण्यासाठीं म्हणून टिळकपूल उतरून खालीं यावं, फूटपाथच्या दुतर्फा डुलणारी वृक्षराई निःशब्द अन् निर्विकार असावी, डाव्या नी उजव्या फूटपाथवरून एखादी दुसरी पाऊल-चाहूल अधून मधून जाणवेंत यावी, केव्हां केव्हां एकादं प्रणयी युगुल आपल्याच आनंदांत गर्क होऊन स्वच्छंद विहरतांना आढळावं, काळोखी रजनी रस्त्यावरील 'म्युनिसिपल' प्रकाशानं अधिकच खुलून दिसावी, अन् अगदीं

त्याच घटकेला तिसऱ्या मजल्यावरून ग्रामोफोनवर गाइलेलं काननचं गाणं कानीं पडावं- 'सपनोमें कोई आता है' संगीतशास्त्र कीं संमोहन विद्या असा प्रश्न विचारण्याची पाळी आल्यावांचून रहाणार नाहीं. स्वर्गांगनेचं गान-सौन्दर्य, गंधर्वकिन्नरांचं स्वरमाधुर्य, कोकिळेचा अवीट गळा, हे सर्व काननच्या हळूवार मुक्तकंठांतून बाह्यसृष्टींत अलगद लहरणाऱ्या गानलहरीपुढें फिकं, निर्जीव, केवळ सामान्य वाटावं ! 'आमरा चाहे न तरल सपन, हालखा सूख... ' असं गाणारा बंगाली क्रान्तिकारकही काननच्या या स्वरमोहिनीनें धूंद होउन स्वप्नसृष्टीवर तरंगण्याची आकांक्षा बाळगीत असावा,

"कुणीतरी स्वप्नमहालांत प्रवेश करीत आहे. . . ."

शद्बांशद्बांत जादू आहे, अर्थाअर्थांत जादू आहे आणि तो व्यक्त करणाऱ्या गान-लहरींत तर जादूगाराचं अस्तित्व भरून राहिलं आहे. नाहीं का हें नांव जादूचं! —' कानन '. . . . कानन, नवाब, सैगल या जादूच्या नांवांनीं किती असंख्य चित्रपटभाविकांना चित्रपटगृहाकडे ओढून नेलं असावं याची कल्पना येऊन या नांवांतील जादू पटल्यावांचून राहत नाहीं. काननची 'विद्यापति' मधील आनुराधेची भूमिका तिच्या अभिनयकौशल्यामुळें सुंदर वठलीच, पण तिच्या गानमोहिनीमुळें तर ती असंख्य हृदयांतील भावमंदिरांत अढळपदावर स्थानापन्न झाली आहे . . ., 'देखत है अब बाट पियाकी, जलसी भरे मोरे नैना . . .' या पद्यपंक्ती तिच्याकडून बाहेर फेकल्या गेल्या कीं शेक्सपीयरची ज्युलिया, कालिदासाची शकुंतला आणि मैथिलीशरण गुप्तांची 'ऊर्मिला' या तिघींच्या निश्वास, अश्रु नी गोड निराशांचं प्रणयवैभव कुणीतरी स्वैर उधळून लावल्याचा नाजूक आभास होत नाहीं काय ? कुणीतरी जादुगार डोळ्यादेखत स्वप्नसृष्टि विरचीत आहे ही जाणीव 'कानन' नांवाबरोबर वृद्धिंगत होत जाते. "नांवांत काय आहे?" असं म्हणणाऱ्या कवीला सुद्धां नांवांत कांहींतरी जादू असते हें पटविण्याचं सामर्थ या नांवांत निश्चित आहे.

जादूची ही तऱ्हा आल्हाददायक तर खरीच ! जग म्हणजे तरी काय? इथून तिथून मायावादाचं मृगजल-इंद्रजाल ! मयसभेंत दुष्ट दुर्योधनाचाच काय तो मनोभंग झाला. त्या भयनगरींत पांडवांचं अस्तित्व बिनधोक राहा-ण्याची व्यवस्था होती. परन्तु जगरुपी मायानगरींत कुणाचंच अस्तित्व अबा-

धित वा शाश्वत राहील याची निश्चिति नाहीं. जादूचा पसारा जणूं अस्ताव्यस्त विखुरलेला! हैमंतिक सृष्टीचा मंदविलास न्याहाळून मानवी मनाचा शीणभार, क्षणभर का होईना, दुर होतोच कीं नाहीं? वसंतागमनाचं स्वागत गीत कोयलकंठांतून 'कुहू कुहू' लागलं कीं कुणाला वाटत नाहीं, हरीत तृणाच्या मखमालीवर खुशाल अंग फेंकून बकुलवृक्षाखालीं बेभान व्हावं? मगाचा पहिलाच पाऊस गंधवतीचा नाजूक सुगंध नाकपुडयांतून दरवळून सोडतो तेव्हां कुणाची चित्तवृत्ति तल्लीन होत नाहीं? . . . क्षणभर . . . फार तर एक दिवस . . . फारतर महिनाभर!! केव्हां ना केव्हां तरी हा केवळ आभास आहे ही प्रतीति येतेंच. 'स्वप्नेंद्रजालसदृशः खलु ईहलोकः' हें पुरातन तत्व पुरेपुर गळीं उतरल्या वांचून राहात नाहीं. संसाराच्या तप्त वाळुवरुन पावलं पडूं लागलीं, भग्न आशांचे स्वप्नाळू मनोरे करुणास्पद रीतीनें कोलमडूं लागले, अन् अंतरंगांत कटु अनुभवांचे उन्हाळी वारे वाहूं लागले, कीं वासंतीक मोहजाल फसवं वाटूं लागतं, पौर्णिमेचा शीतरश्मि दृष्टीदेखत काळवंडतो, ककुंजल पक्ष्याचं अश्रुपान काव्यशून्य अतएव निर्जीव वाटूं लागतं. आणि हें कटू सत्य असूनही विषारी अनुभवांच्या उन्हाळयांनीं होरपळलेला जीव पुनः पुनः या आभासांत विलीन होण्याची, कल्पनासूखावर मनानं तरंगण्याची धडपड करतोच! . . .

'एक दिन जाना रे भाई' या पद्यपंक्तींत केवढा नैराश्यभाव सामावला आहे, परंतु तितकीच बेछुट बेंफिकीरपणाची वृत्ति तींतून प्रतीत होत नाहीं काय! अमावास्येच्या रात्रीं डौलांत डुलणारा काळोख उद्यांच्या अस्फुट चांदण्याची लालूच हळूच निर्माण नाहीं का करीत? अगदीं हीच अवस्था नित्य 'धकाधकीच्या मामल्याची' असं म्हटलं तर वावगं ठरेल का? कुणीतरी दगावतो, गृहजीवनांत विलक्षण वैराग्य क्षणभर तांडवनृत्य करतं. . . . कांहीं काळ लोटला कीं जगरहाटीशीं अपरंपार श्रद्धेनें एकरूप झालेलं तेंच कुटुंब पाहून किंचित् काळ अचंबा वाटतो. पर्जन्याच्या सरीवर सरी कोसळून नदीनाले तुडुंब भरून वाहूं लागतात; आवर्तप्रत्यावर्तांच्या थैमानाच्या सागराच्या कणाकणांतून रौद्र लहरी उफाळुन निघतात; सृष्टीची विपन्नावस्था अत्यवस्थ झालेली आढळून येते . . . पण किती ठराविक मर्यादेपर्यंत! पुन्हां सारं निवळतं आणि चिरंतन रहाटी सुरू होते. तीच ती

गूढरम्य शांतता ! तेंच तें आलटून पालटून दृग्गोचर होणारं रजनीचं श्वेत कृष्ण स्वरूप ! असंख्य जिवाणूंचं तें अज्ञातांत विलीन होणं आणि असंख्य जीवांचा पुनर्जन्म ... ! ही जादूची नजरबंदी जीवनांतील करुणसंगीताला श्रुतिसुखद, स्मृतिविचल माधुरीनं निनादमय बनविते. दनंदिन जीवनांतील छोटयाशा अनुकूल परावर्तनामुळें सुद्धा किती सौख्य प्राप्त होतं. बुद्धिप्रधान महाराष्ट्राची बंगाली नांवांनीं घेतलेली पकड हें एक उत्कृष्ट उदाहरण देतां येईल. पूर्वीच्या त्या पार्वतीबाई आणि यमुनाबाई आतां कुठं आहेत! ते विनायकराव आणि श्रीधरपंत हळूहळू विस्मृतींत गडप होणार अशी चिन्हं दिसूं लागलीं आहेत. " आमचा गोविंदा अजून शाळेतून कसा आला नाहीं?" या विवंचनेपेक्षा " हा शरद आणि ही विभा येणार तरी केव्हां शाळेंतून ?" अशीं वाक्यें विनोदिनी देवरुखकरच्या मुखांतून मृणालिनी गोखले नांवाच्या-तिच्या पोक्त मैत्रिणीला ऐकूं येऊं लागलीं तीं कां? स्टेशनच्या प्लॅटफार्म-वर 'ए प्रभा' या हाकेने बिचकून नजर फेकावी तर तीस वर्षांचे प्रभाकरपंत पंचवीस वर्षांच्या आपल्या कुसुमबरोबर थर्डक्लासमधून उतरतांना पाहा-ण्याची पाळी आलेली आहे. ही वैचित्र्याची संजीवनी हरवडी मनुष्याला गवसते म्हणूनच मायेचा पसारा म्हणत म्हणत जगाबद्दल आस्था, प्रेम आणि आशा वाटून मानवीप्राणी निरंतर धडपडत राहतोच !

हेंच घ्या ना ! मी आतां ज्या खिडकींत बसून लिहीत आहें त्या खिडकीसमोरच एक इराणी रेस्टॉरॉं आहे. तिथें अहोरात्र रेडिओचं संगीत सुरू असतं. रेडिओ कार्यक्रम संपले कीं तेथील इराणी फिल्मी गाण्यांच्या तबकडया सुरू करतो. विशेषतः पंकज मलिक, काननबाला आणि ज्युथिका रे यांच्या गीतांचा रव प्रतिरव सदैव घुमघुमत असतो तिथें. असंख्य रसिक लहान थोर, वृद्ध कुमार, विद्यार्थी नी उपजीवन् सारे एकच गर्दी कर-तात त्या दुकानांत ! मी सुद्धां एक 'आण्याचा चाय्' पिण्याच्या निमि-त्तानें गाणीं ऐकायला जाऊन बसतों ... काननचं 'ऐ चांद छुप ना जाना' ज्युथिकेचं 'मेरे गिरिधरके घर जाऊ' आणि 'ये कौन आज आया सबेरे सबेरे' ही पंकजची स्वरमाला कर्णपथावरून अविरत लहरूं लागली कीं, चित्तवृत्ती बेहोश बनून जातात, विचारांचं दडपण पार झुगारलं जातं, कषायपेयाचा

चिनी चषक थंडावला तरी कांहीं वाटत नाहीं , . केवळ हा मीच नसतों अशा तंद्रींत, तर तन्मय झालेल्या गर्दीतील मी एक असतों. "आऽह" अशी अगणित डोळयांची भाषा जणु मूक बोल बोलतांना ऐकू येते. बिचारे सारेच जण तटस्थ बसून ऐकून घेतात, शीणभार नाहीसा होतो उठावंसें वाटत नाहीं. आणि तरींपण....? थोडयाच अवकाशांत एक एक खुर्ची रिकामी होऊं लागते, पोराच्या "दो आना.... चार आना आरोळया कानावर आदळूं लागतात, त्या संगीताची संमोहनी ओसरूं लागली नसूनही नाईलाजानं जो तो रस्ता सुधारतो, मात्र त्याचं अंतरंग गुणगुणत असेल निश्चित ...."आऽह....कानन.... ती कोकिळकंठी जादूगारीण...."हाय् तें.... ज्यूथिकेचं भक्तिगाणं..." छे... कोण हें सकाळींच येत आहे ... ही पंकजची मस्त इष्कबाजी ! पुन्हा तीं गाणीं ऐकून घ्यायला वेळ मिळेलच हें कुणीं सांगावं. मी पाहातों ना ... कालचे सर्वच चेहरे पुनः दृष्टीला पडतात अहं मला म्हणवत नाहीं. शिवाय आजचे उद्यां दिसतील हेंहीं कसं सांगावं ? मी मग विचार करू लागतों .. कदाचित् वर्डस्वर्थचं तें कडवं रात्रीं अंथरूणाला पाठ टेकतांना या सर्वांच्या मनोमंदिरांत उमटत असेल काय? Daffodils च्या ऐवजीं या गीतांना उद्देशून ते असंच वदत असतींल का ?

" For off upon my couch I lie
In vacant or in pensive mood
They flash upon that Inward eye
Which is the bliss of solitude! "

कारण पहाटेपासून मानवी जीवनक्रम किंचित्हीं विनाबदल पूर्वी प्रमाणेंच चालू होतो. संध्याकाळीं तींच उतरलेलीं तोंडें आतुर कर्णांनीं इराण्याच्या रेस्टॉरांत घुसतात. ते मायावी कंठाचे जादूगार झुकनेंवाली दुनिया मादक गीतांनीं भुलवून टाकतात. आणि मी हंसत हंसत कांहींशा उपरोधिक आविर्भावांत "तीं जादूचीं नावें" ओठावर टिपून ठेवतों ! ! .,..

(१९४६)

४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ... स्थलप्रत.
अनुक्रम ३५३२८ वि निबंध
स्थान ता. नि. १७.

# मूर्खांची बाजारपेठ

"जग म्हणजे मूर्खांची बाजारपेठ!" अशा अर्थाचं सुभाषितवजा वाक्य बर्नाड शॉनीं एकदां उद्गारलेलं मीं वाचलं होतं. शेक्सपीयरनें सुद्धा आपल्या एका नाटकांत जगाचा Stage of fools असा उल्लेख केला आहे. कदाचित् जगाच्या दृष्टिनें मात्र शॉ किंवा शेक्सपीयर वेडे ठरल्यावांचून राहणार नाहींत. मीसुद्धां जगांतील असंख्य सामान्यापैकीं एक आहे. जगांतील अखिल मानवजातीबद्दल मला अभिमान आहे. "आम्हाला मूर्ख म्हणण्याचा शॉला किंवा शेक्सपीयरला कोणता अधिकार आहे?" असं सर्वांच्या वतीनें त्यांना जोरानें ओरडून मीं विचारलं तर ते काय उत्तर देतील? कदाचित् त्यांचा स्वविधानावरील विश्वास सुदृढ व्हायचा.

एकाद्याची मूर्खपणाची किंवा सुज्ञतेची कल्पना योग्य रीतीनें आकलन झाल्याविना त्याच्या म्हणण्याचा विपर्यासच होण्याचा संभव जास्त. शहाणपणाचा मक्ता कांहीं मूठभर लोकांनाच देऊन ठेवलेला नाहीं. ठाण्यासारखीं इस्पितळं धुंडाळलीं तर मूर्ख लोकांची शिरगणती फार तर करतां येईल! मग शहाण्यांना कसं ओळखावं? माझ्या एका मित्रानें पैजेवर मला सांगितलं होतं कीं वेड्याच्या इस्पितळांतील शेंकडा बरेंच अधिकारी अंतीं वेडे म्हणून ठरलें आहेत. अशा या गूढ मनुष्यस्वभावाचा कानोसा तरी कसा घेणार?

त्यामुळेंच वाटत असूनहि शॉला किंवा शेक्स्पीयरला विचाराअंती मी दोष देत नाहीं. भोंवतालच्या अनेक सुशिक्षित लोकांच्या व स्वतःच्याही दृष्टीनें फार शहाणे अत्यंत सुज्ञ, पट्टीचे विद्वान् ठरलेले दादरवरचे एक डॉक्टर, एकदां राजकारणावर माझ्याशीं चर्चा करू लागले. हळूहळू मला कळून आलं कीं स्वतःच्या दृष्टीनें त्यांची योग्यता याहूनही उच्च दर्जाची होती. जगांत पैशानें वाटेल तें करतां येतें, मोठेपणा विकत घेता येतो, शहाणपणा शिकविता येतो अशी माझी समजूत व्हावी म्हणून त्यानीं वादविवादकौशल्याची पराकाष्टा केली. हाय हाय! शेवटीं जेव्हां मला त्यांच्या लायकीचा अंत (त्यानीं बँकेमध्यें ठेवलेल्या पैशांत) लागला तेव्हां तांतडीनं मीं तिथून पळ काढला.

"लोकमान्यांच्या गीतारहस्यांतील 'कर्मयोगाबद्दल' आपल्याला काहीं म्हणायचं आहे का?" असा मीं त्यांना पळता पळता प्रश्न केला.

"अवश्य!" ते उद्गारले. "अर्जुनानं जेव्हां गीता भीमाला सांगितली तेव्हां त्यांच्या डोळ्यांसमोर स्वतःच्या कुळाचा उद्धारच होता...."

शेवटीं गीतेंतील अनेक अध्याय आपण बालपणीं कसे मुखोग्दत केले होते, त्यांचा इतिहास जेव्हा ते सांगूं लागले तेव्हा मात्र माझ्या कानांना ते असह्य झालं आणि पायांनीं आपोआपच पळ काढला. अजूनहि त्या विभागांतील प्रत्येकाचं डॉक्टरबद्दल मत कायमच आहे. कित्येकदां ते रोग्यासमोर बडबडतात म्हणे—

"मी राजकारणांत शिरलों असतों तर मुंबईचा मंत्री झालों असतों—"

या गोष्टीचा उल्लेख मी माझ्या मित्रासमोर केला मात्र! त्यानें मलाच मुर्खांत काढले व डॉक्टर शहाणा ठरला.

मनुष्याची उत्पत्तीच माकडासारख्या मूर्ख प्राण्यापासून झाली, हें जर खरें, तर स्वभावांत शहाणपणाचा अंश दुर्मिळ असावा, यांत नवल कोणतें? परंतु मर्कट चाळे करूनच मनुष्यप्राणी स्वस्थ राहिला असता तर गोष्ट वेगळी. मनुष्याची व्याख्या करावीच लागली तर असंच म्हणावं लागेल— "प्रौढी मारणारा प्राणी" सुधारणेच्या शिखराला पोंचल्याची घमेंड आज अनेक वर्षें मानवांच्या मुखांतून ऐकूं येत नाहीं काय? युगामागून युगें मागें

पडली. कालच अॅटमयुगाचा प्रारंभकाल सुरू झाला. धर्मयुद्धाचे नियम बशक पायदळीं तुडवून अधर्मयुद्धाची थोरवी म्हणजेच आपल्या शहाणपणाचं प्रतीक, असं मानवाला खुल्या बोलानं गरजतांना ऐकून चित्त विभ्रांत होण्याची वेळा येऊन ठेपली आहे. सहा वर्षांच्या 'न भूतो न भविष्यति' रक्तपातानंतर तरी मानवजात अधिक सुधारली, अधिक शहाणी ठरली, हें कितपत ठासून सिद्ध करतां येईल हा प्रश्नच आहे. इतिहासाची आवृत्ती पुनः पुनः होत असते या म्हणींतही मनुष्यजातीच्या कोणत्या तरी शाश्वत स्वभाववैशिष्टयाचा बोध होतो, असे नाहीं का वाटत? आणि तो शाश्वत स्वभाव मूर्खपणाच्या जवळपासच कुठेंतरी असावा अशीही अल्पावकाशांत निश्चिती वाटूं लागते. नेपोलियनच्याच चरित्रांत दाखला आढळतो. नेपोलियन पराक्रम करून पॅरीसमध्यें परतला होता. लोकांच्या आनंदाला सीमा राहिली नव्हती. रोषणाई, नृत्य, वाद्य, शृंगार करून ते आपला आनंद बेहोष प्रगट करीत होते. नेपोलियनच्या दर्शनासाठीं जनसमूह सागरासारखा : ोटत होता. परंतु 'लिटल कार्पोरल' अत्यंत उदासीन व गंभीर चर्या करून उभा होता. त्याच्या मित्रानं त्याला विचारलं--

"तूं आज आनंदी दिसत नाहींस. ?"

क्षणभर स्तब्ध राहून बोनापार्टनं उत्तर दिलं, "मित्रा, माझ्या दैवाचे डाव उलटले तर हेच लोक उद्या माझं गिलोटीनवर स्वागत केल्यावाचून रहाणार नाहींत–"

बर्नाड शॉबद्दल देखील अशीच एक गोष्ट सांगतात. ऐन तारुण्यांत त्यानें नाटकं लिहिलीं तीं पुस्तकविक्रेत्यांकडे तशींच पडून होतीं. कुणीही त्यांची विचारपूस करीत नव्हता. परंतु एके दिवशीं ज्या वर्तमानपत्रांत शॉ काम करीत असे, त्याच पत्रांत एक मुलाखत प्रसिद्ध झाली. ती मुलाखत 'आमच्या खास बातमीदाराकडून' अशा शीर्षकाखालीं शॉनें स्वतःच लिहिली होती. त्या दोन्ही नाटकांची एका विद्वान परंतु अप्रसिद्ध व्यक्तीनं भरमसाट स्तुति केली होती. दुसऱ्याच दिवसापासून पुस्तक दुकानावर गिऱ्हाईकांची रीघ लागली म्हणे! शॉच्या विक्षिप्तपणाला लोकांचा हा मूर्खपणाच कारणीभूत झाला असावा!

माझ्या मित्रांचा माझ्यावर फार विश्वास आहे. कॉलेजमध्यें मी शिकतों म्हणून आजूबाजूच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना अजूनपर्यंत वाटतं, मी फार शहाणा आहें. मी मात्र मनांत हंसतों. गांवढ्या नकलाकारांच्या डुकराच्या कृत्रिम आवाजावरच लोकांचा अधिक विश्वास बसतो. 'मूर्खपणावर' वाद-विवाद करतांना माझ्या शहाण्या मित्रानं एकदां विचारलं– " मग शहाणा तरी कोण? "

मी उत्तर दिलें,– "मनुष्य सोडून इतर सर्व प्राणी. गाय, कुत्रा, घोडा पोपट, कावळा देखील–" नंतर गाढवाला मूर्ख म्हणणारा मनुष्यच गाढव आहे हें मी माझ्या मित्राला पटवून दिलं. सत्यापेक्षां असत्याकडे ओढा, सन्मार्गाऐवजीं कुमार्गाकडे वळणारीं लोकांचीं पावलं, येशू ख्रिस्ताला मारून नंतरच त्याची पूजा करणारे पाश्चात्य, आणि महात्माजींच्या उभ्या हयातींत त्यांना ढोंगी, असत्यप्रिय म्हणून शिव्या देणारे लोक......!

'शेजाऱ्यावर प्रेम करा' हा ख्रिस्ताचा संदेश ख्रिश्चन बांधवांनीं परस्परांच्या नरडीचा घोट घेऊन साफ रक्तानेंच धुऊन टाकला. केवळ एका राष्ट्राचाच नव्हे तर अखिल मानव जातीचा उत्कर्ष साधूं इच्छिणारा, सत्य-प्रिय व अहिंसेचा मार्ग दाखविणारा महात्मा पुढारी न ठरतां काळ्यागोऱ्यांचा हीन झगडा चेतविणारा ज. स्मटस् शान्तीचा पुजारी मानला जातो. 'कालो ह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ... " असे आर्तरव काढण्याची पाळी भव-भूतीवर शहाण्या जगांत खचित आली नसती.

म्हणूनच माझे हितशत्रू माझा मूर्ख म्हणून निर्देश करतात तेव्हां मी त्यांना शहाणे म्हणतों. कारण उद्याचं जग कदाचित् त्यांनुळेंच माझ्याकडे शहाणपणाचा मक्ता देईल मात्र बिचाऱ्या वामनपंडिताची वाणी विसरतां आली असती तर समाधान वाटलं असतं. त्यानं अगोदरच लिहून ठेवलं आहे. नाहीं कां ....?

" परन्तु मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी––"

## ५

# क्षणभंगुरत्व

प्रातःकालीं अंथरुण सोडतांना क्षणभर जरी मला कल्पना आली असती कीं, सायंकाळीं माझ्या मनाची अशी विचित्र अवस्था होणार आहे, तरीदेखील मी कोणती अशी दक्षता घेऊं शकलों असतों कीं ज्यामुळें या साऱ्या दिवसभरांत घडलेल्या गोष्टी मला बेमालूम टाळतां आल्या असत्या? माझ्या निग्रही व संयमी मनाची पारख पूर्णतया मीच एकला करूं जाणें. असं असूनही आज, आता या सांजक्षणाला मी या विलक्षण मनोव्यथेनं बेचैन झालों आहे. तसं म्हणाल तर मी माझी अभ्यासिका सोडून संपूर्ण दिनकालांत कुठेंच बाहेर फिरकलों नाहीं. फार कशाला, माझ्या जिवश्च-कंठश्च मित्रानें आजच दुपारीं चार वाजतां आमच्या अत्यंत आवडत्या उपहारगृहामध्यें खाण्याचा खास कार्यक्रम ठरविला असूनही व त्यानें काल परवां दोन्ही दिवस जातीनें मला आग्रहाचं आमंत्रण देऊनही.... (हाय! माझ्या वचनभंगाचं प्रायश्चित्त मित्रा, तूं देखील तें सर्व भोगण्यास तयार आहें...) मी माझ्या खुर्चीचा त्याग करूं शकलों नाहीं. क्षणभर वाटतं, हें मी सारं उगाचच केलं नाहीं का?... आणि माझ्या आत्तांच्या विशिष्ट मनोवृत्तीचे सुन्न निनाद जर का तुम्हीं श्रवण करूं पहाल, तर तुमच्या

आश्चर्याला पारावर राहणार नाहीं. कारण जवळ जवळ पहांटेपासून सांज-वारे वाहू लागेपर्यंत स्वतःला स्वेच्छेनं बंदिस्त ठेवणारा हा विक्षिप्त मनुष्य अटळ ठरलेल्या अशा गोष्टी याच कालांत घडल्या असं कां म्हणतो, हें एक मोठ्ठं गूढ वाटेल तुम्हाला !

प्रथम कबूल करा वरं किती घोर बुचकळयांत तुम्हीं पडला आहांत तें ! तुमच्या अंतरंगांची पारख मला यथातथाच आहे, हें प्रारंभींच सांगून मोकळं व्हावं, हें ठीक ! नाहीं तर तुम्हीं माझ्या मूर्खपणाबद्दल माझी कींव करण्याच्या प्रेमळ विचारांत असाल, आणि मी नित्याप्रमाणं मोठा शहाण पणाचा आव आणून तुम्हांला भलते सलते प्रश्न विचारीत राहीन. माझ्या शहाणपणावर जर माझा दृढ विश्वास आहे, तर तुमच्या मूर्खपणाबद्दल मला तुम्हांला कशीं नांवें ठेवतां येतील? पण एक गोष्ट खरी–तुम्हीं माझ्या आजच्या घडामोडींनीं भरलेल्या जीवनाकडे भयंकर उत्सुकतेनं दृष्टी लाव-णार आहांत !

स्वजीवनांत स्वैर संचार करणाऱ्या अनेक अनपेक्षित प्रसंगाची यादी तयार करण्याची कल्पना कित्येक महिने मनांत घोळत असूनही ती प्रत्यक्ष कृतींत उतरविणें मला अजूनही साधलेलें नाहीं व पुढें तसा प्रयत्न मी मुळींच करणार नाही. प्रत्येक बारीक सारीक गोष्टीची वाच्यता करण्याची दुष्ट खोड मी परिश्रमानें नष्ट करून टाकण्याचे हे दिवस आले आहेत. तुम्हां प्रत्येकाचं वास्तव्य सकृद्दर्शनीं जरी काळ, वेळ व दिशा यांनीं मर्यादित अशा एका वर्तुळाकार पृष्ठभागावर असलं, तरी तुमच्या खऱ्या वसतिस्थानाचा सुगावा तुमच्या अंतरंगाचं असं जें निराळंच, परस्पराहून भिन्न असं, जगत् आहे तिथंच मला लागला आहे, असं मी म्हटलेलं जर तुम्हांला पटणार नसेल, तर माझ्या वाटेला येऊन उगाच कालापव्यय कां बरं करतां? माझ्या मनाची अवस्था कशीही झालेली असेना का, तुम्हांला ती जाणून घेण्याचा मुळींच अधिकार नाहीं. अगदीं उघड उघड भिन्न अशा जगांत वावरणारे परकीय आपण... जितके दूर दूर व्हाल तेवढें इष्टच !

कैक वसंतऋतूंचा गंधमय विस्तार उन्मीलित नेत्रांनीं न्याहळला गेला असेल व कैक क्षणाला पाणावलेल्या पापण्या ग्रीष्म ऋतूंत कोरड्या झाल्या

असतील. काल मी जसा होतों तसा आज मी कां नाहीं याचं कोडं उलगडायला असंख्य दिवसरात्रींची उघडझांप व्हावी लागली. आणि म्हणूनच अंतरांच्या गूढगर्भीं, आजच्या या विचित्र मनोव्यथेला फुलविणारी गंभीर विचारांची कारंजीं राजापूरच्या गंगेप्रमाणं अकस्मात् उद्भवत असावींत. खरंच, कोणत्या अशा घडामोडी या बारा तासांत घडून आल्या कीं, मी त्यांच्याबद्दल एवढी उत्सुकता इतरांना लावावी? कदाचित् ती आत्मवंचना तर ठरणार नाहीं ना?

मी कांहीं मोठा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा गुरुदेव टागोरांसारखा विख्यात लेखक नाहीं. उलट मातृभाषेंत फारसं लेखन माझ्या हातून झालं आहे व वाचकांच्या त्याच्यावर उड्या पडल्या आहेत, असंही सुदैवानं कांहीं घडलेलं नाहीं. पण मी स्वतःला बंदिस्त करून घेतलं केवळ स्वतःच्या तुटपुंज्या प्रसिद्ध अप्रसिद्ध लेखनाचा आढावा घेण्यासाठीं. प्रसिद्ध झालेला प्रत्येक लेख या क्षणाला माझ्या सुंदर व सुबक आशा मेजावर मी व्यवस्थित दुमडून ठेवला आहे अन् एका कोपऱ्यांत प्रसिद्धीची तारीख व नियतकालिक नोंदून ठेवलीं आहेत. आणि अप्रसिद्ध लेखांची भेंडोळीं तीं पहा दूर कोपऱ्यांत भिरकावून दिलीं आहेत त्यांतल्या कांहींचे कागद पोस्टांचे शिक्के त्याच त्या जागेवर बसून इतके जिर्णशीर्ण झाले आहेत कीं कांहीं विचारूं नका! माझंच अक्षर पण मला देखील वांचतां येत नाहीं शिवाय संपादकांकडून परत येंण्याची प्रत्येक लेखानें कमाल मर्यादा गांठली आहे! कदाचित् त्यांच्या प्रसिद्धीला नांव देणारे संपादक तामीळ, तेलगू वा इंग्रजी भाषेंच्या प्रांतांत सांपडतील अशी आशा जरी वाटली, तरी त्यांची भाषांतरें करण्याइतकी विद्वत्ता माझ्याजवळ नाहीं. वाईट वाटतं मराठी संपादकांच्या मठ्ठ डोक्याबद्दल! नवीन होतकरू लेखकांना पुढें आणण्याची कला त्यांना केव्हां साधणार कुणाला ठाउक?

आतां सांगा, त्या कोपऱ्यांत जेवढी रद्दी सांठवली आहे तेवढ्या घडामोडी माझ्या मक्या जीवनांत देखील आज घडल्याच कीं नाहीं?

पण आपण त्या अप्रसिद्ध लेखनाची गोष्ट सोडून देऊं समोरच्या मेजावर पडलेले प्रसिद्ध लेख पाहून माझं अंतःकरण अभिमानानं फुगून गेलंच पाहिजे,

असं तुम्हांला नाहीं का वाटत ? वस्तुस्थिती अगदी उलट आहे. कोपऱ्यांत धुळ खात पडलेलीं पुडकीं जितकीं वाचनीय असतील, तितकी देखील आल्हाद-दायक तीं मला वाटत नाहींत. उगीचच मी स्वतःला कोंडून घेतलं. कांहीं तसंच महत्त्वाचं कारण तरी असावं . . . तें नाहींच ! मात्र आतां कारण द्यायला लागलों कीं आत्मप्रौढीचा आरोप माझ्यावर यायचा !

आत्मप्रौढीचा दोष स्वीकारूनही मला माझं वाङ्मयीन आत्मचरीत्र कथन करणंच भाग आहे. संपादकांकडून लेख परत येतात हें अनुभवानें रक्तांत भिनलं असूनही मी प्रसिद्धी पावण्याइतकं लेखन कां केलं या बद्दलची माझी मनोभूमिका नाइलाजानं मला विशद करावी लागत आहे. माझा पहिला लेख मी लिहिला इंग्रजी पहिलींत असतांना. ती एक गोष्ट होती. गोष्टीचं नांव , . . "प्रामाणिकपणाचें बक्षिस! " . . मुलांच्या मासिकांच्या दिवाळी अंकांत ती प्रसिद्ध झाली होती. आतां मात्र वाटतं, कदाचित् शेवटच्या गोष्टीचं नांव न विसरतां मी देईन, 'अप्रामाणिकपणाचें बक्षिस ! '. . . ज्या क्षणाला ऐन दिवाळींत तो अंक माझ्या हातीं आला तेव्हां माझं नांव ( हो नांवच ! . . कारण आतां मी तुम्हांला म्हणून गुपित उघडं करून सांगतों . . . ती गोष्ट मी एका पुस्तकांतून चोरली होती. नंतर तें पुस्तक संध्याकाळीं गावांतल्या तळ्यांत भोंवतीं दगड बांधून बुडवून टाकलं होतं . . ) छापून आलेलं पाहून आनंदाचा ज्वालामुखी कित्येक महिने उसळत होता अन् त्याच्या लाव्हारसांत जो जो कुणी मला ओळखत असे, त्याला बुडून जावं लागे! आज मला आठवतं, बेळगांवाला मी माझ्या काकाकडे त्या सुट्टींत गेलों होतों. माझ्या चुलत भावंडांना तर ती गोष्ट मी पुनः पुनः वाचून दाखविली. आमच्या शेजारी एक पंजाबी डॉक्टर रहात असे. त्याची आम्हाला मोठ्ठी बहीण शोभेल अशी मुलगी सदैव काकीकडे येई. तिला देखील तो अंक मी दाखविला. तिला मराठी येत नव्हतं. पण काकीनं कांहीं तरी तिला हिंदींत सांगितल्यापासून ती मोठ्या प्रेमानें माझ्या पाठीवरुन हांत फिरवी अन् अत्यंत गोड स्मित करी ! त्या अवीट आनंदाचा भर पुढील लेखांच्या मानानं प्रदीर्घ काल टिकला. पण आज त्या लेखांच्या कात्रणाकडे पाहिल्यावर मला पूर्वानूभवाची अंधुक जणीवसुद्धा होत नाहीं ! ती पंजाबी मुलगी मात्र मनश्चक्षूसमोर उभीं राहाते अन् काहीं केल्यातिचं नांव

मला आठवत नाहीं. त्यानंतर मुलांच्या प्रांतांतून मोठ्यांच्या सन्निध माझे कांहीं लेख अवश्य छापले गेले. एका गोष्टीची स्तुति त्या साप्ताहिकाच्या संपादकांनीं किती मनःपूत केली होती तें आठवलं कीं, आज त्याच संपादकांच्या फटकून वागण्याचा कांहींच बोध होत नाहीं.

आतां हा दुसरा लेख पहा. बी. ए. च्या वर्गांत असतांना शरत्‌चंद्र रवीन्द्रनाथ, प्रेमचंद्र यांनीं मला जें वेड लावलं त्याचे प्रतिध्वनि या लेखांत उमटले आहेत. शिवाय तो माझा पहिलाच परकीय अशा इंग्रजी भाषेंत लहिलेला व हिंदुस्तानांतील श्रेष्ठ इंग्रजी साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेला निबंध आहे. माझ्या एका टाइपिस्ट मित्रानें मला नकळतच तो लेख त्या साप्ताहिकाकडे पाठवून दिला. एका रविवारीं मी नित्याप्रमाणं अंक उघडून पहातों तों धक्काच बसला मला. मी त्या मित्राकडे विद्युत् वेगाने गेलों. पण अत्यंत निर्विकार मुद्रेनं त्यानं माझी थट्टाच केली होती माझ्या आत्मविश्वासशून्यतेबद्दल ! दोन दिवसांनीं त्या संपादकांचं भेटीला बोलविणारं कार्ड आलं, त्यावेळीं मनाला झालेल्या गुदगुल्या...? पण त्या आनंदाची स्मृति तेवढी कशी तरी तग धरून आहे. तो भाबडा उत्साह व अल्लडपणा कुणीकडे पसार झाला कुणास ठाऊक ? शिवाय वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या इतर लेखांनीं त्या त्या विशिष्ट क्षणीं विभिन्न हर्षनृत्यें माझ्या जीवनांत केलींत जरूर !... आज मात्र त्यांच्याकडे मी पुनः पुनः पाहूं लागलों कीं, एक-अन् केवळ ती एकच– जाणीव उरांत धगधगून पेट घेते. त्या कोपऱ्यांत पडलेल्या जीर्ण कागदांना काडी पेटवून लावण्याला वेळ फारच थोडा उरला आहे. उलट त्या मेजावर अहंमन्यतेनं विराजमान झालेल्या लेखांची राख कांहीं दिवस उशीरानीं होईल– एवढचं त्या दोघांमध्ये अंतर ! ते अप्रसिद्ध म्हणून त्यांनीं जीवनांतील काहीं क्षण दुखःछायेनें काळवंडून टाकले; हे प्रसिद्ध म्हणून त्यांनीं कित्येक आयु-कण हर्षाच्या सोनेरी किरणांनीं पुनीत केले ! पण त्या साऱ्या क्षणांचं जीवन किती क्षणभंगुर ! त्या क्षणभंगुरत्वाची जाणीव एकाद्या ब्रह्मवेत्याला होणाऱ्या साक्षात्काराप्रमाणें मला आतां, या सायंघटकेला, होऊं लागली आहे,... अन् म्हणूनच ही अशी विचित्र मनस्थिति आवरण्यासाठीं मी अंतर्ज्ञानीं असतों तरी सुद्धां कांहींच करूं शकलों नसतो ! मात्र तत्क्षणींच या जाणीवेच्या भंगुरत्वाची

सुद्धां योग्य कल्पना असल्यामुळें त्याबद्दल मला खेद वा खंत अशीं मुळीच वाटत नाहीं, "दुःखेषु अनुद्विग्नमना सुखेषु विगतस्पृहः" असंच कांहीं तरी अंतरार्णवांत उफाळत असावं. क्षणभंगुरत्वाची जाणीव जितकी तीव्र तितकीच ऐहिकतेबद्दल दृढ अनासक्ति वाटू लागते. भविष्यकाळाबद्दल मी उदासीन आहें असा याचा अर्थ नव्हे. उलट आजपासून पन्नास वर्षांनीं होणारा माझा सन्मान, गौरव 'साहित्यसम्राट' पदवीनें माझ्या आत्मचरित्राबद्दल उत्सुक झालेलीं जनमनें, माझ्या वाढदिवसाला येणारं महत्त्व हें सारं सुस्पष्ट होऊं लागलं कीं, 'मृतो मा अमृतम् गमय्' या प्रार्थनेचा जबरदस्त प्रभाव माझ्या या अकस्मात् उद्भवलेल्या क्षणभंगुरत्वाच्या कल्पनेचा चुराडा चुराडा करीत आहे, असं वाटूं लागतं. व्यवहारांत वागतांना आढळून येतं, हरएक व्यक्ति कधीं काळीं आपणावर मृत्यूची झडप पडणार आहे याबद्दलच्या पूर्ण विस्मरणाखालीं वावरत आहे. रात्रीं रस्त्यांत शुकशुकाट झाला अन् रस्ते भकास मुद्रेनं उष्ण उष्ण निश्वास सोडूं लागले कीं क्षणभंगुरत्वाच्या प्रत्ययानें जणूं ते घाय मोकलीत आहेत, हेंच अधिक पटूं लागतं. थोर मनुष्यांची नामावळ अशा वेळीं हटकून आठवूं लागते. "थोर महात्मे होऊन गेले चरित्र त्यांचें पहा जरा" या लहानपणीं पाठ केलेल्या काव्यांतील चरण मनांत घोळूं लागतो. असं जरी असलं तरी स्वजीवनाचं क्षणभंगुरत्व कांहीं केल्या विसरतां येत नाहीं. 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत' असं म्हणणारा चार्वाकच अंतिम आदर्श म्हणून मनावर ठसतो. कधीं कधीं अशा विलक्षण मनोव्यथेनं मी पिडीत झालों कीं, मी मानवजातीचा सारा युगायुगांचा खराखोटा इतिहास कल्पनाशक्तीला ताण देऊन मनश्चक्षूंसमोर उभा करतो. जगाचा उद्धार अजून व्हायचा राहिला कसा, हाच प्रश्न मग भुताप्रमाणें भेडसावूं लागतो. महात्म्यांची तेजस्वी परंपरा अखिल मानव जातीच्या उद्धारासाठींच झगडतां झगडतां भूमिमय होऊन गेली. त्यांचीं वाळूवर उमटलेलीं पाउलेंच पुनः पुनः स्वपदाघातांनीं तुडवीत आहोंत आम्ही. तरीही त्यांच्याइतक्या पूर्णत्वाची प्रचीति आम्हांला आलेली नाहीं. "मित्रा माझं ज्ञान या वाळूच्या कणाइतकं सुद्धां नाहीं" असं बोलणारा महर्षि न्यूटन, हेमलांकसारखं जहाल जहर प्याल्यानंतर क्रीटोशीं विनोद करणारा सॉक्रेटिस, शील, प्रज्ञा व समाधि यांच्यांतून अमरत्वाकडे म्हणजेच अंतिम सत्याकडे जाण्यासाठीं सुंदर स्त्रीचा,

स्वपुत्राचा व सार्वभौमत्वाचा त्याग करणारा गौतमबद्ध, 'किं टिटिभू चांचूवरी। माप सुये सागरी । मी नेणतु त्यापरीं । प्रवर्ते येथ' असें विनयोद्‌गार काढणारा अल्पवयीं ज्ञानेश्वर, 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत, ... अभ्युत्थानाय धर्मस्यप्रविष्ट होणारे भगवान श्रीकृष्ण... आत्तां या घटकेला पुनः एकदां पृथ्वीवर अवतीर्ण झाले तर त्यांच्या अंतःकरणांत जो कोलाहल माजेल ..., अगदीं तीच दारुणावस्था माझ्या मनाची झाली आहे, हें आतां तुम्हांला अधिकाधिक स्पष्ट होईल !

ज्या मानवासाठीं त्यांनीं पृथ्वीवर स्वर्ग आणण्याचे मार्ग प्राण पणाला लावून धुंडाळले, त्या मार्गांत नतद्रष्ट मानवांनी कांटेकुटे अन् अन्याय व अधर्माच्या प्रचंड कृष्णभिंती उभाराव्यांत, हें दृश्य त्यांच्या अमर आशावादाला चीत केल्याविना राहील काय ? त्यांना येणारी प्रचीति क्षणभंगुरत्वाचीच नसणार काय ? मॅथ्यु ॲर्नोलडच्या एका भावगीतांतील चरण मी येथें उद्‌धृत केला तर कदाचित् माझं म्हणणं तुमच्या ध्यानांत येईल ...

...Only the thoughts,
Raised by the objects he passes, are his...

त्या महात्म्यांना असा पुनर्जन्म घेतां आलाच तर या वेळीं त्यांना नवीनच बोध होईल. त्यावेळीं स्वजीवनाच्या क्षणभंगुरत्वाचा छडा त्यांना लागला असेल, या वेळीं स्वतःची स्वप्नं ध्येयं व आकांक्षा यांच्या क्षणिक अस्तित्वाबद्दल त्यांची खात्री पटेल. ज्यांच्यासाठीं त्यांनीं एवढी यातायात केली तो प्राणिवर्ग पूर्वीं जसा होता तसाच आज आहे. फक्त बाह्य स्वरूप बदललं आहे एवढंच !

मग मी ही इतकी रद्दी कां निर्माण केली ! नांव छापून यावं, ही बालपणांतली सदिच्छा त्या कालापुरती रास्तच होती, नाहीं का ? पण आतां केवळ नांव छापून येण्यासाठींच माझी धडपड खास चाललेली नाही. मला जगाला कांहींतरी सांगायचं आहे संदेश, द्यायचा आहे, अशा डौलांत मी टाक उचलतों. माझ्यासारखा पोकळ डौली मीच ! 'असा कोणता साक्षात्कार तुझ्या जीवनांत झाला आहे कीं, मारे तावातावानें तू जगताला नीतिपाठ पढवावेस ! जे महात्म्यांना साधलं नाहीं तें तू ... यःकश्चित मास्तरडा ...?

हं ... जा, निमूटपणं झोंप घे, खा, पी, नीज, ऊठ, हवा तर सिनेमा तमाशा नाचगाणीं डोळ्यांनीं लूटतां येतील तितकी लूट, ... तीन आणे मालेपासून बर्नाड शॉच्या भारी ग्रंथाची हवीं तितकीं पारायणें कर ... पण प्रतिध्वनींचे प्रतिरव विनाकारण उद्धून स्वतःची फसवणूक करून घेऊं नकोस. या दोन दिवसाच्या दुनियेंत जें कांहीं हंसतां येईल तेवढं हसून घे. मग?

"The flower that once has
blown for ever dies ..."

माझ्या खोलींत दाट अंधःकार पसरूं लागला आहे. आणि वरील साद-पडसाद अंतरीच्या गूढगर्भांतून सभोंवार निनादित होत आहेत. ती कोपऱ्यां-तलीं नाकारलेल्या लेखांचीं पुडकीं अन् मेजावरील प्रसिद्ध लेखांची कात्रणं ... सारं कुठं गडप झालं आहे कुणाला ठाऊक ? तुम्हीं या वेळीं माझ्या खोलीवर आलां तरीं मी दार उघडणार नाहीं अन् मध्यरात्र उलटून गेली तरी दिवा पेटविणार नाहीं.... माझ्या अस्तित्वाला तुम्हीं पार विसरून गेला. क्षणभंगुरत्वाचा प्रत्यय मी घेत आहें !

१९४६

६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३२६ वि: निबंध
क्रमांक ............ नों दि: १७-८-६७

# मांजर आणि आधुनिक स्त्री

सहसा माझे कपडे मी स्वतःच धुतों; परंतु कधीं कधीं तें अगदींच जीवावर येतं, अन् अशा वेळीं मी मनाचा हिय्या करून कपडे लॉन्ड्रींत फेकतों. पण, जरी माझे कपडे मी रोज लॉन्ड्रींत टाकण्याचं ठरविलं तरी, असे कितीसे कपडे माझ्याजवळ आहेत कीं, एक ढीग धुवून येईपर्यंत दुसरा धुतलेला विविध कपड्यांचा परीटघडीचा ढीग मीं वापरूं शकेन ? तसं असतं तर...? जाऊं द्या झालं. त्याबद्दल मनमोकळेपणानं बोलायचं म्हणजे मग माझ्या व्यवसायाची थोडीबहुत पछान तुम्हांला करून घ्यावी लागेल, आणि ज्या वेतनांवर मी जगतों त्याचा आढावा घ्यावा लागेल. खरी गोष्ट अशी आहे कीं, मुळीं माझ्याजवळ कपडेच मोजके आहेत. हा आतां पिळवटून ठेवलेला कोट दोन वर्ष नऊ महिने मी वापरीत आहे. हे दोन शर्टस् हातमागावरचे आहेत म्हणून कसेबसे आणखी सहा महिने टिकतील, असं वाटतं. हा पायजमा, व पँट... तीसुद्धां.....! अगदीं नाइलाज झाला म्हणून हे कपडे धुणं भाग पडलं आहे. आतां नळावर जायचं, शेजाऱ्याची बादली उसनी घ्यायची, 'सूर्यप्रकाश' साबणाची वडी शोधून काढायची ... हरे राम ! अशा वेळीं माझ्या अविवाहित जीवनाचा मला मनस्वीं वैताग येतो. स्त्रीची आवश्यकता व महत्त्व

जाणवतं ते आणि कसंसंच वाटूं लागतं. पण त्या विचाराचे वादळी वारे अंतःकरणांत धुडगूस घालण्याचीं ही चिन्हं प्रतीत होऊं लागलीं कीं, मी धूम नळाकडे पळतो व बेशक नळ सोडून सारं ध्यान कपडे जोराजोरानें आपटण्यांत एकत्र करतों !

पण माझं अप्रगट मन कांहीं केल्या स्थिरावत नाहीं. नळाच्या फुसफुसण्यापेक्षांही जोरदार धुसफूस त्याची चालू होते. एकाद्या हट्टी स्त्रीप्रमाणं तें पुनः पुनः बोलूं लागतं,– " किती दिवस हें असं चालणार बाबा ? आज नाहीं उद्या तुला कोणाच्या तरी गळ्यांत माळ ही घातलीच पाहिजे. आणि 'उद्यां' 'उद्यां' असे किती जायचे ? वयाची पंचवीशी सुरू झाली आहे. तिशीच्या पलीकडे गेल्यावर का तुला योग्य सहचारिणीचा लाभ होणार आहे ? वीस पंचवीस मुली तुला आतापर्यंत सांगून आल्या, पंधरावीस उपवर मुलींशीं तुझी दाट ओळख आहे, एकदोन मुलींबद्दल तुझ्या मनांत तसे विशिष्ट भावहि निर्माण झाले आहेत. कां उगाच स्वतःची प्रतारणा करतोस ? ऊठ..... ज्या हातांनीं तूं साबण चोळतो आहेस, त्याच हाताच्या पांच बोटांत टांक धर अन् आईला एक झक्क पत्र खरडून टाक. "आई माझी मुलगी मी निवडली आहे. पुढीस मोसमांत ..." कुणाला विश्वास वाटणार नाहीं इथपर्यंत माझ्या अप्रबुद्ध, अप्रगट मनाची वटवट कशीबशी मी सहन करतों. आणि मग मात्र साखळी ओढून खाडकन् गाडी थांबवावी, तद्वत् दोन्ही दातांच्या कवळींत जिभेच्या पुढचा शेंडा पकडून मी ती जोरानें चावतों. ताडकन् सारी विचारमाला तुटते आणि दुप्पट धडाक्यानं माझं कपडे धुण्याचं कार्य मी चालू ठेवतों.

माझ्या मनांत हा असा मुलींचा विचार आला नि गेला कीं, हळूहळू लहानपणीं आमच्या घरांत पाळलेल्या मांजराची आठवण मला होऊं लागतें. तें मांजर मला मिशा फुटेपर्यंत जिवंत होतं, अन् शेवटीं एकदां एका मोटारींखालीं सांपडून मरण पावलं. आधुनिक स्त्रियांबद्दल विवाहाच्या निमित्तानं व अन्यहि कसल्या कारणानं मी विचार करूं लागलों कीं, कां कुणाला ठाऊक माझी विचारमालिका लहानपणीं पाहिलेल्या त्या मांजराशीं व त्यानंतर अवलोकिलेल्या इतर अनेक मांजरांच्या आठवणींशीं आपोआपच निगडित

होऊं लागते. मला वाटतं, मांजराचा अन् आधुनिक स्त्रीचा हा ऋणानुबंध माझ्या जीवनाची चिरंतन सोबत करणारा ठरणार आहे खास ! सगळी मांजरं असतात तसंच तेंहीं एक त्यांच्यापैकीं हावरं मांजर होतं. कोणतं असामान्यत्व त्याच्याजवळ होतं, असं नाहीं. करडया रंगाचं, पांढऱ्या पायाचं, हिरव्या डोळयाचं, अणकुचीदार मिशाचं, मग्रूर स्वरूपाचं . . . असं थोडक्यांत त्याचं वर्णन करतां येईल. त्याचे ते हिरवट कडवे नेत्रद्वय, अन् त्याची तापलेल्या स्टोव्हवरील वाटोळया तांबडया भडक चकतीची आठवण करून देणारी जीभ . . . हे आतां या क्षणीं अत्यंत स्पष्टपणं स्मृतिसंपुटांत सांपडणारे अवयव होत. घरांतील सर्व लहानमोठया मंडळींनीं त्या मांजराला आंजारण्या गोंजारण्याचे कोण शिकस्तीचे प्रयत्न केले, आणि जोडीला त्याला माणसाळ-विण्यासठीं केलेले माझे हे सर्व खास धाडसी प्रयोग कसे व्यर्थं गेले हे आठवलें कीं कोणतंही मांजर (व त्याजबरोबर कांहीं आधुनिक स्त्रिया) यांच्याबद्दल माझ्या मनांचा संतापानं भडका उडतो. असा एकही क्षण प्रत्ययाला आला नाहीं कीं, त्यावेळीं त्या मांजरानं मोठ्या कृतज्ञ भावानं आमच्या कुशींत आपलं अंग घुसडलं. उलट चोरपावलांनीं ऐंन भोजन समयीं तें प्रगट होई ; व त्यांच पावलीं दुसरा भोजनप्रसंग येईपर्यंत कुठं गडप होई, कुणाला ठाऊक !

आधुनिक स्त्रीचा स्वभाव थेट या मांजरासारखा असतो, असं माझं प्रामाणिक मत आहे. कुणाला हसूं येईल या मतप्रदर्शनाबद्दल. माझ्या प्रतिगामि-त्वाची कित्येकांना चीड येईल. आधुनिक सुशिक्षिता तर तापलेल्या तव्यावर करपलेल्या भाकरीप्रमाणं क्रोधायमान होऊन काळयाठिक्कर पडतील! या साऱ्या गोष्टी जितक्या संभाव्य आहेत, त्याहूनही अधिक असंभाव्य माझ्यामध्यें मतपरिवर्तन घडून येणं हें आहे! आधुनिक स्त्रीमध्यें व मांजरामध्यें असं कोणतं अंतर्बाह्य साम्य आहे कीं, त्यामुळें त्यांची तुलना करण्याला, अगदीं मला नकळत इतक्या सहजतेनें, माझ्या मनानें प्रवृत्त व्हावं? —कां मांजराप्रमाणं आधुनिक स्त्रीला शेपटी असते? तिचे डोळे हिरवे का असतात? आणि ती अंधारामध्यें पाहूं का शकते? मांजराप्रमाणं टोंकदार मिशांची देणगी तिला लाभली आहे का? चार पायांवर चोर पावलांनीं चालण्याचीं क्लृप्ति तिला साधते काय? -एक का दोन? मांजराच्या पंजांत दडून राहणाऱ्या नखांइतकेच फाडफाडूं

शकणारे कित्येक प्रश्न यावर कुणालाही सहज सुचूं शकतील. कदाचित् हा उघड उघड विरोधाभास असेलही. पण मला मात्र स्त्रीमध्यें ( अर्थात आधुनिक ) व मी पाहिलेल्या मांजरामध्यें अशीं अनेक साम्य स्थळं आढळतात कीं, त्यामुळंच मी तिला मांजराइतकीच अप्रबुद्ध व असंस्कृत मानतों.

माझ्या एका हळव्या पण थोर मनाच्या मित्राचं आधुनिक स्त्रियांबद्दल फारच अनुकूल मत आहे. बायरनवर जेवढ्या स्त्रियांनीं प्रेम केलं नसेल, किंवा क्लिओपाट्रेवर जितके सम्राट आषक झाले नसतील, तेवढ्या लांब वेणीच्या व सपाट वक्षःस्थळांच्या आधुनिक ललनांवर त्यानं प्रेम केलं आहे. कुणाला त्यानं आपली बहिण मानली आहे; तर कांहींनीं त्याला प्रियकर म्हणून निवडला! (असं तो नेहमीं कळवळून बोलतो.) या गुंतागुंतींतून कसा मार्ग काढावा हेंच त्याला समजत नाहीं, व ज्या स्त्रीवर त्याचं प्रेम आहे, असं त्याला वाटतं, तीच त्याच्या अगोदर लग्न उरकून त्याला पत्र पाठविते, तेव्हां तो दुसरीकडे वळतो. मी त्याला खूप उपदेश केला कीं ' बाबारे, आधुनिक स्त्री आणि घरींदारीं दिसणारं मांजर यांच्याबद्दल किती आदराचे व प्रेमाचे उद्गार तूं काढलेस तरी मी ते विचारांत घेणार नाहीं. एकवेळ गाढव व मनुष्य यांच्या शहाणपणावर माझा विश्वास बसेल. पण तूं निवेदन केलेल्या तथाकथित उदात्त व निष्कपट हृदयाच्या आधुनिक सुशिक्षितेबद्दल तूं मला कांहींही सांगू नकोस "तो माझे हे उद्गार ऐकून चिडतो व केवळ माझं लग्न होऊं शकत नाहीं, किंवां एखादी ललना माझ्यावर प्रेम करीत नसल्यामुळं, असूयाबद्ध मनोवृत्तीचे माझे उद्गार आहेत, असं तो भडकलेल्या वाणीनं बोलून जातो.

हां, मुलाला जन्म दिल्यावर, मुलाकडे व नवऱ्याकडे सारखंच दुर्लक्ष करणाऱ्या आधुनिक स्त्रीबद्दल तशी अपरंपार सहानुभूति मला सतत वाटत असते. सुगधी पीठानं स्वतःचं थोबाड रंगविणारी व क्वचित सुरम्यानं माश सारख्या डोळ्यांत पाण्याचा आभास निर्माण करणारी, आधुनिक स्त्री कुण सुज्ञाच्या दयेचा विषय होणार नाहीं? तिच्या जीविताचे धागेदोरे जितके बाह्य सृष्टीशीं गुंतलेले असतात. तितकंच तिचं जीवित, अंतःकरणाचीं प्रतारणा स्वगृहाशीं बंधरहित होत असतं. समान हक्कांच्या विचारांनीं तीं बलशाली पुरुषजातीशीं अहंमन्यतेनं मुकाबला देण्याची धडफड चालू ठेवते व स्वतःच्या

पतीपेक्षां पतीचे दोस्त तिला अधिक प्रेमळ वाटूं लागतात. श्रद्धा, माया व पातिव्रत्य या तीन अनमोल अलंकारांची उकिरडयावर रत्न सांपडलेल्या कोंबडयाप्रमाणं ती दुर्दशा करते. व प्रेमाच्या फसव्या तरंगावर हेलकावे खात स्वत:चा अनेक वेळां सोक्षमोक्ष करुन घेते.

म्हणूनच आमच्या पुरुष जातीच्या स्त्रीलंपटपणाबद्दल कधीं कधीं माझा सात्विक संताप मला अगदीं अनावर होऊं लागतो. मद्यपान करणाऱ्या काहीं दारुबाज कवींनी ज्या प्रेमानं दारूचं अद्वातद्वा स्वर्गीय वर्णन करून ठेवलं आहे, त्याचप्रमाणं स्त्रियांच्या आहारी जाणाऱ्या शेंकडा नव्याण्णव पुरुषांच्या लंपट-पणानंच स्त्री ही वरचढ होऊन बसली आहे. परदेशांत कांहीं दिवस वास्तव्य करून मानसशास्त्राचा अभ्यास केलेल्या माझ्या एका विद्वान् मित्रानं, मला आंकडेवार व उदाहरणें देऊन सिद्ध करून दाखविलं आहे कीं, शेंकडा नव्याण्णव सुंदर स्त्रियांपैकीं सर्वच बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें इंदु बिंदु इतक्याच कुरुप असतात. ते ऐकल्यावर स्वत:ला इंग्लंडचा महान् नाटककार मानणाऱ्या शॉवरची माझी निष्ठा अधिक दृढ होऊं लागते. सारा बर्नार्ड नांवाच्या विख्यात नटीनं त्याला एकदां पत्र लिहिलं कीं, तुझं व माझं लग्न झालं तर किती चांगलं होईल ? तुझी बुद्धिमत्ता व माझं सौंदर्य यांचा मिलाफ झाल्या-मुळं आपली मुलं मानवजातीला ललामभूत ठरतील.

शॉनं तिला दिलेल्या उत्तरामुळंच मी शॉला शहाणा समजतों. नाहीं तर त्याच्या वाङ्मयाच्या वाचनानं त्याच्या शहाणपणापेक्षां माझ्या धूर्तपणा-बद्दल मला निश्चिति वाटती ना ? त्यानं दिलेलं उत्तर मोठ्ठं मासलेवाईक व आधुनिक स्त्रीचं अंतरंग उघड करणारं आहे, 'तुझी बुद्धिमत्ता व माझं सौंदर्य असा जर कां गोंधळ झाला तर..माझी जगभर नाचक्की झाल्याविन राहणार नाही-' असं उत्तर त्याच्याकडून तिला गेलं !

आधुनिक स्त्रियांचा दुसरा एक विशेष म्हणजे मांजराप्रमाणंच त्यांच्या-मध्येंही जहाल व मवाळ असे दोन वर्ग कल्पितां येतात. मवाळ स्त्रियांना मी अतिमूर्ख म्हणेन व जहाल स्त्रियांचं वर्णन मी अतिशहाण्या असं करीन. पण या दोन्हीं विशेषणांतील 'अति' हा कॉमन फॅक्टर जर बाजूला काढून ठेवला तर कंसांत आपल्याला असं लिहितां येईल (मूर्ख शहाण्या) किंवा

(शहाण्या मूर्ख)–विरोधाभास त्यांच्यामध्यें व मांजरामध्यें या एकाच बिंदूवर होऊं शकतो. कितीही फटकून वागणारी आधुनिक स्त्री चार खुशामतीच्या स्तुतिकवनांनी वश होऊं शकते, मात्र कितीही आंजारलं गोंजारलं गेलेलं मांजर अंती फटकून वागणार, हें ठरलेलंच !

लहानपणची एक गोष्ट मला आठवते. माझ्या गरीब स्थितीमुळें एका सधन व सुशिक्षित निकटवर्ती नातलगाकडे मी शिक्षण घेण्यासाठीं राहात असे. त्याची बायको माझ्या विशेष परिचयाची नव्हती. व ती मला कशी काय वागवील, या शंकेनं कित्येकदां मी व्याकुळ होई, पण तिचा परिचय जसजसा होऊं लागला, तसतशी ती माझ्याबद्दल अधिकाधिक जिव्हाळा दाखवूं लागली. सारे मला विचारीत कीं, मी अशी कोणती जादू केली? साऱ्या शेजारणींशीं नातलगांशीं फटकून वागणारी ती विदुषी माझ्यावर इतकी बेहद्द खुष कां? ... तेव्हांपासूनच म्हणा हवं तर, माझं मन आधुनिक स्त्रियांबद्दल पूर्वग्रहदूषित झालेलं असावं. तिला मी आवडें, कारण तिची सदान्कदा मी अवास्ताव स्तुति करीत असे. तिनं पावडर लावली कीं मी हर्षभरानं बेहोष झाल्याप्रमाणं नृत्य करीं ; तिनं कानांत डूल घातले कीं चाळीस चोरांच्या गुहेंतील रत्नच मला पहायला मिळालीं आहेत, अशा अविर्भावानं मी तिच्याकडे टकामका पाहात राहीं, इतकंच नव्हे, तर तिनं भसाडच्या आवाजांत ‘ अयोध्येच्या राजा ’ तील ‘बाळा कां झोप येईना ’ हें पद म्हणायला सुरुवात केली, कीं झोपेची गुंगी माझ्यावर चढूं लागे. एके दिवशीं मी तिला म्हटलं .., “ आपलं सर्व कांहीं ठीक आहे, पण उंच टाचांच्या बुटांचीच तेवढी उणीव भासते. ” उदाहरणादाखल रस्त्यांतून चाललेल्या कांहीं पारशी स्त्रिया मी तिला दाखविल्या. दुसऱ्यांच दिवशीं तिच्या नवऱ्याला तिला उंच टाचांचे बुट आणून द्यावे लागले आणि त्या रात्रीं आम्हांला पोटभर साखरभात व दुसऱ्या दिवशीं शिरा खायला मिळाला. पण... तिसऱ्या दिवशीं ते बूट आपल्या लठ्ठ पायांत चढवून ती बाहेर चालली असतां जी पाय मुरगळून कोलमडली–त्यावेळीं मी तिथं असायला नको होतं ! पण तशांतही मी तिच्या लवचिक देहाबद्दल स्तुति करण्याचा भित्रा प्रयत्न केला. काय सांगूं ? तिचा राग पार मावळला आणि हंसत हंसत ती गाणं गुणगुणत परत चालूं लागली !

सीता, तारा, द्रौपदी, मंदोदरी, सावित्री या पौराणिक, किंवा जिजामाता, येसूबाई, झांशीची राणी या ऐतिहासिक, अथवा कस्तुरबाई, आनंदीबाई कर्वे, अरुणा असफअल्ली, कै. कमला नेहरू, आणि माझी आई यांच्यासारख्या आधुनिक स्त्रियांची उदाहरणं डोळ्यांसमोर नसतीं तर आजन्म अविवाहित राहून आधुनिक स्त्रियांवर संपूर्ण बहिष्कार घालण्याचं कडक व्रत मी निष्ठेनं पाळलं असतं. स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं ...' असं म्हणणाऱ्या प्राचीन भोळ्या भावड्या संस्कृत कवीला कै. गडकऱ्यांच्या नाटकांतील एका पात्रांप्रमाणं 'स्त्रियांत तेवढी निमकहराम ...' असंच ओरडावसं वाटलं असूनहि, ते कठोर शब्द उच्चारणं केवळ असभ्यपणाचं भासल्यामुळंच त्यानं ती द्वयर्थी काव्यपंक्ती रचिली असावी! इतक्या मुली सांगून आल्यावरहि मी अजूनपर्यंत अविवाहित कां राहिलों, हें आतां तुमच्या लक्षांत आलंच असेल. पण म्हणून कृपा करून असं समजूं नका कीं, मी आजन्म अविवाहितच रहाणार आहें. हल्लीं हल्लीं मी मांजराकडे उपयुक्ततेच्या दृष्टीनं पाहायला शिकलों आहे. या मुंबईंत मांजरं आडवीं जात नाहींत. उंदीरच फार आडवे येतात. अन् आमच्या खुराड्यांत तर उंदरांनीं नुसता धुमाकूळ मांडला आहे! त्यांना हांकलून लावण्यासाठीं इच्छा नसतांनाही मी एक पर्शियन मांजरी पाळली आहे. आणि जोपर्यंत माझें हें कपडे धुणं, अस्ताव्यस्त विखुरलेलीं पुस्तकं नीटनेटकीं न लावणं, वेळींअवेळीं वस्तीला येणाऱ्या मित्रांना पायबंद न घालणं आणि उधळपट्टीच्या वारेमापान आद्यापेक्षां अधिक पैसा खर्च होणं... हें असंच चालूं ठेवणं मला रास्त वाटणार नाहीं, तोपर्यंत लग्नाचें विचार माझ्या मनांत येत राहणारच! आणि कुणी सांगावं ...आज, आतां या क्षणाला ज्या पवित्र स्थळीं बसून मी माझे कपडे धूत आहे, तिथंच कुणीतरी बाईल 'माणूस' पुढील वर्षी, याच व्यक्तीचे कपडे धुण्यासाठीं धडपडत असलेलं कशावरून दिसून येणार नाहीं?

(१९४६)

७

# अनवाणी चाल व जुनेंच जुतें

हें असे माझें नेहमींच होतें. मृग नक्षत्रावर पावसाळ्याकरितां खास एक पावसाळी जुतें आमच्या गांवच्या बाबू चांभाराकडून मी तयार करवून घेतों. पावसाळ्यानंतर दिवाळीच्या मुहूर्तावर एक उन्हाळीं जुतं करून घ्यावं म्हणून मग मी पुनः गांवीं जाण्याची संधि हुडकूं लागतों .'.. केव्हा एकदां दिवाळीची रजा सुरू होते, असं मला होऊन जातं. शवटीं जुनं जुतं जातं नवीन येतं, तें उन्हाळीं कालचक्र सरकतं आणि पुनः पावसाळ्याचा मोसम घेऊन मेघ मृग-पावलांनीं घडघड घरंगळूं लागतो. पण जुनं टाकून नवं जुतं झिजवायला मी कितीहि अधीर असलों तरी जुन्या व नव्या जुत्याच्या दरम्यान असा एक कालखंड येतो कीं ह्यावेळीं माझं जुनं जुतं अगदी जुलुमी जीवन जगतं आणि बाबू चांभार आपल्या थोर कुळपरंपरेला जागून 'आज उद्यां' करीत नवीन जुतं कांहीं नक्की वेळेवर दृष्टीला पडूं देत नाहीं. होतं

काय कीं माझ्यावर येऊं नये त्या वेळीं अनवाणी पायीं चालण्याची पाळी येते. जुनंच जुलमानं झिज झिज झिजविलं तर असं होतं कीं कधी अंगठाच जाग्यावर नसतो, वादीच मधोमध तुटते, दोन्ही पट्टे दुपट्टीनें दोन-दोनदा टाके दिले असूनहि अचूक निसटतात आणि ऐनमध्यावर कुठेंतरी रस्त्यांत ही अवदशा प्राप्त होऊनहि तें जुनेर टाकूनहि देण्याचीं मनाची तयारी होत नाहीं. आसक्ति अधिकच उग्र रूप धारण करते. नवं येईपर्यंत अजुनहि तें आपली निष्काम सेवाचाकरी करील अशी आशावादी उमेद त्या जुन्या जुत्यावर पायांची पकड पुन: पक्की करते. अशा वेळीं खऱ्याखुऱ्या स्थितप्रज्ञ अवस्थेला मी खचितच अनायासें येत असतों. कारण पाऊल पुढेंहि पडत नाहीं व मागेंहि सोडूं नये व धरूंहि नये अशी निर्द्वंद्व मनोरचना देहाला अगतिक बनविते. क्षणिकच ! कुठंतरी दूर मला ओळखीचीं माणसं जवळ येतांना दिसूं लागतात. मी निमूटपणें जुतं सरळ हातानें उचलतों. कडेच्या झुडुपांतलीं मोठीशीं पानें खुडून त्यांत तें गुंडाळतों आणि अनवाणीच चालूं लागतों.

० ० ०

कालचीच घटना पहा ना, चारचौघे मुंबईचे जुने पुराणे मित्र या कोकणभागांत अकस्मात् येऊन ठेपले. त्यांचा मुक्काम आपल्या नातेवाईकां-कडेच होता ही गोष्ट वेगळी. पण संध्याकाळीं पारापर्यंत चांगली दोन-तीन मैल सायंसहल करण्यासाठीं ते माझ्याकडेच आले. आतां पुरी फजीतीची वेळ आली नवे जुतें नकोच, पण जुनेंहि अंतिम जीर्णावस्थेला जाऊन नवी झीज सोसायला एकदम नाकबूल होते. चहा झाला. हवापाण्याच्या दिरंगाई कर-णाऱ्या गोष्टी झाल्या. उगाच आणखी नव्या मित्रांची फालतू चौकशी झाली. त्या प्रत्येकांत मुंबापुरीचा अत्याधुनिक साजशृंगार पायाच्या नखापासून तो शिखांच्या कुन्तलांतापर्यंत सुगंधी दर्प दरवळीत होता. त्यांचे कपडे कडक इस्त्रीचे होते. माझा एकुलता एक अघळपघळ अंगरखा हातधुणीचा व चुरगळलेला होता. सकाळीं न्हाऊन ल्यालेली अर्धचड्डी अर्धांग झाकून तेवढेंच उघडे टाकीत होती, तर त्यांच्या 'पँटी' कोऱ्या करकरीत नवनव्या होत्या. मी एक साधा दुय्यम शिक्षक... तो सुद्धां ग्रामीण भागांतील... टक्केटोणपे

खाल्लेला ; तर ते सर्वच मुंबअींत हपीसांत काम करणारे, पगारदार, ब्लॉक्समधून बेझूटपणें जीवन जगणारे. त्यांच्याबरोबर तीन मैल पदयात्रा करणें म्हणजे कधींहि जपणुकीनें माझ्या बाह्य वेषाकडे लक्ष न देणाऱ्या माझ्या ग्रामबंधूंचें लक्ष माझ्याकडे विरोधात्मक वृत्तीनें ओढून घेणेंच होतं, झालंहि तसंच.

"कां रे बुवा! आतां किती वेळ काढतोस. पड कीं बाहेर..." त्यांच्यांतील एक स्नेही न रहावून किंचित् रागानेंच बोलला. ही वेळ कसोटीची होती. मी मग म्हटलं,

"मी बुवा, हा आहे असाच बाहेर पडतों इकडें! चालेल ना तुम्हांला?" त्या सर्वांनीं अभिजात खिलाडू वृत्तीनें मला बेशक परवानगी देऊनहि टाकली. "उद्यांपासून आम्हीहि तुझेच अनुकरण करूं. मग तर झालं..." कुणीतरी अधिक उत्तरला. आतां बाहेर पडणें भागच होतें.

० ० ०

ती दोन तासांचीं सहल विपुल रंगली जुन्या जुत्याचा मला पूर्ण विसर पडला व नव्याचे विचार पार उधळले गेले, 'मी अनवाणी चालत आहे' याचेंहि भान मला चुकूनच होत होतें. जीवनांतील जीवघेणी असहाय्यता माझ्या वाट्याला अभंग व अखंड आलेली आहे. हातीं यावं व ओठीं लागावं, तोंच तें हिसडून, हिरावून घेतलं जावं, अशीच प्रतिकूलता ज्यांच्या ललाटीं लिहिली आहे, त्या पुण्यवंतापैकीं मी एक आहे. अगदीं पदवी परीक्षेपर्यंत पदचाल करूनहि प्रत्यक्ष पदवीला मी मुकलोंच! आघाडीवरच्या वृत्तपत्रांत वैशिष्ट्य-पूर्ण ललित लेखन सतत करूनहि व एका प्रकाशकमित्राकडून अगाऊ पैसे घेऊनहि व त्याच्याकडून माझ्या भावी पुस्तकाची ठसठशीत जाहिरातबाजी असतांहि माझें नांव फारच थोड्यांना ठाऊक आहे व पुस्तक तर अजूनहि बाहेर पडलेलं नाहीं. मात्र हीं कटू शल्यें मला क्वचितच टोंचतात. नवें चप्पल दोन दिवसांवर आलें असतांहि व जुनें जवळ असुनहि, माझ्या मित्रांनी येण्याची पर्वणी मात्र मला पेचांत पाडणारीच साधावी, ... असा जो दैव विलास माझें जीवन जोपासतो, त्याला तोड नसावी. पण असहाय्यतेंतहि-

साह्यभूत, अपयशामध्यें यशस्वी, पराभूततेंतहि अजिंक्य, असे मनाला जाणवणें शक्य होतें. तें केवळ अगणित मित्रांच्या मनमोकळया मायेमुळेंच ! नाहींतर फ़िरायला निघतांनाची माझीं पहिली अनवाणी पावलें किती जड पडत होती तळव्याला टोंचकुरे दगड टोचत नव्हते त्याहिपेक्षा अधिक आत्मजाणिवेच्या स्वयंनिष्ठ टोचण्या मनाला अत्यंत तीव्र दंश करीत होत्या. लोक काय म्हणतील, मित्र काय म्हणतील– मला स्वतःला कसें आत्महीनतेचे वारें चाटीत राहील... ही भीतीची न संपणारी चिनी भिंत केवळ अलगद ओलांडू शकलों ती केवळ मी मित्रांच्या अकृत्रिम सहानुभूतीमुळेंच ! खरोखरच दुसऱ्या दिवशीं पुनः आम्ही सर्वजण पारावर टहलण्यासाठीं म्हणून बाहेर पडलों तेव्हा सुदैवाने वेळेवर मिळालेलें नवें चप्पल मी कटाक्षानें पायांत चढविलें. मात्र माझ्या मित्रांपैकी दोघांनी अनवाणी चालणें आनंदाने पत्करले होतें.

° ° °

अनुकूलता व प्रतिकूलता यांचा हा छायेमायेचा विचित्र विलास मानवी जीवनाचें गूढ अधिकच गहिरें करीत नाहीं काय? –**Sweet are** the uses of adversity असें म्हणणारा आंग्ल महाकवि याच परिस्थितींतून गेला होता. बिचाऱ्यानें नाटक लिहावें व नांव मात्र दुसऱ्याच उपटसुंभाचें व्हावें. अंगात घालावयास नवे कपडे नाहींत व जुने निरुपयोगी झालेले. अशा अभद्र अवस्थेंत सन्मानाचें आमंत्रण असूनहि व सन्मान होण्याची शक्यता असूनहि बाहेर पडूं न शकणाऱ्या अमर कलावंतांची, चित्रकारांचीं, कवींचीं उदाहरणें मला माहित आहेत. पण आहे त्याच अवस्थेंत अस्मितेला इवलासा धोका न देतां, बेछूटपणें बाहेर पाऊल टाकण्याचें धारिष्ठ किती जण दाखवितात?... एखादा डॉ. जॉन्सन किंवा एखादा डॉ. केतकर. केस विस्फारलेले, कपडयांची घडी गडप झालेली, पायांत वहाण आहे कीं नाहीं याची शुद्ध नाहीं, असलाच एखादा बूट तर त्यांचे खिळे निखळले आहेत, तळवा सुटून सांडतो आहे, पाय लचकत आहे, क्वचित मुरडतहि आहे... पण स्वकार्यपूर्तीची नैष्ठिक व्यग्रता इतकी उग्र कीं हंसणाऱ्याची दांतखीळ बसावी. माझ्या बाबतींत केवळ हींच कारणें

लागू पडलीं अशी मी तरी आपण होऊन अतिशयोक्ति करणार नाहीं. कुठे ते प्रतिभावंत, प्रज्ञावंत, अखंड उद्योगचंड... मी तर कमालीचा आळशी, अल्प महत्त्वाकांक्षी व आंधळा आत्मसंतोषी, निर्भय, परिमित ज्ञानवंत. पण म्हणून काय झालें? जुनें जुतें जीर्ण होणारच व नवीनाची वाट पहावी लागणारच! मध्यंतरीची अनवाणी चाल औटघटकेचीच, नाहीं तर काय? म्हणूनच नवें जुतें कांहीं काळ पायांत नीट रुळेपर्यंत अजूनहि जुन्याचा लोभ मी सोडून देणार नाहीं. नव्याच्या आशेवर, जुन्याच्या स्मृतीवर व स्निग्धजनांच्या सुमंगल सहानुभूतीवर दोन-चार मैलांचीच काय, पण अनंत योजनें करावीं लागणारी अज्ञात जीवनाची अनोळखी वाटचाल मी अनवाणी उमेदीनें अखंड करीतच राहीन.

(१९५७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३.५.३.२५२ वि: निबंध
क्रमांक १८४६३ नों. दि. ५८:१८:६


# नव्या इमारतींतील नवे भाडोत्री

अजून ते लोक तिथें आलेले नाहींत, व पुढेंही तब्बल दोन महिने त्यांच्या आगमनाची शाश्वती नाहीं, हें मी पूर्णपणें जाणून आहे. कारण नुकताच कुठें चौथा मजला चढत आहे. शिवाय पांचवा मजला चढायचा आहेच! तरीपण आज ना उद्यां ते येणार. खुशाल आपापल्या खोल्यांचा कबजा घेणार आणि सुखानें कालक्रमण सुरू करणार. या साऱ्या गोष्टीचं मला वाईट वाटतं, असं मुळींच नाहीं. मात्र योग्य तेवढी चीड आल्यावाचून रहात नाहीं. आजच्या जागेच्या कमाल अडचणींत, उभविली गेलेली ती नवी इमारत, आणि त्या इमारतींत, बाडबिछाईत व पोरंटोरं घेऊन संसार थाटणारे नवे भाडोत्री . . . ? भडका उठतो नुसता देहाचा! आज मी स्वतः जागेच्या अडचणींत असतांना व डोळ्यांसमोर इमारतीचा पाया खणण्यापासून वरचा शेंडा तयार होईपर्यंत, सारं उघड्या डोळ्यांनी पहावं लागूनही आंत मात्र मला मज्जाव असावा? एक साधी पथारी पसरण्याइतकी देखील 'दहा बाय् दहा'ची खोली मिळूं नये . . . केवळ या गोष्टीचीच चीड मला असह्य वाटूं लागली आहे.

उद्या ते येणार, नसलेला आव व नाटकी ऐट आणून रस्त्यांतून त्यांच्याकडे कौतुकानें टक लावून पहाणाऱ्या, आम्हां पांथस्थांची (व पदपथ-रहिवाशांची) तिरस्कारानें व चेष्टेनें नाक मुरडीत थट्टा करणार, ... रेडिओ आणणार व गाणीं गाणार, वरून घाण पाणी आमच्या सुंदर सुट-धारी देहावर बेदरकारपणें फेंकणार आणि... आमच्या विटंबनेला आतां पारावर उरणार नाहीं! पण अशी उघड मानहानी झाली तरी एक वेळ सह्य वाटेल पण, अंतःकरणांत आंतून होणारी मानखंडणा, तीच जीवनाचा प्रवाह गढूळ करून दुःखावर डागण्या देणार.

कुणाला सांगून खरंदेखील वाटणार नाहीं, पण काल-परवांपर्यंत माझ्या-बरोबरच पदपथावर पथारी पसरणारे व पावसाळयाच्या दिवसांत, इमारतीच्या मधल्या अवसरांत भाडेकरूंच्या कृपेनें निद्रिस्त होणारे, चार-पांचजण या नवीन इमारतींत, अगदीं वरच्या मजल्यावर जागा पटकावून, माझ्याकडे उपहासानें दृष्टीफेंक करणार आहेत, हें शल्य मी कसं आणि किती वेळ दडवून ठेवूं? या नव्या इमारतींतील सर्वच भाडोत्री नवे असते, तर तक्रार करण्याचं कारणच नव्हतं. त्यांना मी माझ्याहून अनेकपट सुदैवी म्हणून गप्प बसलों असतो. पण ज्या कृष्णकारवायांच्या जोरावर, माझ्या तथाकथित जीवश्च-कंठश्च मित्रांनीं तिथें प्रवेश प्राप्त करून घेतला ... त्या कारवायांचा मी तिरस्कार केला म्हणून उद्या मी मात्र तिरस्करणीय ठरणार आहे.

मुंबईत मी प्रथम आलों तोच किती हलाखीच्या स्थितींत! इंटरच्या ऐन परीक्षेच्या वेळीं प्रेमभंगाचं निमित्त होऊन मी मुंबईतून कोंकणांत गेलों अन् खुशाल वडिलांच्या पैशावर मनोराज्यें केलीं. बिचाऱ्या वडिलांना माझं एक वर्ष व कित्येक पैसे अनाठायी खर्च झाल्याबद्दल मनस्ताप वाटत होता व मी मात्र, मोठमोठया लोकांची ऐन परीक्षेच्या वेळीं, माझ्याचसारखी झालेली अवस्था आठवून समाधान मानीत होतों. शिवाय त्यामुळें मी आज ना उद्यां त्यांच्याच दिव्य मालिकेंत गोवला जाणार, हें समाधान, माझ्या निडर-पणाला विशेषच पोषक ठरत होतं. 'इंटर इंटर काय घेऊन बसलांत तुम्ही..?' मी वडिलांना हडसून खडसून प्रश्न करीं. 'डॉ. केतकर दोन वेळां इंटरला बसले होते. गडकऱ्यांसारखं प्रतिभावान नररत्न, इंटरमध्यें प्रवेश करूं शकले

प्र. क्र. ९३०६६

नाहींत . . . आणि या असल्या यकःश्चित् यशानें कां तुम्ही माझ्या भवितव्याचा आढावा घेणार आहांत ? . . .' वडील यावर काय उत्तर देणार. पण त्यांनीं एक निश्चय ठाम केला होता, तो लवकरच मला जाणवूं लागला. महायुद्धाचा मध्यकाल होता तो. साधारण शिक्षण घेतलेले लोक मुंबईला जात आणि त्यांच्या पत्राऐवजीं मनिऑर्डरीच फार येऊं लागल्याच्या वार्ता दिवसेंदिवस कानावर आदळत होत्या. अशा परिस्थितींत मी कोंकणांतल्या खेडेगांवांत ध्येयाची भव्य स्वप्नं आईबापांपुढें रंगवीत झोपा काढणं, माझ्या प्रेमळ पितरांना व्यवहारशून्यतेचं द्योतक वाटूं लागलं, यांत माझा तरी काय दोष ?

एके दिवशीं माझ्या मित्राला व एका हपीसच्या मॅनेजरला, दोघांना एकाच वेळीं दोन पत्रें लिहून टाकली. पहिलं पत्र म्हणजे भारताच्या वैभवाचा कळस सांधू इच्छिणाऱ्या, दुर्दम्य, आशावादी हिंदपुत्राच्या अमर ध्येयवादाचा 'बोलका ढलपाच' मानला तर दुसरं पत्र म्हणजे मंदिराशेजारीच रुक्षतेन टिकाव धरून असणाऱ्या स्मशानांतील परिस्थितीच्या वाऱ्यानं सैरावैर उडणारी राखच ! दुर्दैवानें या राखेचे ढीगच रचण्याचं काम मला दीर्घकाल करावं लागलं. हळूं हळूं मित्रांसमोर ध्येयगीत गाण्यासाटीं हवा असणारा पैसाच संपुष्टांत आला अन् इंग्रजी वृत्तपत्रांच्या पृष्ठांकावरील, माहितीवरच मला बेसुमार भर देणें इष्ट वाटूं लागले. शेवटीं एका कंपनीला दया येऊन माझी उचलबांगडी मला या बकाली शहरांत करावी लागली. तेव्हांपासून मी कसे दिवस काढतों हें माझं मलाच ठाऊक ! लवकरच जवळच्या व दूरच्या नातेवाईकांबद्दल मला अत्यंत प्रेम वाटूं लागलं व त्यांचा विरह हृदयाला घरं पाडूं लागला. जुन्यांपेक्षां नव्या मित्रांवरील माझी निष्ठा प्रतिदिनीं शुक्लेंदुप्रमाणें वाढूं लागली. पण मुंबईंतील माझ्या अगणित हितचिंतकांना माझ्या परम प्रेमाची किंमतच कळेनाशी झाली आहे, असं दिवसेंदिवस माझ्या प्रत्ययाला येऊं लागलं. प्रथम कांहीं दिवस झोपण्यासाठीं पलंग देणारें तेच निकटवर्ती स्वबांधव त्या पलंगाखालीं झोंपण्याची माझी तयारी असूनही त्या गोष्टीला विरोध करूं लागले ! ज्यांच्या कोनाकोपऱ्यांतील ढेकूण, पिसवा व डांस मोकाट सुटलेल्या हिंस्र श्वापदांप्रमाणें रात्रीं

त्यांच्या देहाचा दाह करीत, तो दाह शमविण्याला मी अनेक प्रकारें कारणीभूत झालों असूनही, माझ्या कोनाड्यांतील निशेचा भंग हेतुपुरस्सर करण्यांत त्यांना कांहींच वाटेना असं आढळून आलं! किंबहुना माझ्या वास्तव्यामुळें व वळकटीवजा माझा बिछाना असूनही, केवळ तो कोंकणांतला असल्यामुळें डांस, ढेकूण, झुरळे व मुंग्या वाढल्याचा तर्कशुद्ध दावा मला ऐकून घ्यावा लागला. त्यामुळें आज रात्रीं मी गिरगांवांत झोंपलेलों असलों तरी उद्यां माझी पाठ निश्चित त्याच भूपृष्ठावर टेकेल हें सांगतां... नव्हे अजमावतां देखील येत नसे! अर्थांत कित्येक रात्रीं मी जागून काढल्या व कित्येक जाग्रणें मी दिवसां केलीं आहेत. योगायोगानें माझ्या एका मित्राची बदली मुंबईला झाली व त्यानें मला भागिदारी दिली. तेव्हां कुठें माझ्या जीवनाला आदि व अंत असल्याची जाणीव मला होऊं लागली. जवळ बिछाना असूनही मुंबईच्या भकास रस्त्यांतून, झोंप टाळण्यासाठीं भटक्या माराव्या लागणं, यासारखा दैवदुर्विलास दुसरा कोणताही नसेल. फार तर वर्षभर सुखाची झोंप नाहीं, पण झोंपेचं सुख मात्र उपभोगूं शकलों. पण अकस्मात माझ्या मित्राची बाहेरगांवीं रवानगी झाली व त्याच्या अत्यंत जवळच्या नातेवाईकाची ती खोली त्याला परत करावी लागली!... तो दिवस आठवला कीं अजूनही अंगावर शहारे येतात! माझ्या ध्येयाची चांगलीच कसोटी लागत होती. पण मनस्थिति मात्र पंक्चर झालेल्या मिलिटरी ट्रक गाडीसारखी झाली होती. उमेद होती, पण गाडीला वेग प्राप्त होणें दुष्कर झालें होतें! अक्षरशः 'किम् कर्म किं कर्मेऽति कवयोऽप्यत्र मोहितः...' अशा ऐतिहासिक अवस्थेप्रत मनाची दौड थबकली होती...

जागा...? जागा...? जागा...? जगाकडे आशेनें पहातां येण्यासारखी एकच आवश्यकता पुनः पुनः मला नैराश्याच्या काळ्याकभिन्न कड्यावरून खालीं लोटून देऊं पहात होती. लवकरच युद्ध बंद होईल, लोकशाही तत्त्वाचा विजय होईल आणि साऱ्या जगावर आनंदसूर्य द्विगुणित दीप्तीनें तळपूं लागेल... हिंदुस्थानच यांतून कसा निसटेल? अर्थांतच जागेचा प्रश्न चुटकीसरशीं सुटणार! असा आशावादी विचारांचा लहानसा ॲटमबाँबही अंतःकरणांतील तर्कशुद्ध निराशावादी विचारांचा चक्काचूर करून टाकण्याला पुरेसा होई! काँग्रेस सरकारनें अधिकारसूत्रें हातीं घेतलीं,

तेव्हां तर मी आनंदाच्या भरांत जागृतावस्थेंतच झोंपेचं सुख अनुभविण्यांत रंगून गेलों...

हाय हाय! आतां मात्र त्या गोड आकांक्षांच्या कैक मजली इमारती, या नव्यानेंच उभविल्या जाणाऱ्या इमारतीच्या दर्शनानेंच, धडाधड कोसळूं लागल्या आहेत. बरं, जे माझ्यासारखेच या नव्या इमारतींत जागा पैदा करूं शकले नाहींत, त्यांची दुरवस्था तर माझ्या डोळ्यांना टचकन् पाणीच आणते! एकाच फूटपाथवर झोंपणाऱ्या आम्हां कांहीं मित्रांपैकी एकाचा प्रेमविवाह फक्त व्हायचा राहिला होता. खरोखर, त्याच्या प्रियकरणीचं त्याच्यावरील प्रेम ज्युलियेट किंवा शकुंतलेला लाजविणारं होतं आणि त्याच्या राहण्याच्या गैरसोयीमुळें तर तिची सहानुभूति तीव्रतर होत होती! कुणी येऊन आम्हाला सांगितलं असतं कीं ती प्रिया विरहानें पोळून भस्मीभूत झाली, तर ती गोष्ट आम्हाला कालत्रयीही अविश्वसनीय वाटली नसती. पण... ज्या माझ्या कांहीं मित्रांनीं या नव्या इमारतीच्या पांचव्या मजल्यावर जागा पटकावली, त्यांच्यापैकीं एकाला तिनें आपल्या हृदयांत कायमची जागा दिल्याची महादुःखदायक हृदयभंग करणारी वार्ता कालच माझ्या कानांवर येऊन थडकली आहे. आज रात्रीं ज्यावेळीं आम्हीं एकत्र येऊं तेव्हां माझ्या त्या निकटवर्ती मित्राचं कसं सांत्वन करूं हेंच मला कळेनासं झालं आहे! उद्यां तेंच 'ज्युलियेटचं' भूत माझ्या अभागी रोमियेटकडे पांचव्या मजल्यावरून दुष्ट भ्रुकुटीभंग केवळ मौज म्हणून करणार!!

मला नव्या भाडोत्र्यांबद्दल कांहीं म्हणायचं नाहीं! कारण त्यांना दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं! पण जे जुनेच मुंबईकर नवे भाडोत्री म्हणून व नवपरिणीत वधूवर या नात्यानें तेथें निवास करणार आहेत, त्यांनाच वाहांत आली तर इरसाल शिव्यांची लाखोली मला वहायची आहे!... आणि त्या रस्त्यानें जाणं भाग पडत असल्यामुळेंच, इमारतीचं दर्शन घडतांच, गीतेचे श्लोकसुद्धां माझ्या जिव्हाग्रावर टिकाव धरूं शकत नाहींत! नुकतंच त्या इमारतीचें रंगकाम सुरूं झालं आहे. काल रागांतच, कधींही पान-पट्टी न खाणारा मी, तें मिश्रण चघळून त्या पांढऱ्या सफेद भिंतीवर दोन पिचकाऱ्या कौशल्यानें मारल्या! दुसऱ्याच दिवशीं माझ्या पिचकाऱ्यांच्या खाणाखुणा अनंतांत विलीन करणाऱ्या असंख्य रक्तरेघोट्यांचें एकच जाळें

मला दिसून आले! – अनेकांच्या आशा भग्न करणाऱ्या त्या इमारतीबद्दल मीच एकटा रागावलेला नाहींतर?

किती आशा अजून माझ्या उरांत धगधगत आहेत! जागेची अडचणच काय ती दूर होत नाहीं.

अंग उघडें पडलेल्या व अंगावर कांहींच अलंकार नसलेल्या दरिद्री स्त्रीप्रमाणें भकास दिसणारी ही इमारत, उद्यां भरजरी शालू नेसलेल्या व सोन्याहिऱ्यांच्या अलंकारांनीं मढवून टाकलेल्या एखाद्या खानदानी स्त्रीसारखी शोभिवंत दिसूं लागेल. पण तिच्यामध्यें वास्तव्य करणारा प्रत्येक भाडोत्री जणूं माझ्या आशाआकांक्षांच्या चितेवरच चरतो आहे, असं मला सतत वाटत राहील... मलाच एकट्याला असं वाटेल, असं मी अनुभवानं हमखास म्हणूं शकत नाहीं!... उलट माझ्या विचारांशीं तद्रूप होणारे कित्येक ध्येयवादी तरुण केवळ जागेच्या अडचणीमुळें पुढें टाकण्यासाठीं उचललेलं पाउल मागें घेतांना मी पहात आहे. माझा ध्येयभंग मात्र मी होऊं दिलेला नाहीं. बागेंत, पदपथावर वा गच्चीवर झोंपण्यांत पटाईत झालेला मी, या नव्या इमारतीच्या तळमजल्यावरची जागा मिळविण्यांत जरी अयशस्वी ठरलों, तरी उद्यां जनताजनार्दनाच्या हृदयमंदिरांतील उंच स्थान माझ्यासाठींच आहे, हा माझा आत्मविश्वास दृढतेनें वृद्धिंगत होत आहे! कारण जीवनाच्या अव्यक्त सीमा ओलंडण्यासाठीं चाललेली माझी धडपड, चार भिंतींच्या मर्यादांनीं कधीं काळीं स्थगित होण्याची भीति बाळगायचं आतां कारणच उरलेलं नाहीं. उपहासानें माझ्याकडे दृष्टिक्षेप करणाऱ्या उद्यांच्या माझ्या पांचव्या मजल्यावरच्या मित्रांना मी हंसून असंच म्हणेन... "अनंत अमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा... किनारा तुला पामराला!" म्हणूनच कोंसळणाऱ्या जुन्या इमारती व उभारले जाणारे नूतन प्रासाद, दोन्ही मला सारखेच प्रिय वाटूं लागले आहेत!...

त्या नव्या इमारतींत प्रवेश करायला आसुसलेले, ते भाडोत्री, हा निबंध वाचून तरी माझ्या अंतरंगांत प्रवेश करूं जाणतील काय?– अरेच्या? झोपायची वेळ केव्हांच टळून गेलेली दिसते– गच्चीवरची माझी जागा काळोखांत हुडकून काढण्याखेरीज दुसरं गत्यंतर नाहीं–!

(१९४७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३५३२६ वि: निबंध
क्रमांक ............ नों दि: १७...

# मुंगी, माकड आणि मनुष्य

'मनुष्याची उत्पत्ति माकडापासून झाली' हा उत्क्रांतिवादाचा पहिला धडा माझ्या गुरूंनीं जेव्हां मला शिकविला तेव्हां मला वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. ज्या मानवाच्या पराक्रमाच्यां थोर थोर कथा, आख्यायिका, पुराणें, माझ्या गुरूंनीं मला रंगवून सांगितलीं त्यांनींच एक दिवस मांझा असा विश्वासघात करावा ही गोष्ट माझ्या मनाला फार लागली. वयांतील बरेच पावसाळे कोसळून गेले होतें; मला मतांअगोदरच मिशा फुटण्याचा समय प्राप्त झाला होता? आणि तशांत हा साक्षात्कार चार भिंतींच्या आंत आम्हां अनेक विद्यार्थ्यांना झाला. अजूनही तो दिवस आठवला कीं मनुष्याच्या ज्ञानाची कीव करावी असें मला वाटतें. माझे पूर्वज माकड होते या गोष्टीवर माझा विश्वासच बसेना व तें मान्य करायचं नाहीं असं मी ठाम ठरवून टाकलें.

शाळेंतून घरीं येईपर्यन्त वाटेंत जेवढीं माकडें दिसतील त्यांच्याकडे मी न्याहाळून पाहूं लागलों. एवढंच नव्हे तर रस्त्यांतून जाणाऱ्यायेणाऱ्या मनुष्यांचें सूक्ष्म निरीक्षण करीत, मीं माकडांचं व त्यांचं साधर्म्य शोधण्याचा

चिकाटीनं प्रयत्न सुरू केला. त्यामुळें कित्येक वेळां माकडांचं वेडावणं मला सहन करावं लागलं व मनुष्याच्या शिव्या खाव्या लागल्या. मात्र विचार व निरीक्षण करतांकरतां मला नवीन जाणीव होऊं लागली व ती क्रांतिकारक ठरावी असा माझा अंदाज होता. एखाद्या हुप्या माकडामध्यें व अर्धवट दाढी वाढलेल्या दणकट मनुष्यामध्यें मला साम्य खचित आढळून येई. पण पोटाला घट्ट बिलगणाऱ्या अर्भकाला तोलत, वृक्षावृक्षावर उड्या मारणाऱ्या माकडी-मध्यें व रस्त्यांतून ठुमकत मुरडत जाणाऱ्या तरुण किंवा प्रौढ स्त्रियांमध्यें मला कोणतंच समान चिन्ह आढळून येईना. मनुष्य हा उत्क्रांत माकड असेल, तर स्त्रिया माकडांत मोडत नाहींत काय?—असा संशय वारंवार माझ्या मनामध्यें घोटाळत राही. शेवटीं मनोधैर्य एकवटून शिक्षकांनाच मी तो प्रश्न केला . . . पण . . . स्त्रियांमुळें दुर्दैव ओढवतं हें ऐतिहासिक सत्य माझ्या प्रथमच अनुभवाला आलं. तास संपेपर्यंत अंगठे धरून राहण्याची मला सजा झाली. त्या अवस्थेंतही मी स्वतःची माकडाशीं तुलना करीतच राहिलों व असाही एक विचार त्या वेळीं डोक्यांत येऊन गेल्याच आठवतं कीं मला एखादी शेपटी जर मागें असती, तर मास्तरांच्या डोक्यावरून उडी मारून मी खिडकींतून बाहेर पळालों असतों!

लहानपणची गोष्ट आठवण्याचं कारण थोडक्यांत असं सांगतां येईल. माझे एक स्नेही पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक आहेत. अर्थात् सायन्स हा त्यांचा आवडता विषय आहे. अनेक दिवसांनीं सहज त्यांच्याकडे फिरकलों. ते घरीं होते आणि एकटेच होते. मी त्यानां विचारलं,

" काय म्हणतं आपलं शास्त्रीय जगत् ? . . ."

त्यांना अॅटम बाँबबद्दल परिपूर्ण माहिती विचारावी असा माझा मानस होता. खूप दिवसांनीं भेटल्यामुळें त्यांनीं प्रथम इकडची तिकडची चौकशी केली. नंतर हातांतील पुस्तक चाळीत ते म्हणाले,

"अॅटमबद्दल फार झालं आतां. आईन्स्टाईनचं भाष्य लोकांनीं पाठसुद्धां केलं असेल एव्हांना; पण मी तुला आज एक नवीनच मनोरंजक माहिती वाचून दाखविणार आहे . . ."

"कुणाबद्दल ?" मी उत्सुकतेनं विचारलं.

"अर्थात् मानवाबद्दल. मनुष्यजातीबद्दल ! ..."

मनुष्यजातींत जन्म घेतल्याचं मनस्वी दुःख मला त्या क्षणाला झालं. मनुष्यप्राणी इतका गूढ असावा? जादूगाराचें हस्तलाघव पाहतांना डोळे दिपून जावेत व कांहीं केल्या समाधान होऊं नये तद्वत् मनुष्याबद्दल जें जें ऐकावं तें तें नवलचं ! शिवाय त्यानें चित्ताची अस्वस्थता वाढतच जाते, याचं मला दुःखमिश्रित आश्चर्य वाटलं. त्या स्नेह्यांनीं वाचून दाखविलं तें कांही विचित्रच ! मानवी प्राणी उत्क्रांत होण्यापूर्वीं कित्येक वर्षे अगोदरच 'मुंगी' हा प्राणी व त्याची जमात अनेक दृष्टींनीं परिपूर्णावस्थेला पोंहोंचली असावी हा त्यांनीं वाचलेल्या उताऱ्याचा इत्यर्थ ! ईश्वरानं मनुष्यजातींशी इतका पक्षपात करावा ही गोष्ट शास्त्रज्ञांनीं कितीही निर्विकार चिकित्सा करून प्रस्थापित केली तरी आधुनिक मानवानं त्या सिद्धांताला संमति देऊं नये हेंच योग्य. मानवप्राणी यःकश्चित् मुंग्यांच्या नंतरही कितीतरी वर्षे अंड्यांतच असावा ही गोष्ट, ज्या युगांत मानवाला समतेचा साक्षात्कार झाला, ज्या युगांत मानवानें संस्कृतीचा टेंभा मिरवला व उच्चांक गांठला त्या आधुनिक युगांतले सनातनी केव्हांही मान्य करणार नाहींत. प्राध्यापकमहाशयांनीं जें कांहीं वाचून दाखविलं त्यावरून कुणाचाही मानवजातीबद्दल प्रतिकूल ग्रह झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि मानवाच्या विरुद्ध प्रचारकार्य करणाऱ्या शास्त्रज्ञांनीं मुंग्यांच्या प्राचीनत्वाकडे जावं हें कृत्य त्यांच्या माणुसकीला हर-ताळ फासणारं आहे...वगैरे वगैरे मी त्याच वेळीं प्राध्यापकमहाशयांजवळ बोलूनही टाकलं.

बिगरीमध्यें असतांना वाचलेली 'मुंगी व कबुतर' ही गोष्ट आठवली मला. त्यावरून माझं एक मन मुंगीबद्दल अभिमानानं बोलूं लागलं व दुसऱ्या मनांत मानवाबद्दल तिटकारा उत्पन्न होत असल्याची चिन्हं प्रत्ययाला येऊं लागलीं. पण मी स्वतःला सांवरून घेतलं कारण त्यामुळें अखिल मानवजाती-बद्दल गैरसमज होण्याचा संभव प्राप्त झाला होता. आणि असे प्रसंग टाळतां आले नाहींत, तर माझ्यांतील माणुसकीचा अंश लयास जाईल अशी माझी रास्त समजूत होती. ती गोष्ट मी त्या प्राध्यापकांना सांगितली. एक मुंगी

एका तलावामध्यें बुडत होती. कांठावरील झाडावर बसलेल्या कबुतरानें तें पाहिलें. कबुतराला दया येऊन त्यानें एक पान खाली टाकलें. मुंगी त्या पानाला चिकटून राहिली व सुरक्षित किनारीं आली. कांहीं दिवसांनीं तें कबुतर त्याच झाडावर बसलें असतां एक पारधी बंदूक घेऊन आला.... (अर्थात् हा पारधी मनुष्यच होता) त्यानें त्या कबुतरावर नेम धरला हें पाहून त्या मुंगीनें त्याच्या पायाला कडकडून चावा घेतला. त्या पारध्याचा नेम चुकला आणि कबूतर उडून गेलें. मात्र या गोष्टीचें तात्पर्य मला कांहीं केल्या आठवेना. मी मोठ्या अभिमानानें पुढें समर्थन करूं लागलों, 'तो पारधी जरी मनुष्य असला तरी तो रानटी असावा, अडाणी असावा. आजच्या सुधारलेल्या व सुसंकृत जगाचा संपर्कसुद्धां त्याला लागला नसावा; म्हणूनच पोटाची खळी भरण्यासाठीं त्यानं हें कृत्य केलं असावं.'

'–पण त्याला बंदूक कशी मिळाली?' या माझ्या मित्राच्या प्रश्नानें मी दचकून गेलों. होय! 'मग त्याला बंदूक कशी मिळाली? ती त्याला कशी उडवितां आली?' याचा मी विचारच केला नव्हता. 'To err is human' ही आंग्ल म्हण मला आठवली नसती तर माझं मन बेसुमार बेचैन झालं असतं. आणि मानवजातीबद्दल माझ्या मनांत भलतेच गैरसमज निर्माण झाले असते.

ज्या पुस्तकांतला उतारा प्राध्यापकांनीं वाचून दाखविला होता तें लिहिणाऱ्या संशोधकानं आपल्या पुस्तकांत मुंगी व मनुष्य यांमधील साम्य दाखविलं होतं व असा दावा मांडला होता कीं, 'मनुष्यानं जरी देह माकडापासून घेतला असला, तरी त्याच्या मनाची घडण मात्र माकडापासून न होता मुंग्यापासूनच झाली असावी, त्याच्याच भाषेंत बोलायचं म्हणजे—

'मनुष्याप्रमाणेंच मुंग्या परिस्थितीला तोंड देणाऱ्या असतात व परस्परांवर मात करण्याची चढाओढ व ईर्षा त्यांच्यामध्ये असते.'

'मनुष्याप्रमाणेंच मुंग्यांचा प्रबळ शत्रू त्यांच्या जातींतून वा वंशांतून निर्माण होतो.'

'मुंग्यांच्या वारुळाची आंतील रचना मनुष्यांच्या घरें बांधण्याच्या पद्धतीशीं कितीतरी जवळची आहे.'

'मनुष्याप्रमाणेंच मुंग्यांचा मेंदू कार्य करितो.'

'मानवाप्रमाणेंच मुंग्यादेखील संघटना करून राहतात. कारण त्यांना वैयक्तिक उत्कर्ष व परस्पराचें संरक्षण साधावयाचें असतें.'

'मुंग्यांमध्यें युद्धाचा प्रसंग उद्भवतो तोदेखील मानवाप्रमाणेंच. अन्नाच व जागेचा प्रश्न सोडविण्यासाठीं त्या संघटित होऊन परस्परांवर चाल करतात. इतकंच नव्हे तर विषुववृत्तावरील दाट जंगलातून झाडांवर वास्तव्य करणाऱ्या तांबडया मुंग्यांमध्यें हुकूमशाहीची प्रवृत्ति आढळून येते. एका झाडावरील मुंग्या दुसऱ्या झाडावरील स्वकीयांशीं युद्ध पुकारून त्यांना झाड खालीं करावयाला भाग पाडतात, किंबहुना त्यांपैकीं एकही मुंगी जीवंत राहणार नाहीं याचीही पूर्ण काळजी त्या घेत असतात...'

लहानपणी तें तसं ऐकलं व मोठेपणी हें असं ऐकण्याची पाळी यावी याचं मला राहून राहून नवल वाटूं लागलं. कुणीतरी माणूसकीबद्दल ठासून बोलणारा व मनुष्यत्वाचा संबंध या कृमिकीटकांपासून उच्चत्वाशीं जोडणारा एखादा संशोधक निपजावा म्हणून मी तेव्हांपासून भविष्यकाळाकडे डोळे लावून आहे. मानवाबद्दल अगोदरच गैरसमज करून घेतल्यामुळें संशोधकाची प्रवृत्तीच विघातक ठरावी याचं मला आश्चर्य वाटत नाहीं. ज्या गौतम बुद्धानें अहिंसेचा, मानव्याचा, शांततेचा संदेश दिला तो काय मनुष्य नव्हता? 'रामराज्य' म्हणून अजूनही ज्याची राजवट टिकून राहूं शकते तो प्रभु रामचंद्र मानवच होता ना? कितीतरी नांवें देतां येतील. सॉक्रेटिस, शंकराचार्य टागोर, महात्माजी, ऑइन्स्टाइन, रोलाँ हीं नररत्नें मानवजातीला ललामभूत होऊन राहिली असतां, मानवाबद्दल या शास्त्रज्ञांना इतकं घाणेरडं लिहवतं तरी कसं? या प्रश्नाचं उत्तर मिळावं म्हणून काहींशा रागानेंच पुनः एकदां मी त्या प्राध्यापक मित्राकडे गेलों. त्यांचं लक्ष माझ्याकडे वेधण्या ऐवजी त्यांनींच माझं मन आपल्या हातांतील पुस्तकाकडे वळवलं... त्या पुस्तकांतील कांहीं भाग त्यांनीं वाचून दाखविला. त्यावर मी त्यांना म्हटलं,

"तुम्हीं शास्त्रज्ञ डोकं फिरवून टाकण्यासारखं कांहींतरी लिहित असता मानवी अंतिम मूल्यांची तुम्ही किंचिदपि क्षिति बाळगीत नाहीं. धर्म, संस्कृति, तत्त्वज्ञान, यांकडे पाठ फिरवून तुम्हीं तुमची विचारशक्ति कामाला जुंपतां

म्हणूनच ॲटमबॉम्ब निघाला. भयंकर किरण निघताहेत. जगाचा विनाश-काळ तुम्हीं पंचवीस वर्षांनीं जवळ आणला आहे असं तुमच्या गोटांतीलच एक थोर शास्त्रज्ञ आर्जवून म्हणूं लागले आहेत. तुम्हांला दया, माया, माणुसकी..."

पण माझ्या स्नेह्यावर ह्याचा कांहींच परिणाम झालेला दिसला नाहीं. निर्विकार मुद्रेनं चिरुटाचे झुरके घेत ते म्हणाले,

"...प्रथम ही माकडांविरुद्ध सुरू झालेली मोहीम तरी लक्षांत घे. अहिंसेचे पुजारी म्हणविणारे महात्मा गांधीसुद्धां..."

"...गांधींसुद्धां?...म्हणजे...?" उत्सुकता न आवरल्यांमुळें मी उद्गारलों.

त्यांनीं वाचून दाखविलं तें असं होतं,–'कांहीं आडदांड व हावरी मांकडें उभ्या पिकाचा फडशा पाडतात व नुकसान करतात. निरनिराळ्या विचारवंतांनीं त्यांना आळा घालण्याचे उपाय सुचविले आहेत. महात्मा गांधींनीं-सुद्धां एक उपाय सुचविला आहे.'

एक सूचना अशी होती,–'माकडाच्या शेंपटीच्या रोखानं मातीच्या गोळ्या बंतुकींतून मारल्या तर माकड मरत नाहीं, परंतु त्याला असह्य वेदना होतात. त्या त्याच्या कायमच्या स्मरणांत राहतात. शिवाय आपल्या दुःखांची जाणीव तो स्वबांधवांनां देतो. अर्थातच त्यानंतर शेतावर कुणीही माकड फिरकत नाहीं व त्यांचा उपसर्ग नाहींसा होतो.'

दूसरा उपाय,–'शेतांना विजेच्या तारांचें कुंपण घालणें.'

तिसरी सूचना महात्माजींचीं होती. तीं अशी,–'एका शेतांतील माकडं न मारतां त्यांना दुसऱ्याच्या शेतांत हांकलणं म्हणजे अहिंसेच्या नांवाखालीं झालेलं हिंसाकर्मच होय. खरी अहिंसा पाळावयाची असेल व समाजाला होणारा उपद्रव टाळावयाचा असेल तर माकडांना ठार मारणं हाच एक उपाय आहे...'

हें सारं ऐकलं मात्र! मानवजातीबद्दल गैरसमज होऊं न देण्याचे सारे श्रम वाया गेल्याचं मला दुःख झालं.

ते जोरजोरानं केलेले वादविवाद व मानव्याचा उच्च दृष्टीकोन डावळू न देण्याचीं केलेली ती पराकाष्टा आठवली, कीं आतां माझ्या अज्ञानाची माझी मलाच कींव येते. ज्या ज्या विचारवंताकडे, सुज्ञांकडे व प्रज्ञावंताकडे मी माझी मानव जातीच्या उद्धाराचीं तळमळ व्यक्त केली त्या सर्वांनीं माझी मूर्खांत गणना केल्याचं वृत्त माझ्या कानावर आलं. आणि त्या नंतर मानवाशीं मी कांहींसा फटकून वागूं लागलों. मी तुसडा आहे असं कित्येकांना वाटेल मी माणूसघाणा (Misanthrop) आहें अशीही पुष्कळांची गैरसमजूत होईल; पण मी एव्हढंच सांगू शकेन कीं मानवाबद्दल जें प्रेम मी उरांत बाळगून ठेवलं आहे त्याला दुसरी उपमा नाहीं. मी ज्या हवेलींत बसून लिहीत आहे तिथून मलां मुंबापुरींतील असंख्य रस्त्यांचं जाळं दिसत आहे. आंणि त्या सडकांवरून पांढऱ्या काळया मुंग्यांची रीघ लागल्याचा जो मला भास होत आहे ती खरोखरी माणसांची ये-जा चालू आहे हेंही मला ठाऊक आहे. पृथ्वीतलावर वावरणाऱ्या विविध व विचित्र प्राणिमात्रांपैकीं हीसुद्धा प्राणिजात आहे व त्या जातींत माझा जन्म व्हावा याचंच मला आतां दुःख होत आहे! कारण जगाचं आशास्थान असा हा मानव आशेचे भव्य मनोरे स्वतःच भग्न करीत आहे. जणूं जगाकडे आशेनें पाहणं हा अपराध आहे! युध्यें कायमचीं बंद व्हावींत म्हणून शांतता-परिषद भरते, व तिथूनच रणशिंग फुंकलं जातं. 'विश्वचि माझें घर' अशीं घोषणा करीत युद्धाचा शेवट होतो व सम्राटांची अशक्तांवर केवळ काळचांगोऱ्या भेदासाठीं घोडदौड सुरू होते. संस्कृति, समता व बंधुभाव यांची जाणीव काय जगाला आजच झालेली आहे? सत्य व शांततेसाठीं जर कुणी प्राण दिले असतील तर ते आमच्या पूर्वजांनीच! सॉक्रेटिसानं व शंकराचार्यांनीं जें सांगितलं व ज्यांच्यासाठीं प्राणार्पण केलें तेंच इतर तत्त्वज्ञ पुनः पुनः जगाच्या कानी कपाळीं ओरडत सांगत आहेत. गौतमबुद्धाचा संदेश प्रत्यक्ष कृतींत आणला सम्राट व बलशाली अशोक राजानें! त्यासाठीं व मानवतेसाठीच मार्टिन ल्यूथर, जेझस् ख्राईस्ट यांनी युरोपांत यमयातना सोसल्या ना? म्हणूनच मला वाटतं कीं मानवजात सुधारण्याची शक्यता प्राचीन काळींच अधिक होती. ज्या प्रारंभकाळांत अरण्यें व काळोख दाट माजून राहिलीं

होतीं. त्या काळीं आर्यांनीं 'तमसो मा ज्योतिर्गमय' हा संदेश देऊन सभोंवार ज्ञानदीप तेवत ठेवला. अनार्यांना आर्यत्व प्राप्त करून देऊन त्यांनीं कित्येक शतकें शांततेनें व्यवहार केले. मानवजातीच्या सुसंकृत मनोवृत्तीचा उच्चांक गांठला गेला असेल तर तो त्या वेळींच ! पण त्यानंतर कैक वर्षांनीं–

'सांप्रति दानव फार माजती
देवावर झेंडा मिरवीती
देवांच्या मदतीस चला तर ...'

अशी आरोळी ठोकण्याची पाळी अनेक कवींवर व संतावर आली. दुसऱ्या महायुद्धांत व तथाकथित सुसंकृत युगांत मानवानें मानवावर केलेल्या पाशवी अत्याचारांची जाणीव झाली तर पशुदेखील लज्जेनं माना खालीं घालतील मग माझ्या शास्त्रज्ञ मित्रानं जें वास्तव्यदर्शन मला केलं, त्यामुळें मी उगीचच इतका रागावलों नाहीं का ?

माकडांजवळ मूर्खपणा असेल, पण हेतुपुरस्सर दुष्टपणाचा लवलेश-देखील त्यांच्याजवळ आढळणार नाहीं. पर्जन्यांच्या सरींनीं किंवा थंडी-वाऱ्यानं अंग कांकडूं लागलं कीं सर्व माकडांची परिषद भरते म्हणे व एक 'कॉलनी' बांधण्याचा ठराव एकमतानं पास केला जातो. नि दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या ठरावाचा त्यांना विसर पडतो ! पण स्वतःला शहाण्या म्हण-विणाऱ्या माणसाची गोष्ट तरी याहून वेगळी आहे काय ? मानव्याचा एकच धर्म प्रस्थापित करून विश्वकुटूंब स्थापन करण्याचा ठराव मानवानं किती वेळां मतास टाकला असेल?... आणि किती वेळां त्याला त्याचा विसर पडत आला आहे ?

'Thou sluggard, go to the Ant असा आळशी मनुष्याला कुणी तरी उपदेश केला आहे. मी तोच उपदेश उलट अर्थानं मुंग्यांना करीन. आमच्या खोलींत सामानाचा नुसता खच पडला आहे. झुरळं, उंदीर व मुंग्या यांनीं माझ्या युद्धत्रस्त खोलींत वस्ती केली आहे. पुष्कळ वेळां एखादी मुंगी पायाला डसते, पण वेदना होत असतांनादेखील त्या मुंगीला मी चिरडून टाकीत नाहीं. मी तिला हळूवारपणें हातांत घेतों, तिची होणारी धांवपळ मी मिस्कील डोळ्यांनीं पाहातों. तुकारामाच्या 'मुंगी साखरेचा रवा

या अभंगाची गुणगुण माझ्या मनांत सुरू होते, मी हंसतों व तिला अलगद सोडून देतों. नंतर मिटल्या डोळ्यांनीं जेव्हां मी जगाकडे पाहूं लागलों तेव्हां मला आढळतं, कीं माझं एका प्रचंड मुंगींत रूपांतर झालं आहे, आणि काल-प्रवाहांत मानवी रोषाला बळी पडलेल्या संतांच्या व प्रेषितांच्या समाधीकडे कुणीतरी मला नेत आहे. वाटेंत मला माकड, कुत्रां, घोडा, हत्ती व माणूस यांची सोबत होते. परंतु त्या समाधीची द्वारं सर्वांनाच खुलीं होत नाहींत. फक्त मानवेतरांनाच त्या द्वारांतून प्रवेश मिळतो. बिचारा मानव निराश होऊन बाहेरच थबकतो. तें दृश्य मला असह्य होतं म्हणून मी मागें वळतों. पण मला दिसून येतं कीं मानव निराश न होतां डोळे मिटून गुढगे टेकीत भक्तिभावानें त्या थडग्यावर पुष्पांचा वर्षाव करीत आहे. 'खुळा रे खुळा'. असं त्याला म्हणण्यासाठीं मीं तोंड उघडतों इतक्यांत माझे डोळे उघडतात. त्या विचित्र आभासांत मग्न झाल्याची मौज क्षणभर वाटते न वाटते तोंच मी स्वतःला सावरतों, आणि मानवजातींबद्दल होणारी ही एक नवीनच गैर-समजूत दूर फेकण्याचा कटाक्षानं प्रयत्न करतों.

(१९४८)

१०

# सनई

गेले चार दिवस या परिसरांत सारखे सनईचे सूर रात्रंदिवस, वेळींअवेळीं कधी व्याकुळतेने, कधी अक्रस्ताळेपणें ऐकूं येत आहेत. ज्येष्ठ महिन्याचे मुहूर्त साधून इवल्याशा या शहरांतील वडील मंडळी, आपल्या मुलां-मुलींचे विवाह क्वचित् उतावीळपणाने झरझरा उरकून घेत आहेत. मी उतावीळपणें म्हटलं ...खरंच आहे तें. मघांच माझ्या एका विद्यार्थी-मित्रानें मला उद्याच्या एका लग्नाचं आमंत्रण दिलं. ज्याचं लग्न आहे, तो तर परवांपर्यंत मला भेटत असे. स्वतःच्या जीवनांतील या मंगल क्षणाची अनवधानतेनेंहि त्यानें मला चाहूल लागू दिली नाहीं. मला आश्चर्य वाटलं. पण त्या विद्यार्थी-मित्रानें मला फार काळ अचंब्यांत ठेवलं नाहीं. त्याचं असं झालं, हा उद्याचा वर, परवा एका लग्नसमारंभाला गेला होता. तिथं घोळक्यांत एका उपवर बालिकेनें त्याचं मन आकर्षून घेतलं. सहज त्याने चौकशी केली. काय योगायोग पहा. तिचे वडिलहि त्याचीच पूसतपास स्थानिक ज्येष्ठ मंडळींकडे करीत होते. सहज थट्टेनें विषयाला तोंड फुटलं, झालं. संध्याकाळीं त्याच्या घरींच जाणती मंडळी जमली. त्यानें थोडेसे आढेवेढे घेतले. त्यांची समजत मग पटली.

ठरलं. हा वर उमदा, तरुण व्यापारी आहे. आणि ही विवाहाची धमाल येथील बाजारपेठेंतील वणिक् समाजामध्यें विशेषच उसळली आहे. पाऊस मुसळधार कोसळतोच आहे. रस्त्यांत गुडघाभर चिखल झाला आहे. वातावरण दमट व सर्द होत आहे. किती काळ हे सनईचे सूर अजूनहि या परिसरांत स्पष्ट–अस्पष्ट, संवादी–विसंवादी, व्याकुळलेले वा विस्कटलेले ऐकूं येतील कांहींच सांगतां येत नाहीं.

सनईचं संगीत मला वेड लावतं, असं म्हटलं तर मला वेडयांत काढणारे लोक भेटले आहेत. व्हायोलिन, सतार, गुईटर, बांसरी, हार्मोनियम, वीणा, क्लेरिओनेट यांचे संस्कार झालेलं नागरी मन, सनईची उपेक्षा करीत असावं! परंतु खेडयांत लहानचा मोठा झालेला मी, सनईच्या संगीतानेंच प्रथम बेहोष झालों हें त्यांना कसं कळावं? आतां मघापासूनच सनईचे संमिश्र विसंवादी सूर अघळपघळ जे माझ्या कानींकपाळीं किरकिरेपणें आदळत आहेत, त्यानें मी पुरता विटून गेलों आहे, हें तर स्पष्टच आहे. विवाहासारख्या अत्यंत मंगल प्रसंगीं मांगल्याचा करुणगंभीर परिपोष करणारी सनईच योजणारा आद्य भारतीय, गूढ जीवनाचा खरा जादुगार असला पाहिजे. तो स्रष्टाहि होता. द्रष्टाहि पण! मात्र, आज चार दिवस सनईची केवळ विटंबना चालली आहे. हिंदी चित्रपटांतील गल्लाभरू उथळ गीतें सनईतून निर्जीवपणें काढण्याची अभद्र चढाओढ लागली आहे. सामान्यांच्या अतिसामान्य जीवनांतील अभिरुचीची ही वाढ, उद्याच्या ललितरम्य संस्कृतीची जणू चुणूकच दाखवीत आहे! किती भकास, निरस, हीन दशा ही!! एकाहि वधूनें वा वरानें या विद्रुपतेचा कठोर निषेध केल्याचं अजूनहि मला ऐकूं येत नाहीं. उलट खिडकींतून कधींकधीं वैतागून रस्त्यांतील वरातीकडे मी टक लावतों, तेव्हां वधू-वरहि उत्कट प्रसन्नतेनें या जल्लोषांतच रंगलेले मला पहावे लागतात. रसिकतेच्या ऱ्हासाचं हें प्रदर्शन केवळ इथंच मांडलं गेलं आहे, असं नाहीं; उलट सर्वत्र हीच रडारड आहे! जेवढं शहर मोठं, तेवढं हें प्रमाणहि मोठंच!

आमच्या गांवांत ज्यांचं बालपण गेलं आहे, त्यांना सनईच्या संगीताची संवय निश्चितच झालेली असणार. लहानपणची आठवण झाली की,–

'एक सनई आहे खोल माझ्या मनांत वाजत–'

असं कां तरी म्हणावंसं वाटतं. शंकराच्या देवालयाच्या आवारांतील आमचं तें जेमतेम मातीचं घर. घरांत आम्ही खूप भावंड. एक आजी, म्हातारी पण सतत उद्योगी ; तरतरीत, गोरी, देखणी, भारदस्त, सदा शंकराच्या चिंतनांत मग्न झालेली. ती सर्वांत पहाटें उठायची. तोंड धुतल्यावर कानटोपी घालून खलबत्ता घेऊन पान कुटत कुटत भूपाळी व भक्तिगीत सुरेल आवाजांत अत्यंत तन्मयतेनें गायची. अजूनहि ते स्वर माझ्या कर्णरंध्री नवनवीनतेनें निनादत आहेत : 'हरिभजनाविण काळ घालवूं नको रे–' किंवा 'असा धरी छंद...' तिनं रॉकेलचं डबडं पेटवून ठेवलेलं असायचं, वळईत मला हटकून जाग यायची. मी पाखंडी विचारसरणीचा स्वीकार केल्यावरहि जी गूढ भक्तिभावना अद्यापि मला अस्वस्थ करते, तिचा उगम मला ठाऊक आहे, या क्षणाच्या संस्कारांतच सांपडणार. मग कुठेंतरी हळूच कोंबडा आरवायचा आणि लगेच देवळाच्या नौबतखान्यांत सुप्रसिद्ध शंकर वाजंत्र्यांच्या सनईतून प्रारंभीची 'पी...पीऽपी... पीऽऽऽ' धडपडत कानीं पडायची. अमीनची काठी नगाऱ्यावर पडली कीं मग शंकर वाजंत्र्याची सनई मस्त सुरावर बहरूं लागे. एखादा भूप राग किंवा तसेंच कांहींतरी त्या सनईतून अशा लयदार गतीनें रंगूं लागे कीं पहाटेचें दिव्यत्व अगदीं अननुभूत अशा स्वर्गीय संवेदनांनीं सभोवार साकारूं लागावें. मन एकच क्षणीं विषण्ण व प्रसन्न होऊन जाई. भक्ति व शांतरसांत आत्म्याची यक्षिणी अखंड अवगाहन करीतच राही. शंकराच्या सनईतील जादू कांहीं अजबच आहे. आजहि तोच शंकर वाजंत्री, पहाटे व संध्याकाळीं तीच सनई थरथरत्या हातांत धरून चंचल मुखमंडलांतून गांवभर ध्वनित करतो. दारुड्या, अस्थिपंजर, छांदिष्ट परंतु सर्वांचा आवडता शंकर वाजंत्री ! त्याच्या घराण्याची वर्षासनानें त्याच कामासाठीं पिढीजाद नेमणूक त्या देवस्थानानें केलेली आहे. शंकरचा बाप मला अजूनहि आठवतो. बाबूराया त्याचें नांव. पण तेवढ्या प्रांतांत त्याच्या सनईची बरोबरी कुणीच करूं शकला नाहीं. ग्वाल्हेर संस्थानांतील दरबारी सनई-वादकांशीं दोन हात करून व फड जिंकून ऐन तारुण्यांत त्यानें स्वतःचा व गांवाचा नांवलौकिक केला होता. त्याचे दोन मुलगे... शंकर व भाऊ

वाजंत्री. भाऊ वाजंत्री लहानपणींच आपली सनई, एक मुरली व नशीब घेऊन परागंदा झाला. कधींकाळीं अकस्मात भाऊची स्वारी गांतांत यायची. तरं अफूच्या किंवा गांजाच्या नशेंत, आमच्या अंगणांत येऊन स्वारी टेकायची. मग आजीचं व त्याचं सांसारिक जीवनावर पुष्कळ वेळ तात्त्विक बोलणं — अगदीं जिव्हाळ्याचं बरं कां — व्हायचं! भाऊनं हनुवटीकडे छोटीशी दाढी राखली होती. डोळे खोल गेलेले, नाक सरळ व तरतरीत, भालप्रदेश विशाल, कलावंताचा. थोड्या वेळानें आम्ही पोरं त्याच्याभोंवती गोळा होऊं.

"वाजव ना रे भाऊ तुझी सनई" सारखा तगादा त्याच्यामागे. हळूहळू लहर लागायची त्याची. अचानक मग फुंकणीसारखी सनई फुंकायचा. क्षण-भरच. नंतर जें संगीत झरूं लागे... करुण, भक्ति, उदात्त भावांची ही धांदल उडायची अंतरंगांत. तो भाऊ परवां-परवांपर्यंत भेटायचा. एकदां रस्त्यांत भेटला. खंगलेला, जीर्णशीर्ण कपडे ल्यालेला, केसांच्या बटा झालेल्या आवाज बसलेला, डोळे भकास, पण लांबलचक फाटक्या कोटाच्या एका खिशांत सनई व दुसऱ्यांत मुरली. मी पहातच राहिलों. मन व्याकूळ झालें 'आतां कुठची भाऊची सनई ऐकायला मिळते...' मी स्वतःशीच म्हटले. भाऊ मला म्हणाला,

"अरे गुजाबाईचा नातू ना रे तूं..."

"भाऊ..." मी गहिंवरून म्हटलें...

"चल, आधी मला एक कप चांगला चहा व बशीभर भजी दे... अशी चीज घेऊन आलों आहे म्हणतोस... करीमखाँची ठुमरी... 'पिया बिन नाहीं आवत चैन...' आणि चहाला तत्काल विसरून रस्त्यावरच भाऊने सनईचं टोंक पुसलं, घासलं, फुंकलं आणि झाली भाऊची सनई सुरूं.. मी मग हाताला धरूनच त्याला हॉटेलांत नेलें. सर्व कांहीं व्यवस्थित झाले. प्रत्येकजण भाऊला ओळखीत होता. कुणी जें सांगितलं तें गाणं भाऊनं सनईं-तून समरसतेनें सपूर्त केलं. आरखी संध्याकाळ गुजरली. रात्रीं मीच भाऊला खानावळींत ज़ेवण दिलं. थकला-भागलेला... साठ-पासष्ट वर्षांच्या खडतर काळाचं ओझं वाहणारा तो निष्पाप पण व्यसनी जीव ज़मिनीवरच रात्रभर गाढ झोपला. एक हात सनईवर, दुसरा मुरलीवर. शेवटीं त्याच आठवड्यांत

भाऊ, सनई वाजवितांनाच छातींत कळ येऊन रस्त्यांतच आटोपल्याची वार्ता मी ऐकली.

भाऊ गेला पण त्याच्या सनईचे सूर मी आत्तां या क्षणाला स्पष्टपणें, धुंदपणें, ऐकतच आहे. त्या संवेदनांचा अभिजातपणा सारी अंतर्वृत्ति पुलकित करीत आहे. कारुण्यमय जीवनांतील ती सनई हेंच एक माझ्या जीवनांतील प्रतीक होत आहे... आजहि माझ्या जन्मभूमीच्या ठिकाणीं गेलों कीं देवालयाच्या आवारातील दगडांतून, देवतळींतून, बेलाच्या पानांतून, अंतराळांतून, गाभाऱ्यांतून व अव्यक्तांतूनहि सनईचे ते बालस्मृतींत ध्वनिमुद्रित झालेले तरल गूढ रव सजीवतेनें जाणवतात. मी वेडावून जातों. आज भाऊ नाहीं. उद्यां शंकरहि नसेल. त्यांचीं मुलंबाळं कदाचित् हा व्यवसाय सोडूनहि देतील; पण त्यांच्या सनईचे झालेले संस्कार, मला जन्मभर पुरून राहतील हें निःसंशय !

म्हणूनच गेले चार दिवस सातत्यानें कर्णपथावर आक्रमण करणाऱ्या भाडोत्री सनईवादनाचा मला वीट आला आहे. त्यांत ना भक्ति, ना कलेची भूक ! भीक केवळ आहे. सारंच भिकारडं – भकास ! ...

आणि ते सनईचे सूर कोण विसरेल ? कधींतरी ? पंधरा वर्षांपूर्वी पाहिलेल्या बरूआंच्या 'देवदास' चित्रपटांतील पारूला झिडकारून देवदास कलकत्त्याला जातो. इकडे पारूचं लग्न ठरतं. लग्नाचा तो दिवस. देवदासहि पुनः गांवीं आलेला असतो. दुरूनच विवाहसोहळ्यांतील संगीत लहरत अंतः-करणाला पीळ घालतं; आणि विशेषच म्हणजे ती सनई... कुणीतरी कोमलांगीनें कुणा कठोर हृदयासाठीं आकांताचा फोडलेला आर्द्र, नाजूक, असहाय्य टाहोच जणू ! तें कारुण्य – तें दुःख – तो दैवदुर्विलास... तें दुर्दैव ! ... तो साराच परिणाम सनईची योजना करून त्या अभिजात दिग्दर्शकानेंच साधावा !

आजहि ती सनई सर्वत्र ऐकूं येतच आहे व तेंच कारुण्य सभोवार जीवनांतहि आवेगानें सुचवीत आहे ! खरंच ! एखाद्या माथेफिरू सत्ताधीशानें भारतीय जीवनांतून सनई समूळ नष्ट केली तर ... त्या कल्पनेनेंच भारतीयत्त्वाच्या विटंबनेचीं हिडीस चित्रें मनःश्चक्षूंसमोर तरंगूं लागतात–

मी एकच सूत्र गोवीन. भारतीयत्त्व म्हणजे सनई! भारतीय संस्कृतींतील चिरंतन कारुण्य, अनंत दिव्यत्व, विशाल व्यापकत्व, दयेचे, भक्तीचे, श्रद्धेचे, मांगल्याचे, परिपूर्तीचे संकेत म्हणजे सनईचे, समृद्ध हृदयांतून आविष्कृत होणारे संपन्न सूरच! मला शास्त्रीय दृष्टचा संगीत मुळीच उमजत नाहीं. पण मी संगीतानें मंत्रमुग्ध होतों. भारतीय तंतुवाद्यांच्या जादूची मोहिनी मी आसुसलेल्या मनानें आकंठ स्व-जीवनाला वश करूं देतों. वीणा, सरोद-सारंगी, सतार, मुरली. तबला... सर्वच मला भुरळ घालतात. पण सनईनें मी अंतर्बाह्य ऊर्मींनीं उचंबळूं लागतो, व्याकूळ होतों, विव्हळतों. मानवसमाजाच्या चिरंतन दुःखवेदनांचें एक अलौकिक असें संवेदन मला सावध करते. स्त्रियांचीं दुःखे, बालांचीं दुःखें असहायांचीं, अपंगांचीं दुःखें,... मानवतेला विद्रूप करूं पाहणारीं उद्याचीं अपूर्व अभद्रें सारें सारें – नियतीच्या शोकांतिकेचीं पूरक अंगेंच जणू सुस्पष्ट दृग्गोचर होऊं लागलीं कीं शोककारणाचा भीषण उठाव करण्यासाठीं कारुण्यानें लवलेली सनईची सुरावट अपरिहार्यच ठरत नाहीं काय?

११

# काल आणि क्षण

स्वजीवनांतील भूतकाळ हा चालू वर्तमानांत कधीं मला विलक्षण विलोभनीय वाटतो तर कधीं मला तीव्र तिरस्कारणीयहि वाटतो. भूतकाळाची विशिष्ट स्मृति नष्ट करतां आली असती तर फार बरें झालें असतें. पण दैवदुर्विलास कसा असतो पहा. आमचे बापू आजच आमच्या कचेरींतील जुनेपुराणे कागदपत्र व जुनीं दप्तरें धुंडाळण्यांत अगदीं गढून गेले आहेत. शाळेचा कित्येक वर्षांचा इतिहास त्यांना शालेय नियतकालिकाच्या खास अंकासाठीं तयार करावयाचा आहे आणि त्या रद्दींतील कांहीं संदर्भ ते मोठ्याने वाचूनहि दाखवीत आहेत. कांहीं जुन्या प्रतिमाहि आतां त्यांनीं हातांत घेतल्या आहेत व मला खोट्या उत्सुकतेनें पहाव्या लागत आहेत. या बापूंच्या क्रियाशीलतेंतून माझ्या गतजीवनांतील नको त्या स्मृति उगीच चाळवल्या जात आहेत आणि हव्याशा वाटणाऱ्या आठवणीचा संपर्क दप्तरांच्या चाळवाचाळवींतून ज्या उत्कटतेनें वाटावा, तसा कांहीं होतच नाहीं. हा आतां एक जुना पांचसहा वर्षांपूर्वीचा आमचा ग्रुप फोटो आणि मी त्यावेळीं ज्या ढंगानें खुर्चीवर बसलों होतो, त्याचे हें फिकट प्रदर्शन!

(आतां तो फोटो फारच फिकट पडला आहे) 'माझें मलाच घर तापद फार झालें' या चारुदत्ताच्या उक्तिप्रमाणें मलाहि म्हणावेसें वाटतें, "माझें मलाच रूप तापद तीव्र झालें..." मलाच माझ्या एकूण स्वरूपाकडे पाहवत नाहीं तो कालच असा होता कीं मी अज्ञेयवादाकडे झुकत होतो. कोणत्या तरी गूढ अनुभूतीमुळें मी भारावून गेलों होतों. कांहीं आपत्तीहि माझ्यावर झंझावाताप्रमाणें येऊन आदळल्या होत्या. मी हतबुद्ध झालों होतों. हॅम्लेटच्या मनस्थितीचा पुरेपुर अनुभव माझ्या वाट्याला आला होता. जीं मानवी मूल्यें मी उराशीं निष्ठेनें बाळगलो होती, त्यांची दारुणतम कसोटी त्या कालक्रमांत जशी कांहीं लागली तशी पाळी तदनंतर अजूनहि कधीं वाट्याला आली नाहीं... मृत्यु अपयश (अपमानसुद्धां) अवहेलना व औदासिन्य या आसुरी शक्तींनीं माझ्यावर मात केली होती...

परंतु ज्या इवल्यांशा शालेय जगांत मी वावरत होतो, त्या विश्वांतील माझ्या भावड्या बालबालिकांना त्याचें काय? त्यांनीं एक वनभोजनाचा कीं कसलासा कार्यक्रम आंखला होता. मीच त्यांची उत्साहमूर्ति ठरलों होतों. एक मैल-दीडमैलांवर असलेल्या रमणीय वनप्रदेशांत आम्हीं आमचा तळ ठोकला होता. मुलांच्या उत्साहाला, आनंदाला तीन दगडांच्या चुलीवर ठवलेल्या भल्यामोठ्या भांड्यांतील आदणाच्या पाण्याप्रमाणेंच खळखळून कढ येत होते. मोठी मजा होती. पण मीं आंतल्याआंत गुदमरत होतो. एका अत्यंत जिव्हाळ्याच्या व्यक्तीचे स्मरण मी सतत करीत होतो. ती दूर मृत्युशय्येवर नेत्र 'पैलतीरी' लावून होती. त्याच संध्याकाळीं आम्ही मागें परतल्यावर आमचा ग्रुप फोटो काढण्याचा योगायोगहि आला. गांवांतील एका उत्साही छायाचित्रकारानें सहज हौसेनें फोटो घेतला. आणि तेव्हांच केव्हांतरी त्या धांदलींत दुपारच्या टपालानें आलेलें पत्र माझ्या हातांत पडले होतें. माझी ती प्रिय व्यक्ति अकालीं मृत्यला बळी पडली होती... आणि मी हंसतमुख राहाण्याचा विकट प्रयत्न करीत होतो.

कशाला ती विद्रूप स्मृति आमच्या बापूंनीं आतां ही चाळवली!

पण बापूंना मी दोष देणार नाहीं. बापू केवळ निमित्तमात्रच ठरले आहेत. माझ्या स्मृति-मंजूषेंत दुःखद क्षणांच्या ओल्या फडक्यांत बांधून ठेवलेल्या स्मृतींची गाठोडींच अधिक सांपडतील ! ती चाळवूं नयेत, ढवळूं नयेत म्हणून मी आटाकाटीचे उपाय, कटाक्षानें धुंडाळीत असतों आणि तरीहि असे हे आघात नियतीच्या नित्यक्रमांतून निमित्तमात्रतेनें होतच असतात... कृष्णकालांतून पुनः कृष्णक्षणांच्या काळयाकुट्ट आवरणांत मी गुरफटला जातों. भीतीला माझी भीति वाटूं लागते व मला भीतीची भीति प्रतीत होऊं लागते...

भूतकालाची या क्षणाक्षणांनी चालू असलेली स्वजीवनाशीं निगडित अशी ही विक्षिप्त गुंफण, म्हणजेच भूतकालाला तिरस्करणीय ठरविणारी शल्यें ! ... मला तीं झाडून, झळझळून टाकावयाची आहेत.

पण प्रत्येक क्षण मात्र हा असा येतो व मलाच पराभूत करतो, जखमीं करतो...

अशी माझी अवस्था होते.

आमच्या क्रियाशील बापूंना माझ्या उघड उघड निष्क्रिय दिसणाऱ्या अंतर्मनांतील या घनघोर संघर्षाचे पडसाद कुठें एकूं येत आहेत? ...
त्यांचें दप्तरें धुंडाळण्याचें कार्य घीमेपणानें चालूंच आहे..'

"हा पहा, आणखी एक फोटो, चार वर्षांपूर्वींचा"... इति बापू...

मी मात्र त्यांच्याकडे आतां ढुंकूनहि पहाणार नाहीं. भविष्यकाळाकडे दूरदृष्टि लावीत मी कदाचित सुखद स्मृतींचें अल्प धन कंजूषपणानें जतन करण्याचा अट्टाहास धरणार आहे.

कालाची आणि क्षणाची फारकत होते कीं नाहीं तें पहाणार आहे.

आत्तां या क्षणाला ! ... आणि पुढेंहि क्षणक्षणोत्तर !

(१९५९)

१२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्रत.
अनुक्रम.................... दि: ..............
क्रमांक ........................ नों दि: ..............

# न लिहिलेलीं पत्रें

माझ्या टेबलावर निळचा रंगाच्या कागदांची सुंदर वेष्टनांची, पत्र-लेखन-वही आज दुपारपासून मी जय्यत ठेवली आहे. विचारीची सर्व पृष्ठें पूर्णपणें कोरी आहेत. मात्र त्या कागदांवर छापलेल्या फिकट तपकिरी ओळी मोठचा बोलक्या वाटतात. ही वही ज्या दुकानांत जाऊन मी विकत घेतली, त्या दुकानदाराचा तब्बल एक तास मी घेतला. माझ्या मनाजोगती एकहि वही त्याच्याकडील वह्यांत आढळून येईना. शेवटीं तो कंटाळला आणि कदाचित् चिडून कांहींतरी उत्तर देणार होता, इतक्यांत माझ्या टेबलावर आरामशीरपणें पडलेल्या या वहीकडे माझें लक्ष गेलें. ती वही मी पसंत केली, तेव्हां दुकानदाराला आश्चर्य वाटलें. तो म्हणाला देखील, "साहेब, अगोदर सांगितलं असतंत, तर ही वही चुटकीसरशी मी तुम्हांला दिली असती!" शिवाय त्या वहीची किंमत इतरांच्या मानानें माफकच होती. पैसे उधळण्याबद्दल विख्यात असलेला मी, त्याच्या दृष्टीनें खास कंजूष ठरलों असेन. आठ दिवस झाले या गोष्टीला. ती वही विकत घेतली, तेव्हां माझा उत्साह शीगोशीग भरून जणूं उतूं जात होता. त्या दिवशीं निश्चय करण्यापुरतं बळ माझ्या

अंगांत संचारलं होतं......बस! इतःपर पत्र लिहिण्यांत क्षणाचीहि दिरंगाई होऊं द्यायची नाहीं. ज्या दिवशींच्या पत्राचं उत्तर त्या दिवशींच!

......पण! आठ दिवस संपून उद्यां नववा सुरू होईल. वहीचं एक पानहि शाईनं बरबटलेलं नाहीं. कोंकणांतून सौ. मातोश्रीचें पत्र आल्याला उद्या पंधरा दिवस होतील. माझ्यावर बंधुवत् प्रेम करणाऱ्या जानी दोस्ताच्या पत्राची तारीखच मला आठवत नाहीं. बहुधा हा दुसरा महिना असावा. कालच अगदीं धाकटचा प्रकाशचं गोड पत्र आलं आहे. तो लिहितो,... "दादा, तुझ्यं पत्ल का ले नाहीं येत? तूं माला मागे जी शाने गुलुजींची गोल गोल पुस्तकें दिलीश, ती आई दललोज वाचून घेते. दादा, कशे ले दिसतात् आमचे साने गुलुजी? तुझ्या बलोबल खूप खूप बोलत असतील, होय नाले? काल लात्ली कीं नाहीं जम्मतच झाली. मी आईच्या कुशीतच झोपलों होतो. शाने गुलुजींची गोष्ट आई वाचीत होती. मला लागली झोप! खलंच शांगतो दादा, माझ्या श्प्नांत शाने गलुजी आले नि मला म्हणाले,...'ए प्लकाश, ए प्लकाश, अले गोष्ट ऐकतोस ना तूं?—ऊठ बघूं!...हं ऐक. एका गावांत एक दुःखी मनुच्छ होता,...' इतक्यांत उदाली माझी झोप... कुठें ले गेले ते शाने गुलुजी?...ते तुला भेटले तल त्यांना माझं नांव शांग. मग ते मला कीं नाहीं पत्ल लिहितील..." हें पत्र काल आलं नसतं तर मला या वहीची आठवण झाली असती कीं नाहीं कोण जाणे!... माझी मानलेली बहीण शांति—तिला एक महिन्यापूर्वीं मी पत्र पाठविलं. ती त्या पत्राला चिडून उत्तर देईल अशी अपेक्षा होती ती फोल ठरली. खरोखरच रागवायची ती एकाद वेळ! म्हणून मलाच नमतं घेण्यासाठीं तिला एक पत्र लिहिणें जरूर आहे. वर्तमानपत्राच्या संपादकांना एक खरमरीत पत्र लिहिणं जरूर आहे. काय अंदाधुंदी माजली आहे ही सारी! अंकावर छापलेली किंमत असते एक आणा, आणि दोन आण्याशिवाय विकायला त्यांचा एजंट तयार नाहीं! कितीतरीं पत्रं लिहायचीं पडून आहेत!...

आतां मात्र एक एक पत्र मी पुरं करणार खास! आज, उद्यां, परवां, ...तिन्ही दिवस सुट्टी आहे. चौथा दिवस रविवार. छ.न! पण पहिलं पत्र कुणाला लिहूं बरं? ...आ,.. ई?...अं! आईला काय लिहायचं लिहून

लिहून? 'मी खुशाल आहे. काळजी नसावी. तुमची खुशाली कळविणें अमुकला नमस्कार आणि तमुकला आशिर्वाद.' हें पॅड कशाला पाहिजे त्याला? कार्ड पुरेल. उद्यां पोस्टांतच खरडावं झालं. मग? ...

...शान्ती?... छे: पण दुर्गाताईला किती दिवस पत्र नाहींच लिहिलं ... तिलाच लिहूं प्रथम! अरेच्या ऐन घटकेला आठवण झाली. बरं झालं. --- काय म्हणेल? किती निर्घृण ठरणार आहे मी? बिचारी वाट पाहून पाहून कृशांगी सीताच दिसत असेल आतां? तिच्यापासूनच सुरुवात करायची! ठरलं!!

कुणाला सांगूनदेखील खरं वाटणार नाहीं! ते सुटीचे चारहि दिवस भूतकाळांत केव्हांच जमा झाले! त्यानंतर एकदोन किरकोळ स्वरुपाच्या सुटचा येऊन गेल्यासुद्धां! आणि आज मी विकत घेतलेल्या त्या वहीला बरोबर एक महिना एकोणतीस दिवस होत आहेत. एकाद्या पतिव्रता नारीप्रमाणं ती विनयानं लीन होऊन तशीच माझ्यासमोर पडली आहे. रात्रींचे दहा वाजण्याचा सुमार आहे. चाळींतल्या संसारी लोकांची आतांपर्यंत कोण आरडाओरड, आदळआपट चालली होती. सारीं आतां शांत झाली आहेत. रस्त्यावरील माणसांची रहदारी बंद पडण्याची सुचिन्हं दृग्गोचर होताहेत. संपूर्ण दिवसभर मानवांचे अनन्वित अत्याचार निमूटपणें सहन करणारा रस्ता, जणू सुटकेचे निश्वास टाकीत आहे कीं काय, असं भासत आहे. माझी वहीसुद्धां स्वतःवर होऊं घातलेल्या अत्याचारानं कांहींशीं म्लानवदना दिसत आहे. तिचं पहिलं पान मी उघडलं आहे.

उजव्या कोपऱ्यांत दिनांक, स्थळ व कालनिर्देश केला आहे... प्रारंभीचीं 'प्रिय... ' हीं अक्षरं रेखाटलीं गेलीं आहेत... एक क्षण... दोन क्षण... तीन क्षण... अंतरामध्यें चलबिचल झाली! पण घड्याळाकडे पाहिलं, तेव्हां मन थोडंसं नाराज झालं. 'ही वेळ पत्र लिहिण्याची नव्हे' अशी ओरड एक मन करतं, तर दुसरं मन मुळींच स्वस्थ पडूं देत नाहीं.

लिहून टाकलीं असतीं पत्रं, म्हणजे ही वही केव्हांच संपून गेली असती, नाहीं कां? एव्हांना पोस्टमन चारदां माझ्या दारांत येऊन गेला!

असता. प्रेमळ माणसांचीं प्रेमळ पत्रं वाचण्यांत वेळ कसा सौख्यांत गेला असता ?... सर्वांनीं माझ्यावर चांगलाच सूड घ्यायचं ठरविलेलं दिसतं. बिचाऱ्या प्रकाशचं देखील पत्र नाहीं. दर क्षणाला वाटतं कीं, कल्पनेच्याऐवजीं खरेखुरे पंख मला प्राप्त व्हावेत. मग अविरत विहरत विहरत या प्रत्येक प्रिय व्यक्तींच्या सन्निध जाईन आणि आजवर केलेल्या हलगर्जीपणाचं प्रायश्चित्त देण्याची पूर्ण मुभा त्यांना देईन. मात्र त्यांच्यासमोर ही कोरी वही ठेवीन. आणि प्रत्येकीला एक एक पान फाडून देऊन सांगेन... "हा घ्या माझा कोरा चेक ! माझी जेव्हां केव्हां आठवण होईल तेव्हां हीं कोरीं पानं डोळ्यांसमोर ठेवा ! माझ्या अंतःकरणाचा पूर्ण ठसा त्यावर उमटलेला दिसेल. तुमच्या प्रीतीनं उमललेलीं उत्साहाचीं फुलं सदैव ताजींतवानीं मिळतील तुम्हांला. हवीं तर खुडा, हवा तर दुरुनच त्यांचा वास घ्या..."

खरंच, आजवर लिहिण्याचा दृढनिश्चय करूनहि न लिहिलेल्या पत्रांची मोजणी करावीच लागली, तर ही कोरी वही मी पुढें करीन. 'या वहीचीं जितकीं पृष्ठें असतील त्यांची दुप्पट करून, त्यांना तिहींनीं गुणून, चारांनीं भागून, त्यांत इतकें शें मिळवा व त्यांची दुप्पट करा...' असंच कोडं मी कुणालाहि घालीन. तितकीं पत्रं माझ्याकडून लिहिलीं गेलीं असतीं तर पोस्टाला खास पोस्टमन बोलवावे लागले असते, डिलिव्हरीची वेळ बदलावी लागली असती अन् कुणी सांगावं, त्यामुळेंच पोस्टमन संपावर गेले असते ! माझं मन हें असं हिशोबी असल्यामुळं, मी तें आटोक्याबाहेर भडकूं देत नाहीं ! पण माझ्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींना त्याचं काय ?

शांती खास मला विसरून जाण्याचा प्रयत्न करणार. दुर्गाताईच्या भावनावश मनाला माझ्या खुशालीबद्दल काळजी वाटत राहणार. प्रकाश आईला विचारील आणि गप्प राहील. बिचाऱ्या आईला साधं कार्ड पाठविणं... तेंसुद्धां मी केलेलं नाहीं. तुम्हीं म्हणाल, हा मनुष्य महा आळशी आहे. मी मात्र तुम्हांला महामूर्खच ठरवीन ! माझ्या सततोद्योगाची तुम्हाला कल्पना आली, तर तुमचे शब्द तुम्हांला गिळावे लागतील. माझ्या दैनंदिन दिनचर्येंत कोणताहि बदल मी सहन करूं शकत नाहीं. माझी आंघोळ, माझा व्यायाम, माझं वाचन, वाङमयीन लेखन हे सारं वेळच्या वेळीं पार पाडण्याची दक्षता मी घेतोंच.

शिवाय मित्र आहेत, भाषणं आहेत, सभा-संमेलनं, चिटणीसाचं काम आहेच! 'क्षणाची उसंत नाहीं' असं म्हटलं, तर ती अतिशयोक्ति नव्हे! आणि ठरलेल्या वेळा, काळाप्रमाणेंच माझा शनिवार हा दिवस खास पत्र-लेखनासाठीं मी राखून ठेवला आहे. दर शनिवारीं मी मोकळाच असतों. कालपर्यंत वही घेतली नव्हती म्हणून टेबलावर पुस्तकं व नियतकालिकं काय पडलीं असतील, तेवढींच समोर ठेवून मी, आलेलीं पत्रें वाचीत बसे व उत्तरांचा विचार करी! आणि खरी गोष्ट तुम्हांला ठाऊकच आहे.. माझ्या न लिहिलेल्या पत्रांचाच आंकडा जास्त आहे.

न लिहिलेलीं पत्रं! न वाचलेलीं पुस्तकं! न पाहिलेले चित्रपट! न घातलेले दंडवत! मला पत्रं लिहितां का आलीं नसतीं? पण ज्यांना माझ्यासारखी पत्रें न लिहिण्याची कला साध्य झाली असेल त्यांनाच माझ्या सौख्याची कल्पना येईल. जन्मभूमीपासून कैक योजनें दूर पोटापाठीमागून आलेल्या असंख्य जीवांना भूतकालांत वावरण्याचं एकच साधन प्राप्त झालं आहे! . . . पत्र! हा 'बोलका ढलपा' असंख्य आत्म्यांच्या विरहयातना चंद्र-किरणांप्रमाणें सहज शांत करूं शकतो. अनेकांच्या अनेक आशामंदिराच्या पायाचा पहिला दगड बसविण्याचं पवित्र कर्तव्य एक पत्रच करूं जाणें! कुणी तरी कुणासाठीं लिहिलेलीं किती तरी पत्रें नीरस जीवनांत अमरकाव्य निर्माण करीत सुटलेले दुवे सांधतात, भंगलेल्या मूर्ति जोडतात, खंगलेल्या शरीरांत चैतन्य ओततात. मी मात्र वेड्यासारखा पत्रं न लिहिण्यांत धन्यता मानतों. माझ्या पत्रांकडे आतुरतेनें डोळे लावणाऱ्या जीवांची कोण दारुण निराशा होत असेल! उद्यां सुटींत मी त्यांच्याकडे गेलों कीं, त्यांना बोलके करण्यासाठीं कोण अभिनय व अनुनय मला करावा लागणार आहे! असं असूनहि व ही वही कोरी करकरीत समोर पडली असतांनाहि पत्र न लिहिण्याचं दुःखच मला तीव्रतेनं जाणवतं!

शांतीकडे गेल्या सुटींत अनपेक्षित गेलों. केवढा आनंद झाला तिला. त्या आनंदांत म्हणूनच तिनं तो अवीट शिरा तयार केला. अजूनहि त्याची चव जिभेवर जश्शीच्या तश्शी आहे! आई अंगणांत तांदूळ सडीत होती आणि मी झटकन् जाऊन पाय धरले. अगदीं अकस्मितपणें!... "अरे, तूं

...एकादं पत्रबित्र तरी पाठवावंस ... " मग तिच्या नयनांत तरारलेले ते आनंदाश्रु...तीच गोष्ट प्रकाशची! उद्यां जातांना साने गुरुजींच्या सहीची प्रतिमा कांचेंत भरून त्याच्यासाठींच केवळ नेईन. तेव्हां किती हर्ष होईल त्याला? आणि --- ला माझीं पत्रें न आल्यामुळें राग येऊन अधिकच सुंदर पत्रं लिहावीं लागतात. तो लाभ मी काय म्हणून सोडावा? ... छे, मी ही वही अशीच कोरी राखणार! कधींकाळीं माझीं प्रेमळ माणसं सगळीं एकदां इथेंच यावीत. त्यांना माझी ही वही सांपडावी. आणि मी पहिल्याच पृष्ठावर कोपऱ्यांत लिहिलेली तारीख व वेळ पाहून त्यांना विस्मयानंदाचा अहेतुक झटका बसावा! नंतर ती 'प्रि...य...हीं अक्षर त्यांच्याकडून वाचलीं जावींत! बस!! ...माझ्या अंतरंगाचे सारे कप्पे आपोआपच त्यांच्यापुढें सताड उघडे होतील. कारण तीं सर्वच माणसं मला प्रिय आहेत. मग मी 'प्रिय...'च्यापुढें कुणा एकाचंच नांव कसं बरं घालून ठेवीन?

अरेच्या! रात्रींचे बारा वाजले आहेत! आणि खिडकींतून अकस्मात् आलेल्या वायुच्या गार झुळुकांनीं माझंच अंग केवळ शहारलं नाहीं. तर वहीची पानंसुद्धां फडफडलीं! तें त्यांचं निळं हास्य मी पोट भरून अवलोकूं नको काय?

(१९४७)

# १३

# माझी पुस्तकें व फुकटे

माझंच असं नेहमी होतं, असंच कांहीं नसावं तुम्हालाहि हाच अनुभव हर घडी आला असेल ; अर्थात् तुमचं पुस्तकावर कितपत प्रेम आहे, स्वतःची पुस्तकें तुम्ही कितपत स्वतःच खरेदी करतां व तीं कशी जपून ठेवतां, यावरच तुम्हीहि माझ्यासारखा अनुभव घेत असाल असं म्हणण्याचं मी धाडस केलं आहे. माझी पुस्तकें माझीच आहेत याबद्दल माझी जेवढी खात्री नसेल त्यापेक्षाहि अत्याधिक माझ्या मित्रांना ती माझीच वाटतात हें अगदीं खरें ! कारण ते नेहमी प्रसंशा करतात व विचारतात " का बुवा ... कोल्हापूरहून कधीं आलास ?" ... " पुण्याला कधीं जाणार आहेस ? " ' मुंबईहून जाऊन आल्याचं ऐकलं ...' आणि या पृच्छेमागे कोणत्या कमालीचा मतलबीपणा असतो हें मी क्षणांत जाणतो. मी कोल्हापूरला, तिथूनच पुण्याला व पुणें व मुंबईत तीन तासाचेंच अंतर असल्यामुळें मुंबईलाहि एकाच दमांत जातो. माझें कित्येक लगतचे नातेवाईक या शहरांतून रहातात . कुणी आध्यापकांपासून प्राध्यापकापर्यंत व मेजरच्या हुद्यापासून विमानदलांत विंग कमांडरच्या हुद्यापर्यंतहि व्यवसायप्रगत झालेले प्रेमी आहेत . तसेंच ते सर्व विलक्षण वाङमय प्रेमी आहेत. एकेकाळीं

मीं स्वतः वृत्तपत्र व्यवसायांत असतांनाचे माझे अनेक वृत्तपत्रव्यवसायी मित्र–आतां त्यापैकीं कित्येक ख्यातनाम व निष्णात लेखक–याच शहरांत मला त्यांच्या भेटी गांठी घेतां येतात. माझे कांहीं प्रकाशक मित्र आहेत. कांहीं पुस्तक विक्रेते पण आहेत. ही माझी मित्र संपदा मी ज्या ज्या वेळीं आत्मगत करतों तेव्हां मी स्वतः संपन्नतेचं एक आगळंच सुख व स्वास्थ्य अमापतेनें अनुभवित असतों. इंग्रजी, मराठी व हिन्दी वाङ्मयक्षेत्रांतील रथी महारथींच्या व नवागतांच्या सुद्धां नवनवीन रचना अनायासें माझ्या हातांत व हळुहळु माझ्या हृदयावरहि अंमल चालवितात......

मी खेड्यांत एक पवित्र कार्य कोणत्या तरी पुन्या वा अपुन्या निष्ठेनं करीत आहें. मी तसा साहित्याचा व्यासंगी आहे व साहित्य निर्मितीहि अधूनमधून संवेदनाक्षमतेनें करतों, याची जाणीव या माझ्या सुहृदांना पुरेपुर आहे. त्यांचा आग्रह असूनहि मी नागरी जीवन त्याज्य मानलें, याबद्दलहि त्यांना माझें मोठें कौतुक वाटतें; म्हणून माझी फेरी या प्रत्येकाकडे घडली कीं औपचारिकतेनंतर व खाद्यपेयानंतर माझ्या हातीं येऊं लागतं वेगवेगळं रंगीबेरंगी, सूचक, रोचक व प्रेरक पुस्तकांचं मनमोहक धन......

पहा कसं तें !

डॅफ्ने डयू मॉरियेचें नांव मी कित्येक वर्षें ऐकतों आहे. मी कॉलेजच्या प्रथम वर्षांत असतांना एका विख्यात साहित्यिकांच्या तोंडून त्यांच्या घरीं तिच्या ‘ रिबेका ’ ची स्तुति ऐकली होती व तें मोहरेदार सुंदर पुस्तकहि मी पाहिलं होतं व चाळलं होतं. त्यावेळीं अर्थातच माझं इंग्रजी भाषेवरील प्रभूत्व माझ्या आतां हिन्दी भाषेवर असलेल्या प्रभूत्वाइतकंच अभूतपूर्व होतं...कित्येक वर्षें झाली त्या प्रसंगाला......मी माझ्या पदवीसाठीं इंग्रजी विषयाचाच खास अभ्यास केला; इंग्रजींतील आंग्लभाषाप्रभूंचें व प्रतिभावंतांचें अक्षरवाङ्मय मी अधाशीपणें, भ्रमरलोलूपतेनें लुटलें......‘ रिबेका ’ चित्रपटहि मी दरम्यान पाहिला. पण डॅफ्नेबाईचं एकहि पुस्तक किंवा एकहि कथा मात्र मी कटाक्षानें सोडाच पण चुकूनहि वाचूं शकलों नाहीं......

अर्थात् तिचं व्यक्तीमत्व व अस्तित्व कुठं तरी अंतर्यामी सजीव होतं हें खरं !......

पण परवां पुण्याला गेलों विंगकमांडरकडे. त्याच्या स्टडीरूममध्यें एकटाच पुस्तकं चाळीत उभा होतों. माझा हा अधिकारी चुलतभाऊ नामवंत वैमानिक. पुस्तकांचा अलौकिक शौकिन. त्याच्या बंगल्याच्या समोरील लॉनमध्यें खुर्च्या टाकून त्याच्या तोंडून त्यानें वाचलेल्या पुस्तकांवरील रसग्रहण व परीक्षण ऐकतांना मी केवळ थक्क होऊन जातों. इतका सखोल, अनुभूतिपूर्ण व सूक्ष्मतम आस्वाद तो प्रत्येक कलाकृतीचा घेतो कीं त्याच्या व्यवसायाशीं मला तें कांहींसं विसंगत वाटतं......त्याच्या स्टडीरूममध्यें त्याच्या बुकशेल्फवर मला डॅफ्ने-बाईच्या पुस्तकांचा अखंड संग्रह मिळाला...मी नंतर त्याला म्हटलं...सारं सांगितलं...आणि तो नेहमींच्या आपुलकींत म्हणाला, " अरे, गेलीं पांच सहा वर्षं तो सगळा माझ्याकडे पडून आहे. घेऊन जा ना तुला हवा तर. " इतर पुस्तकां-बरोबरच तो ' सेट ' मी माझ्या सर्व समावेशक पेटींत भरला. अशा रीतीनें सर्वच जण सर्व प्रकारचीं पुस्तकें मला आपुलकीनें देऊं करतात. आतां इथें माझ्या पुस्तक संग्रहालयांत दिसणारा ' मॉम ' चा सेट, अख्खा एमिल झोला, संपूर्ण शरत्चंद्र, मी माझ्या सुहृदांकरवींच संपादन केला......

पण हाच माझा एकमेव मार्ग आहे ग्रंथ संग्रहाचा असं नव्हे. अर्स्किन कॉल्डवेलचा सर्व ग्रंथसंग्रह मी स्वतः खरेदी केलला आहे. अंगरख्याची, कोटाची, पॅंटीची फार जरूरी असूनहि कापड खरेदी करण्यासाठीं बाजारांत गेलों असतां, ' रिपब्लिक ' मधून मी ' कॉल्डवेल ' घेऊन घरीं आलों.

म्हणूनच माझे तथाकथित मित्र मी केव्हां कुठे बाहेर जातों, ( आणि माझी धाव कोल्हापूर-बेळगांववाटे मुंबईपर्यंत असते हें त्यांना ठाऊक असतं ! )...याची कसून वाट पहातात व मला अत्यंत आपुलकीनें नंतर भेटायला येतात. मग मला त्यांना पुस्तकें दाखविण्याचा मोह कांहीं केल्या टाळतां येत नाहीं. एकेक पुस्तक प्रदर्शित करीत असतांना एक एक स्मृतीहि उचंबळून येत असते. त्या स्मृति धनावरहि माझे खेड्यांतील दिवस मी आनंदानें

व्यतीत करीत असतों. आणि माझे विविध क्षेत्रांतील विभिन्न व्यवसायापासून तो विभिन्न धर्म व पक्षापर्यंत विखुरलेलें मित्र-ऐश्वर्य पाहून मंडळी दिपूनहि जाते.

खरंच, मित्र आणि पुस्तकें...जीवाभावाचे मित्र व अक्षर वाङ्मयांत जमा झालेले ग्रंथ विपुलतेनं लाभणं 'हें सुकृत' कदाचित् पूर्वजन्मांतील भलाईचंच तर फळ नसेल ना ?...माझ्या अन्यथा दरिद्री जीवनांत हें माझं वैभव मला एक वेगळीच सुखसमृद्धी बहाल करतं. पण मघा म्हटलेली-मला भेटायला येणारी माझी 'तथाकथित' मित्रमंडळी मात्र मला गोत्यांत आणते. फार गोड बोलून व माझ्या भावविवशतेचा फायदा घेऊन. कारण होतं असं कीं मी आणलेली पुस्तकें पहातां पहातां ते अलगद हस्तगत करतात व उद्यां परवाच्या बोलीवर घेऊन जातात. मी हतबल होऊन नंदीबैलासारखी त्यांना संमति देतों... आणि मी मलाच मुकतों. माझं वैभव त्यांचं फुकट धन बनतं आणि बेशरमपणें ते पुस्तकाचीच तेवढी गोष्ट पुढील भेटीगाठींत सहजतया लपवून ठेवतात. अगदीं पुस्तकाप्रमाणेंच !...कांहीं काळ नंतर तींच पुस्तकें कुणाच्या तरी घरीं दारीं त्या त्या व्यक्तीच्या नांवानें वावरतांना पहाण्याचं दुर्दैव नेहमीच माझ्या वाट्याला आलं आहे. कुसुमाग्रजांची 'विशाखा,' श्रीकृष्ण पोवळेंच्या 'जळमाती' उमरखय्यामच्या 'रुबाया' आज एका शिक्षिकेच्या घरीं तिसऱ्याच्याच नांवावर पडून आहेत. मला मध्यंतरी त्यांची फार आवश्यकता भासली; म्हणून त्या त्या मित्रांना मी भेटून आठवण करून दिली. पण त्यांनीं मख्खपणें कानावर हात ठेवले व माझ्या हातावर तुरी दिल्या. माझा एक विद्यार्थी मित्र या कलेंत मोठा निष्णात आहे. आतां तो महाविद्यालयांत जातो व त्याच्याच एका प्राध्यापकाकडून मला कळलें कीं पुस्तकें अचूक टिपण्यांत व तीं लंबे करण्यांत त्यानें महान प्रगति केली आहे. शालेय जीवनांतील आपल्या लघुकलेचा त्यानें चांगलाच महावृक्ष बनविला आहे. तो आपल्याकडे येतो आहे असं पाहिल्यावर...'अरे आला कवि आतां धांवा धांवा, पळा, पळा,' या चालीवर 'अरे आला ×× आतां...' अशी त्या प्राध्यापक वर्गाची स्थिति होते. मग माझ्यासारख्या पामराची काय कथा !...दिसायला कांहींसा बावळट, सबाळ, भोळसट पण बोलण्यावरून अगदीं निर्बुद्ध ठरणारा हा कंटाळवाणा माणूस

पुस्तकांसाठीं अगदीं केविलवाणी गयावया करील व तुम्ही दयावंत होऊन त्याला भीक घातलीत कीं कालांतरानें चक्क तुम्हांला बावळट ठरवील. मी एकदां माझ्या दैनंदिनींत त्याला दिलेल्या ग्रंथांची नोंद त्याच्यासमोर करून कांहीं अटीवर त्याला पुस्तक दिलें. चांगला सव्वा आठ रुपये किंमतीचा व काव्यशास्त्रावरचा अत्यंत मौलिक ग्रंथ होता तो. पण त्या निढावलेल्या 'फुकट्यानें' तो कधींच मला परत केला नाहीं. मी त्याला 'नोंद' दाखविली तेव्हां तो दगडी थंडपणें एवढंच म्हणाला, "सर, तुम्हीं फार विसरभोळे आहांत. मी तुम्हाला तो परत केला, त्याची नोंद तेवढी करायला विसरलांत..." योगायोगानें त्याच्या घरीं जाण्याची संधी एकदां आली आणि तो ग्रंथ तिथेंच माझ्या दृष्टीस पडला... आणि तेव्हांपासून मी त्याची उघड निर्भत्सना करून त्याला माझ्याकडे येण्याची बंदीच घातली म्हणानात! मला अलिकडेच कळलं कीं तो माझीच सर्वत्र निंदा करतो व मीच म्हणे त्याच्या पुस्तकांची चोरी केली आहे, असें ठाशीव व ठराविक प्रतिपादन करीत असतो.

खरोखर पुस्तकें विकत घेण्याबद्दल व वाचण्याबद्दल एखादा कायदा कठोरपणें अंमलांत आणण्याची वेळ येऊन ठेपली आहे. या 'फुकट्या' वाचकांवर तर निश्चितच कांहींतरी कायदेशीर इलाज करतां आला पाहिजे. त्यांना नीतीचें व रीतीचें पूर्ण वावडें असतें. ते आज माझी पुस्तकें पळवितात उद्यां तुमची पळवितील. आणि हे सर्व सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणविणारे लोक!! या सुसंस्कृत 'फुकटयां' ना खरोखरच 'फटक्याची' शिक्षा जाहीर रीतीनें दिलीच पाहिजे, असं मला अलिकडे फार फार वाटूं लागलं आहे. मी म्हणूनच मुंबई-पुण्याहून आल्यावर माझ्या दारीं घोटाळणाऱ्या या माझ्या निकट मित्रांना कटाक्षानें टाळतों. त्यांनीं येऊन ठाण मांडलेंच तर मी त्यांच्याकडे मागील पुस्तकासाठीं सारखं टुमणं लावतों... मग ते समजायचं तें समजतात. निघून जातात. खरंच, चूक आहे कां कांहीं माझी यांत?

(१९६०)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
१४
अनुक्रम ३५३२६ वि: निबंध
क्रमांक ........ नों दि. १७:८:६३

# बिनकर्जवाले लोक

या लोकांचा मी मनस्वी तिटकारा करतों. जीवनांतील अनेक महान् सुखांना ते मुकलेले असूनही, स्वतःसारखे सुखी पृथ्वीतळावर दुसरे कुणीही नाहींत अशी त्यांची ऐट असते. माझ्या ठिकाणीं दुसरा कुणीही सूज्ञ प्राणी असता तर त्यानें त्यांची कींव केली असती. मी मात्र त्यांना अखंड तिरस्करणीय मानतों, व भविष्यकाळांत कधीं माझं संपूर्ण कर्ज फेडून त्यांच्याच पंक्तीला बसण्याचा प्रसंग मला प्राप्त झाला, तरी मी त्यांचा निस्सीम तिरस्कारच करीत राहीन, याबद्दल मी निःशंक आहें. आतांचीच गोष्ट घ्या. जरा कुठें मी चुकून विसावा घेत होतों, ( माझी कल्पना होती कीं, मी वेळ अचूक साधली आहे–रात्रीचे दहा वाजलेले–कोण येतोय मरायला या वेळीं ? . शिवाय तो रविवारचा दिवस... आणि मुंबई... ) डोळे गच्च मिटून दोन तीन मनोराज्यें एकदमच उभारण्याच्या विचारांत होतों, तोंच कानांनीं दगा दिला. दारावर दोनतीन थापा दणकून बसल्याचं व नवनवीन थापांच्या बदलत जाणाऱ्या आवाजाचं पुरेपूर ज्ञान मेंदूला झालं. ' इंद्रियाणि इंद्रियार्थेषु ' या भगवन्त

उक्तीप्रमाणें दोन्ही पाय चालूं लागले, हात पुढें सरसावले, डोळे ताठरले, दार उघडलं गेलं... आणि माझे तीन चार जीवश्चकंठश्च स्नेही एकाच वेळीं आंत घुसले. आतां, या स्नेह्यांचा परिचय करून देण्यापूर्वी, अगोदरच स्पष्ट करून ठेवलेलं इष्ट कीं, माझ्या असंख्य मित्रांपैकीं माझा मीच एक स्वतःचा असा मित्र आहे कीं जो बिनकर्जवाला नाहीं. बाकी माझे सारे मित्र–त्यांतले कांहीं लंगोटीयार होते, कांहीं खेळगडी, वर्गमित्र व इकडचे तिकडचे मित्र वगैरे–माझे मित्र खरे, पण परस्परांचे मात्र प्रतिस्पर्धि–असेच माझ्या वाट्याला आलेले आहेत.

कधींकधीं त्यांच्यापैकीं कोणी माझ्यावर इतके बेसुमार उखडतात, कीं मैत्रीचे प्रेमपाश तोडून 'घटस्फोट' करण्याची भाषा ते चिडखोर व अस्सल गांवढळ भाषेंत मला ऐकणं भाग पडतात. पण मी मात्र शांत मनानं माझं त्यांच्यावरील अकृत्रिम प्रेम शाबूत ठेवण्याचा प्रयत्न करतों; व आतां तर त्यांच्यापैकीं सर्वच माझ्यापासून जितके दूर जातात न जातात तोंच माझ्या तितकेच जवळ येतांना पाहून, त्यांच्या धमक्या, ज्या कौशल्यानं मी कर्ज बुडवूं शकतों, तितक्याच सहजपणें भवसागरांत बुडवून टाकतों. त्यांची एकच कुरकूर असते असं लोक येऊन मला सांगतात; व ती म्हणजे मी त्यांच्याकडून नेहमीं कर्ज घेतों व तें फेडण्याचा कोणताच आव आणीत नाहीं. पण जोंपर्यंत हे माझे मित्र माझ्या तोंडावर असं चक्क ओरडून सांगत नाहींत, तोंवर खऱ्या मित्रांबद्दल ज्या भावना शेक्सपियरनें माझ्या मनांत दृढ केल्या आहेत, त्याच त्यांच्या अंतःकरणांत सुद्धां दृढ वास करून आहेत, असं मी धरून चाललों आहें! लोकांचं काय? विघ्नसंतुष्ट मनाची हौस पुरी करण्यासाठीं केवळ मर्जेत त्यांना भावाभावामध्यें वितुष्ट निर्माण करतांना मी पाहिलं आहे-फार काय, मी सुद्धां– पण, हवं कशाला हें चर्वितचरण?

असं असूनही माझ्या मित्रांसहित जे जे सारे बिनकर्जवाले आहेत त्यांचा मला तिटकारा वाटूं लागला आहे, हें तितकंच खरं! माझ्या मित्रांचंच पहाना. रात्रींच्या अनपेक्षित घटकेला मला भेटायला आलेले हे प्रेमळ जीव, मनमोकळ-पणानं माझ्याबरोबर बोलूं शकले नाहींत. प्रत्येक क्षणाला त्यांची दृष्टी कावरीबावरी

होई व तोंडांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दाशब्दांमध्यें अमानुष सावधपणा दिसून येई. ज्यानें मला काल ताकीद दिली होती त्या इराण्याकडून स्पेशल कॉफीचीं दोन तबकें मागवूनही, संशयी माणसाप्रमाणें ते बेचैन झाले होते. त्यांच्यावर निगूढ प्रीति करणाऱ्या एका उदयोन्मुख कलावंताचा पाहुणचार देखील ते खुल्या दिलानं उपभोगूं शकत नव्हते. आणि अशा विमनस्क मनःस्थितींत माझ्या खोलींत बावरून परत जातांना प्रत्येकानं माझा कान वेगवेगळ्या कोपऱ्यांवर आपल्या तोंडासमोर धरला, तेव्हांच–अगदीं त्या अशुभ घटकेलाच–मित्रांचा फोलपणा मला कळून आला, व बिनकर्जवाल्या लोकांची हलकी मनोवृत्ति पुरेपूर उमगली! माझा एकच आणि क्षुल्लक दोष होता–त्या सर्वांचं मी देणं लागत होतों!! बिचारे अकरा वाजेपर्यंत थोर अंतःकरणानं माझ्या-भोंवतीं वावरले आणि जातांना मला तंबी देऊन गेले...चौथ्या मजल्यावरील माझ्या खिडकींतून क्षणभर तरी बाहेर दृष्टिक्षेप करण्याची तसदी त्यांनीं घेतली का? मुळींच नाहीं. शारदीय पूर्णिमेचा चंदेरी विलास सृष्टीच्या नसानसांतून दृश्य चैतन्य निर्माण करीत होता. अशा एका दिव्यत्वाचा भव्य साक्षात्कार अंतरींच्या भावनांना गूढ हिंदोळे देत होता कीं, मी त्या क्षणीं एकटाच माझ्या खोलींत असतों, तर बेहोष होऊन नाचलों असतों; रडलों असतों वा खिन्नवदन होऊन त्या निराकार अव्यक्ताच्या मायेनं गांगरून गेलों असतों. मर्त्य जगापासून कितीतरी दूर, उराशीं जोपासलेल्या स्वप्नसृष्टींत प्रवेश करून उमरखय्यामी नशेंत शेलेच्या त्या काव्यपंक्ती पुनः पुनः गुणगुणण्याची लहर अशा वेळीं न आली तरच नवल–

And we pine for what is not–

ते गेल्यावर खिडकींतून मी बाहेर डोकावून पाहिलं. चार दिशांना ते चौघे, सुतकी चेहऱ्यानं व जड पावलं उचलित कसेतरी सरपटत होते...बिचारे बिनकर्जवाले!...उद्यां कर्ज कुणाचं काढावं या चिंतेनं व्याकुळ होण्यापेक्षां दिलेलं कर्ज कसं गोळा करतां येईल या विचाराच्या चिंतेनं होरपळून निघालेले दळभद्रे लोक. मी बिनकर्जवाला असतों व कर्ज देण्याचं माझं सामर्थ्य असतं तर मी त्यांना हसतमुखानं सामोरा होऊन म्हटलं असतं –

" अनंत हस्ते कमला वरानें
देतां किती घेशिल दो करानें "

बापजाद्यांची गडगंज संपत्ति वाट्याला आलेली, शिक्षणाची मर्यादा चार इयत्तांच्या भिंतीला आपटून स्थिर झालेली, सट्टे, रेस व दलाली यांत मनें व संपत्ती रंगून गेलेली...दोन वेळच्या ताजमहालमधल्या जेवणाची सुद्धां चिंता नाहीं....भविष्यकाळाची फिकीर नाहीं...पण मला दिलेल्या पसाभर कर्जानं मात्र जीव मुठींत घेतल्याप्रमाणं त्यांचं घृणास्पद वर्तन......!

मी तर शेक्सपियरचा मोठा भोक्ता आहे. त्याच्या कांहीं नाटकांवर तर मी प्रभूत्व मिळवून 'वाहवा' पैदा केली आहे. कवि कुलगुरु कालिदासाची प्रतिमा शेक्सपियरच्या प्रतिमेशेजारीं लटकवितां येत नाहीं म्हणून कित्येक विलाप पत्रें देखील माझ्या मित्रांना मी लिहीलीं. कवि, कलावंत व कलावंतिणी यांच्याकडे माझा नैसर्गिक कल. पण मानवी स्वभावाचं करुण किंवा हास्यास्पद गूढ ब्रह्मदेवाच्या हातानं उकलून दाखविणाऱ्या शेक्सपियरचा तत्त्वज्ञानी आवेश मला कधींच भुलवूं शकला नाहीं. जिव्हाग्रावर नाचणारे त्याचे ते काव्यचरण—

Neither a borrower nor a lender be. मराठी शाहिर अनंतफंदी आपल्या एका फटक्यांत असाच कांहींसा उपदेश मनुष्यजातीला करतो.—मला वाटतं, त्यांना कर्ज काढावं लागलं होतं, पण कर्ज पचविण्याची कला अवगत नव्हती! शिवाय ते निश्चितच या बिनकर्जवाल्या लोकांतच त्या काळांत मोडत असावे. अर्थातच त्यांचा तिटकारा मला वाटला तरी त्यांच्या इतर गुणांबद्दल मी प्रेमादरच बाळगून आहे, हें काय निवेदन केलंच पाहिजे!

परवां एक प्राध्यापक माझ्याकडे मोठ्या अभिमानानं म्हणाले......' या दादर विभागांत असा एकही मनुष्य नाहीं कीं ज्याचे दोन पैसे मी देणं लागतों......' माझं हंसू दाबण्याचा माझा प्रयत्न वांया गेला नसता तर ते त्या घमेंडींतच आणखीही पुष्कळसं कांहींतरी बरळणार होते. त्यावर ते

चिडूनच मला म्हणाले......" तुला सारी चेष्टा वाटते. पण तुझी स्थिति मला ठाऊक नसती तर एक पैही मी तुला दिली नसती......" ते माझे शेजारीच. एकाच खेडेगांवांत आमचं बाळपण गेलं व तारुण्य सुरूं झालं. तत्त्वज्ञान हा त्यांचा व माझा सारखाच आवडीचा विषय. पण त्या ज्ञानामुळें ते दारुण गंभीर बनले व मी तितकाच बेदरकार...

इतर बिनकर्जवाल्या सज्जनांप्रमाणेंच ते समाजांतून उजळ माथ्यानं वावरूं शकतात, हें मी नाकबूल करीत नाही. पण माझ्यासारख्या कर्जवाल्या लोकांची डोकीं नेहमींच त्यांच्यासमोर झुकतात, असं त्यांनाही म्हणवणार नाहीं. उलट कर्जवाल्या लोकांपासून 'शिरसलामत' ठेवण्यासाठींच त्यांची केविलवाणी धडपड चाललेली असते !

मी त्यांचा तिटकारा करतों. पण तितकीच त्यांची कींवसुद्धां गुप्तपणें माझ्या अंतर्यामीं वावरत असावी. चार मजली इमारतीचे चार जिने पायीं तुडवून कासावीस होऊन धापा टाकीत येणारे ते अर्थोपजीवी मित्र मला आठवले कीं जीवित वैफल्याची मीमांसा मला पटूं लागते. घाण्याला जुंपलेल्या तेल्याच्या बैलाप्रमाणें ठराविक चाकोरींतून मिटलेल्या डोळ्यांनीं व मेलेल्या अंतःकरणानें जीवन कंठणाऱ्या या दुर्दैवी मठ्ठ मर्कटवंशजांनी मानवी मनाची साधीं मूल्यें ठरविलेलीं असतात. गंधर्वांचा अभिनय चकित दृष्टीनें पहाण्यासाठीं रुपयांची हवी तशी खैरात करणाऱ्या या अभागी जीवांना आपल्यामध्यें असलेल्या व कुणाही कसलेल्या नटाला लाजवील अशा अभिनय सामर्थ्याचें ढोबळ ज्ञानसुद्धां झालेलें नसतें. नाहींतर रस्त्यांतून भेटणाऱ्या किंवा पाळतीवर राहून हळूच डाव साधणाऱ्या या बिन कर्जवाल्या मित्रांना, कधीं तोंडावर हंसू आणून, कधीं सुतकी चेहरा बेमालूम वठवून तर कधीं हुकुमी आंसवांनी डोळे पाणावून, गुंगारा देण्याची कला आपोआप अवगत झाली असती. एवढेंच नव्हे, तर कर्ज काढण्याची कोणतीही आवश्यकता नसूनही, कर्ज काढण्याचा रेसइतकाच अनिवार्य छंद त्यांना लागला असता. मी चौथ्या मजल्यावर राहतों याबद्दल त्यांना पुष्कळदां वाईट वाटतं पण त्यांना

चुकविण्यासाठीं अनेक वेळां मी हा मजला बदलून कोणत्या तरी अव्वल दर्जाच्या वस्तींत तळमजला गांठण्याची माझ्याकडून केलेली शिकस्त–ती वार्ता त्यांना ठाऊक नाहीं हेंच मी माझं सुदैव समजतों अशांतला कांहीं भाग नाहीं—

कारण यापुढं तसे प्रयत्न मी मुळींच करणार नाहीं. ज्या क्षणाला, मी ज्यांना माझे खरे मित्र पण जगांतील अभागी प्राणी समजतों अशा या बिन-कर्जवाल्यांची थाप माझ्या दारावर पडते त्याच क्षणाला माझ्या प्रतिभेचे कोवळे पंख वेगानं फडफडूं लागतात, व त्या ध्येयाकडे माझं मन भराऱ्या घेऊं लागतं... तें ध्येय कीं,... जें साध्य झालं असतां, ‘ अर्थस्य पुरुषोदासः’ ही पुरातन म्हण पूर्णपणें गाडली जाऊन सारे पुरुषच परस्परांचे दास म्हणवून घेण्यांत स्वतःला वैभवशाली, किंवा खरे श्रीमंत मानूं लागतील. तोंपर्यंत या बिनकर्जवाल्यांनीं कितीही नक्राश्रू गाळले तरी माझ्या रडण्याचा त्यांच्यावर परिणाम होईनासा होईपर्यंत मी त्यांना असाच झुलवित रहाणार !

मात्र माझ्याबद्दल कधींतरी त्यांना निस्वार्थी प्रेम वाटूं लागेल अशा फसव्या समजुतीनें मी जसा फसणार नाहीं, तद्वतच त्यांच्याबद्दल मला वाटणारा स्वार्थी तिटकारा कांहीं कारणामुळें मी नष्ट करूं शकेन, असंही मला वाटत नाहीं. त्या सर्वांमध्यें माणुसकीला ललामभूत होणारा एकच थोर गुण सारख्याच प्रमाणांत वास करीत आहे, हें जातां जातां मी सांगून ठेवतों... व्हेनिस शहरांतील शॉयलॉकची गोष्ट त्यांना ऐकून व वाचून ठाऊक आहे.— आणि त्यांच्याइतका शॉयलॉकचा आत्यंतिक तिटकारा करणारे दुसरे लोक मी अजूनपर्यंत कुठेंही पाहिले नाहींत !

(१९४७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... ३५३२६ ... वि: निबंध
क्रमांक ......... नों दि: १७.८.६८

१८

# सुटले माघामधले वारे

माघ महिन्याला प्रारंभ झाला आहे. गेले चार सहा दिवस माघांतील लहरी प्रसन्न पण खट्याळ वारे सातत्यानें सकाळ दुपारचे वाहूं लागले आहेत. सभोवतालची सृष्टीसुद्धां स्वरूप पालटीत आहे. आवेगानें आम्रवृक्ष मोहरांचे तुरे मादकपणें पानापानांआडून प्रकट करूं लागले आहेत. काजूची झाडंही बोलकी होण्याची नेहमीची ठराविक चिन्हें दाखवूं लागलीं आहेत. वातावरणांत हळुहळु गंध, रस, रंग भरूं लागणार आहे. प्रसन्नतेचं प्रशांत व आल्हादक अस्तित्व जाणवूं लागलं आहे. माघ महाची मंद मंद पदचाल अननुभूत अनंत भावलहरी अलगद हळूवारपणें ढळवीत आहे. बालपणी कधींतरी पाठ केलेली काव्यपंक्ति ओठावर अस्फुट उमटत आहे...

'सुटले माघामधले वारे...
सुटले माघामधले वारे...'

मासचक्रांतील हा महिना माझा फार आवडता आहे. त्याला कारणेंही तशीच आहेत. या महिन्यांतच माझा जन्म झाला. याच महिन्यांत आणखीहि

या विश्वांतील अब्राहम लिंकन सारखे माझे आवडते महापुरुष जन्माला आले आहेत. इंग्रजी फेब्रुवारी महाच्या कालांतच हिंदु माघाची कालगणना होते. माघ काय किंवा फेब्रुवारी काय, दोन्ही महिन्यांचा प्रारंभ मला पुलकित करतो. रोमांचित करतो. याच महिन्यांत शिवरात्र येते व त्रिमूर्तीतील शिवाचं प्रतीक मला विलक्षण मोहून टाकतं, भारून टाकतं. परंपरागत चाली रूढींचं आस्तिक्य अव्हेरणारा मी तसा शैव आहे. शिवाचा निस्सीम उपासक आहे. प्रभू श्रीकृष्णानं म्हटलं आहे ...' मासानां मार्गशीर्षोऽहम् ' प्रभू सांब सदाशिव असंच कांहींसं म्हणेल असं मला नेहमी वाटतं...तो म्हणेल. " मासानां माघ-मासोऽहम् ' नाहीं का ?

खरंच !

कितीही अप्रसन्न असलों तरी माघमहांत माझ्या मनाचा रिता डोह एका आगळ्याच प्रसन्नतेच्या प्रशान्त जलसंचयानें पुरेपूर भरून जातो. सळसळतो. कांठोकांठ भरूनही भरतच राहतो. वाहूंही लागतो. हा महिना आला. त्याची चाहूल लागली...( आणि ती हटकून लागतेच.) पौष संपुष्टांत आला, जानेवारीची अखेर झाली, फेब्रुवारी उजाडला कीं एका विचक्षण क्षणाला मी झोपेंतून जागा होतों वा जागृतींतून निद्रावस्थेंत प्रवेश करतों तो पुनर्जन्माच्या एका नवानुभूत अमृत जाणीवेनेंच ! मनींच्या अंतर्विश्वांत कटु जीवनाच्या अपयशी घटनांचे अभद्र जीवजीवाणूं, निंदा निराशेचे डांस, पिसवा, जंतु व अगतिकतेच्या सुसरी अन् गिधाडें घिरट्या घालीत, लिवलिवत, वळवळत, तर कधीं डंख करीत अंतर्बाह्य देहदंड करीत असतांही माघागमनाच्या केवळ आभासांतूनही ही सारी मनोमालीन्याची दुर्गंधी मी लीलया चौफेर उधळून लावतों. त्यांना आरपार पिटाळून त्यांचे तीन तेरा करतों. सदेहावस्थेंतून मी संपूर्ण विदेहावस्थेंत जातों. सलोकता, समीपता वगैरे चारी मुक्तींचा संतृप्त लाभ केवळ त्या एका क्षणांत मला क्षणिक कां होईना, पण परिपूर्णतेनें होतो.

' भावस्थिराणि जननान्तर सौहृदाणि '

ही अनुभूति, माघाची चाहूलच केवळ, मला पुनः पुनः देत राहते. आणि त्याला तसेंच मूलभूत कारण आहे. किंबहुना कारणपरंपरा आहे असंच म्हटलं पाहिजे. तीं एकूण कारणं माझ्या बालजीवनांतच घडलीं आहेत. बालजीवनांत घडलेले ते मृदुमधुर संस्कार अशा वेळीं तारूण्यांतील असंख्य कुसंस्कारांची कडीकुलुपें तडातड तोडीत माझ्या कृष्णकृश आत्मारामाला नवा प्राण बहाल करतात. मग अन्यथा निष्पर्ण अशी माझी आत्मवेल सपुष्पतेची गर्भचिन्हें सहर्ष धारण करते. पुलकित होते. पुनर्जन्म पावते.

लहानपणीं आम्ही आमच्या जन्मग्रामांतील श्रीकलेश्वराच्या आवारांतच अधिक वावरत असूं. हिंडत असूं. हुंदडत असूं. आमच्या देऊळवाड्याला बिलगूनच तें कलेश्वराचं प्रशस्त देवालय आजही वैभवानें विराजत आहे. देवालयाची मूळ वास्तु भली लांबरुंद व रेखीव बांधलेली आहे. या स्थायी वास्तु-भोंवती कलेश्वराच्या देवगणांचीही कित्येक छोटी छोटी मंदिरें बांधली गेली आहेत. या देवालयाभोंवतीं प्राचीन बांधणीचा एक दगडी तट चहुंबाजूला खडा पहारा करीत उभा आहे. त्या तटाच्या चार दिशांना चार प्रवेशद्वारेंही भाविकांना विमुक्ततेनें आवाहन करीत आहेत. दक्षिणेकडील जें अर्धवर्तुळाकार भव्य प्रवेशद्वार आहे, त्याच्या माथ्यावरच नगारखान्याची योजना केली आहे. त्याला बारीक, चपट्या, दाक्षिणी विटांचं गोपुरम् शैलीचं टोकाकडे निमूळतं होत जाणारं छप्पर आहे. आंत ताशा, ढोल, नगारा, झांज ठेवली आहेत. वाजंत्र्यांना बसायला मधोमध फरशीचा चौक आहे व दुतर्फा दगडी ओटे बांधले आहेत. पंचपंच उषःकाली इथूनच शंकर वाजंत्र्याची सनई भूप सुरावट स्वैर घुमविते. अमीन मुसलमानाचा ताशा तडतडतो. आत्माराम देवळ्याचा नगारा गरजतो. म्हणूनच पहांटे जागं होणं हा माझा सहजधर्म झाला आहे. बाल्यावस्था ओसरल्यावर जन्मस्थळापासून दूरवरच माझा बराचसा जीवनक्रम मी घालविला. अजूनही अधूनमधूनच मी तिकडे जातो. पण माघांतील पहांटेची पहिलीच झुळुक मला स्पर्श करतांच मी मनानें ढळतों; देह वळवून उठतों; आणि कलेश्वराच्या आवारांतील उषःसंगीताच्या आभासात्मक परन्तु अतिसूक्ष्म संवेदनांनी उत्स्फूर्त होत दैनंदिन व्यवहार उरकूं लागतों.

आमच्या गांवाचं मोठं वैशिष्ट्य म्हणजे शिवरात्रीचा महोत्सव. देवालयाच्या आवारांतच तटाच्या एका कोपऱ्यांत देवाचा चारपांच ताळांचा उंच व प्रचंड शिवरथ सुरक्षित, आजही डौलानं चार विशाल चक्रांवर साडेअकरा महिने स्थिर, अचल अशा अवस्थेंत उभा असतो. बालपणीं देवालयाकडे केव्हांही फेरी झडली कीं रथारूढ होण्यासाठीं आम्हां मुलांची विलक्षण घाई व धांदल होत असे. चौथ्या ताळ्यापर्यंत चढणं व कळसाला नेऊन हात लावणं हें मुख्य उद्दिष्ट ! रथ लांकडी आहे. प्रत्येक मजल्याची रचना सुबक, कोरीव, कलात्मक आहे. लाकडी द्वारपाल, सारथी, घोडे, सिंह, गरुड, सुयोग्य ठिकाणीं औचित्य-पूर्ण बसविले आहेत. आम्हीं मुलं रथघरांत घुसलों कीं बिचारीं स्वस्थपणें विश्राम करणारीं कबुतरें फडफडूं लागत. भुर्रकन् उडून जात.

हा शिवरथ हें बालजीवनांतील तेव्हांचं निरागस विलोभन होतं. शिव-रात्रीला पंधरा एक दिवसाचा अवकाश आहे त्याच दरम्यान गांवची गांवकर मंडळी रथघराकडे लक्ष देऊं लागत. काथ्याचे वळलेले चिवट व जाडजूड दोरखंड वापरून शेंकडों असामींकडून रथ घराबाहेर ओढला जाई. मला आठ वर्तं, सकाळीं आमची मराठी शाळा शिकविण्याच्या ऐन भरांत असायची. अकस्मात् कुळकर्णीभाऊ दाभोळकर हेडमास्तरांच्या खिडकीजवळ...उपरणं घेतलेले, फेटा बांधलेले...भारदस्तपणें उभे असायचे. हेडमास्तर मग आमच्या अनंत मास्तरांना खुणेनें बोलवायचे. पोरांनी चटकन हेरलंच मग !

'अरे, आतां देवळांत जावूंक् व्हयां...'

'आज रथ ओढतलेत् सा दिसता ...'

'शिवरात्र इली न्हय् जवळ...'

आणि हे सारे अंदाज खरे ठरत. तोपर्यंत तिकडे देवळाकडे महार लोक ढोलावर ढोल बडवीत. शिंग फुंकलें जाई. क्षणांतच मास्तरांचा हुकूम होई...

'पोरांनो, देवळाकडे चला. रथ ओढायचा आहे...'

मग देवळाच्या आवारांत शेंकडों मुलं घुसायचीं. बापू फौजदार सर्वांना दोन बाजूंच्या दोन दोरांना नीट जुंपायचा...प्रथम अर्थातच दोर पकडायचा कसा,

उभं कसं रहायचं, रथ चालू झाला कीं कसं रेंगाळायचं नाहीं, 'हरहर महादेव' अशी घोषणा कशी द्यायची... या सान्या उपचारांचं तो प्रात्यक्षिक दाखवी. त्या भाऊगर्दीत मराठी चवथी पांचवींत असलेला मी हर्षोत्फुल्ल होऊन जाई. त्या क्षणापासून पुढील प्रत्येक क्षण मला सुखद वाटे. सुखाच्या चढत्या जाणीवेच्या उत्कट संवेदनांनी माझं बालजगत् मोहरून जाई. बहरून येई.

तें बालजगत् आतां दिवंगत झालं आहे. पोरपणाची पिसं गळून पडलींत व प्रौढत्वाचं कवच कूर्मन्यायानं काठिण्याचं आवरण घालीत जीवन अबोलकं व कांहींसं अगतिक करीत आहे. आज माघाचे वारे स्पर्श करतांच अंतरीचे उमाळे उफाळून येतात ते उद्यांच्या अमाप सुखाच्या अतीवतेनें नव्हेत, तर कालच्या निसटून गेलेल्या निरागसतेच्या निर्मळ स्मृतिलहरींच्या थरथरण्या-मुळेंच ! एक जगावेगळं जीवन जगावेगळ्या शैलीनं जगण्याचा प्रयोग मी ऐन उमेदींतच अशा बेछूटपणें केला कीं कुणाच सुहृदांची वा सोयऱ्यांची तमा तत्क्षणीं मी बाळगिली नाहीं. त्यावेळच्या माझ्याच एका कवितेचे चरण असे होते—

'तोड बंध तूं खुशाल काळजी कशास रे...

शेवटची ओळ होती...

'ध्येयीं तुझ्या हेम नसे प्रेम तिथें कोठलें !...'

विशुद्ध प्रेम, विशुद्ध त्याग व विशुद्ध चिरजीवन अशा तीन स्वप्नपऱ्यांनी माझी प्रदीर्घ काल भुलभुलावण केली. एका अबोध व गूढ विश्वाचा शोध लावण्यासाठी जीवननौकेचं व्यवहारकिनाऱ्याला टेकलेलं ताजं तारूं, मी माघारें वळविलं व अनंताच्या अमूर्त, अव्यक्त व असीम दर्यांत बेभानपणें पण निश्चयानें खुशाल लोटून दिलं. माझ्या या गूढ जलपर्यटनांत मीच माझा नावाडी होतों. मीच एकटा त्या नौकेंतील एकाकी एतारू होतों... परन्तु खरं सांगतों, इच्छित प्रदेशांत मी अजूनही पाऊल टाकलेलं नाहीं. उलट कोलंबसाप्रमाणेंच माझंही जीवनतारू अनपेक्षित दुसऱ्याच किनाऱ्यावर आज अडकून पडलं आहे. मात्र दोष माझाच आहे. अपराधी मीच आहे. विशुद्ध वैफल्य, विशुद्ध भोगवाद,

विशुद्ध मृण्मयत्व या मानवी संपत्तीने समृद्ध विश्वांत आतां मी खरंखुरं घट्ट पाऊल टाकलं आहे. माझी ध्येयनौका नांगरून पडली आहे. एका बाजूला तिच्यावर उल्हासाने फडफडणारा विशुद्ध श्रद्धेचा शुभ्र ध्वज कांहींसा आतां मलिन झाला असावा. तो झटकून, झाडून धुऊन स्वच्छ करावा असं खूप वाटत असूनहि मी कांहींच हालचाल करूं शकत नाहीं, अशा निष्क्रीयतेच्या जाळींत मी गुंतून पडलों आहे. मी हादरलो आहे; थबकलो आहे.

पण माघाची चाहूल लागली कीं मी थबकलेला उठतों, हादरलेला सांवरला जातों. गेलेली दृष्टी मला नव्याने पुनर्लाभते, हरवलेलं मला सांपडतं आणि शोधावयाचं आहे तें स्पष्ट होऊं लागतं. ज्या विश्वाचा वेध घेण्यासाठीं मी पाऊल पुढें टाकलं, तें विश्व अव्यक्त असलं तरी अजूनही मला तें अशक्य वाटत नाहीं. अमूर्त असलं तरी आटोक्यांतलंच वाटतं. माघमहांतील वाऱ्याची पहिली झुळूक हळुवारपणे माझ्या कानांत येऊन मला सांगते. . ., ' अजून तूं थकलेला नाहींस ऊठ. चालूं लाग. तो श्रद्धेचा मलिन ध्वज जरा शुभ्र होऊं दे. ऊठ. ऊठ. ''

( १९५७ )

१६

# ये पहांटेचा तारा गगनी....

अलीकडे पहांटेला अंथरूण सोडण्याचें मला कांहीं केल्या साधावं तितकं साधत नाहीं. एक तर रात्रौ बारा वाजेपर्यंत झोपेची आराधना करण्यांतच वेळ जातो. जें कांहीं वाचन दिवसा केवळ अशक्य होतं, तें रात्रौ झोंपण्यापूर्वी अल्प प्रमाणांत कां होईना, पार पाडण्याचा मी प्रयत्न करतों. म्हणजे होतं काय कीं अगदीं ' टाइम्स 'पासून एखादी इंग्रजी, हिंदी वा मराठी कादंबरी, दुसरं तिसरं कवितेचं पुस्तक, एखादा शिक्षणशास्त्रावरचा ग्रंथ आणि कधींकधीं एखादी सटर फटर रहस्यमाला सुद्धां...सगळ्याचंच वाचन अर्धं पाऊण निम्मं झालेलं... माझ्या बिछान्यावर व उशाशेजारीं अस्ताव्यस्त स्वैर विखुरलेली असते. डुलकी आलीच तर डोकं काय किंवा हात काय, पुस्तकावरच पडायचा आणि मग कधीं ग्रन्थमग्नतेंतच जी झोपेची गुंगी चढते ती पहाटेचं भान ठेवतेच कशाला ? मी उठतों त्यावेळीं झणझणीत झालेलं असतं भोंवतालचं विश्व आणि विविध भारतीची पहिली झलक आटोपत आलेली असते.

पण ही एक तऱ्हा झाली माझ्या झोपेची !

दुसरी एक तऱ्हा पण आहे. ती म्हणजे पहांटेलाच पुरापुरा जागा होऊन निद्राशून्य अवस्थेंत अंथरूणावर तळमळत राहणं. ज्या निद्रेनं मला विलक्षण गाढ अन् गूढ अवस्थेंत अगदीं अंथरूणाला खिळवून टाकलेलं असतं ती अचानक पण अलगद अशी मला एकटाच सोडून निघून जाते. मी अगदीं कोरा करकरीत असा पुनः पूर्णपणें जागा होतों व सहज खिडकींतून बाहेर नजर टाकतों... सारं मानवी विश्व निद्रीस्तच असतं. कुणाला कधींच कांहीं जाणवत नसेल कीं कुणी एक जीव अंधारांत सताड डोळे उघडून निद्रेची याचना करीत आहे किंवा करीत नाहींहि.

अशा वेळीं मी ज्या एका विशिष्ट मनोवस्थेंत प्रवेश करतों ती सुखद मानावी कीं तापद हें माझं मलाच उमजत नाहीं. मी माझ्या गांवीं असलों तर मात्र मी एकटा असूनही एकाकी आहे असं मला वाटत नाहीं. पण अन्यत्र जें भासतं तें कांहींस वेगळं व विषण्ण करणारं असतं...

मी मग उठतों, चूळ भरतों व बाहेर व्हरांड्यांत बसून रजनीचें अवगुंठन पडलेल्या आकाशाकडे एकटक पहात रहातों. दूर क्षितीजाकडे कधीं तेजस्वी शुक्राचं दर्शनही होतं; कधीं एकाकीच कुणी अनोळखी ताराही कुठं तरी माझ्यासारखाच निद्राशून्य व भकास असा चमचमतांना दिसतो...कुणाची चिटपांखरुं जागही कुठेंच कुजबुजत नसते. पहांट तशी दूरच असते. रात्र संपलेली नसते. मग मला तांब्यांची एक कविता आठवूं लागते. माझं मन मुखरित होतं व पायांचा ताल धरीत मी सुरू करतों ...

**"ये पहांटेचा तारा गगनीं**
**कुणीकडे निघशी लगबग करुनी..."**

कॉलेज जीवनांत तांब्यांच्या कवितेची मोहिनी एकाद्या मोहनिद्रेइतकीच माझ्यावर व माझ्या रसिक मित्रांवर जादूमयतेनें पडलेली होती. माझा एक जिवलग मित्र, कीं जो आजही मला तितकाच प्रिय आहे व ज्याचा माझ्यावरील

जिव्हाळा परिस्थितीच्या अनंत झळा झोंबूनही कृत्रिमतेच्या कंजूष साच्यांत बसलेला नाहीं, तो तर तांब्यांच्या सर्व कविता विलोल भावमयतेनें गात असे...आणि मग आम्ही त्या नादसौंदर्यांत भावदर्शनाची कांहीं वेगळीच अनुभूति आस्वादीत स्वजीवनांत भविष्यकाळाची रम्य रोमँटीक दिवास्वप्नें उबवीत बेभान होत असूं...

कितीदां वरील ओळी गुणगुणत पहांटेसुद्धां आम्हीं चौपाटीच्या वाळूंतून घनगर्जित समुद्र संगीताच्या पार्श्वभूमीवर भरकटलों व भटकलों आहोंत. तें मग मला सारं आठवतं....त्या आठवणींत एक आठवणच मग कटाक्षानें माझ्या स्मृतिमयतेचा ताबा घेते. कुणी एखादी लगबग करीत पहांटेला मला कधीं भेटायला आली नाहीं असं नव्हे. पण ज्या क्षणाला मीच तिला भेटण्यासाठीं, पहांटेलाच वेळ ठरवून, ज्या लगबगीनें कितीदां तरी संकेतस्थळीं गेलों, ते क्षण मला उत्कटतेनें आठवूं लागतात. पावसाळ्याचे दिवस असावेत, स्वतःजवळची छत्री फाटकीतुटकीच असावी...किंवा स्वतःजवळ छत्रीच नसावी पण हिंमत असावी, तुळसीदासाची प्रेयसीकडे त्याला खेचीत नेणारी बेभानता व बेछूटी असावी आणि शेतांतून, पायवाटेनें, वडाखालून व कधीं बांबूच्या दाट वनांतून आपण मार्ग आक्रमित असावें. एकच काय, पण आकाशांत नवलाख दिव्यांचा लखलखाट असेना कां, अंतःकरणांत फुलणाऱ्या लाख कळ्या व प्रज्वलित होणारे कोट्यावधि तेजोदीप, यापुढें बाह्य विश्वाचं भान नसावं...अशा कितीतरी पहांटा मग साकार होऊं लागतात नजरेसमोर.

पण ह्या स्मृतीच फक्त आज उरल्या आहेत. तीं सारीं दिवास्वप्नें क्षणभंगुर ठरलीं आहेत. मग मी उगीच अशी कल्पना करतों कीं ह्या पहांटेनं मला जागं केलं आहे खरं. पण केवळ एकाकीपणाची अनंत जाणीव मला अविरत व्हावी म्हणूनच. कदाचित् कुणीतरी याचवेळीं कुणासाठीं तरी कुठेंतरी लगबगीनें लपकत दचकत पण न बिचकतां, विलक्षण धैर्यानें या सभोंवतालच्या गर्द सृष्टींतूनच पावलें टाकीत नसेल कशावरून?...

ही भावना मला मग फार मानवते. मी त्या अज्ञात व्यक्तीसाठीं प्रार्थना करूं लागतों. जिवाशिवाच्या भेटीगांठी मृत्यूनंतर ज्यांच्या जीवनांत व्हायच्या

असतील त्या होवोत, पण ऋणानुबंधाच्या प्रणयगांठींनी ज्यांचे शरीरिणी जीव ह्या मर्त्य विश्वांत जोडले जात असतील त्यांच्या संयोगांत वियोगाचं दुःख व दैन्य कधींच येऊं नये, असं मला फार फार वाटतं. त्या पहांटेच्या ताऱ्याला साक्ष ठेवून आजवर युगायुगांतून कां कमी राधारमण परस्परांकडे कांट्याकुट्यांतून, रानावनांतून, प्राणपणानें आकर्षिले गेले असतील? पण त्यांतून ज्यांच्या वांट्याला परस्पर पारखें होण्याचेंच दुर्दैव आलं असेल असे कांहीं रोमिओ ज्यूलियटसुद्धां पुष्कळच असतील नाहीं का?...

सर्वसामान्यांच्या सामान्य प्रीतींतसुद्धां कधीं काळीं ही धुंदी त्यांनीं चाखली असेल. नसेलच असें कशावरून?...

मला माझ्या तशा अगदीं सामान्य जीवनांतील हेच धुंदीचे क्षण तरी कां नेमके आठवावेत अशा या पहांट वेळीं?...

माझ्या मित्राची ती अद्यापिही माझ्या मनांत फेर धरणारी गुणगुण मग निनादूं लागते, कुठें तरी खोल खोल... 'जन म्हणती सावळी तुज सगळे...' असं जिचं वर्णन कै. तांब्यांनीं केलं, तिच्यावरून ऐन तारुण्यांतली स्मृति उफाळून येऊन तर त्या ओळी कालांतरानं त्यांनीं लिहिल्या नसतील? माझ्यासारखेच भावविवश व निद्रेला अवश होत, पहांटेच्या समयी अशीच... किंबहुना मला प्रतीत होणारी अनुभूतीच ते घेत नसतील ना? मगच त्या अवस्थेंत ह्या ओळी त्यांना स्फुरल्या असाव्यात...त्यांनी ताल धरला, ते गुणगुणले असतील आणि शब्द बिचारे मागुते येऊन सांधले गेले असतील एका भावगुणांत...

"ये पहांटेचा तारा गगनी...
कुणीकडे......"

खरंच!...माझी निद्रा पण अशीच लगबग करीत मला सोडून पहांटेच गेली नाहीं का? कुणीकडे? कुणासाठीं? कां बरें?...

(१९६१)

13084

REFBK-0013067

REFBK-0013067